## पांडवकड्यावरुन दोन तरुण गेले वाहून

**पनवेल :** खारघर येथील प्रसिद्ध मात्र धोकादायक समजल्या जाणाऱ्या पांडवकडा धबधब्यात दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये दोन तरुण पाण्याच्या तीव्र प्रवाहात वाहून गेल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. सलग दोन दिवसांत घडलेल्या या दुर्घटनांनंतर अग्निशामक दल, पोलीस आणि बचाव पथकांकडून युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू असून, दोघांचाही शोध लागलेला नव्हता. पावसाळा सुरू झाल्याने पांडवकडा धबधबा पर्यटकांनी गजबजला आहे. धबधब्याचे निसर्गरम्य सौंदर्य, हिरवाई आणि पाण्याचा प्रवाह अनुभवण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक •> पान २ वर

१९३७-२०२६ वर्ष ९०

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

रायगड | रविवार । दि. ५ जुलै २०२६ । अंक २९ । पृष्ठे १० । किंमत ४ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## २० जुलैपासून पावसाळी अधिवेशन

**मुंबई :** संसदेचे पावसाळी अधिवेशन २० जुलैपासून सुरू होणार असून ते १३ ऑगस्टपर्यंत चालेल. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी शनिवारी एक्सवर पोस्ट करत ही माहिती दिली. राम मंदिर देणगी घोटाळा, एसआरआरसह देशभरात सुरू असलेल्या राजकीय फोडाफोडीचे पडसाद या अधिवेशनात उमटण्याची शक्यता आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संसदेच्या दोन्ही सभागृहांचे पावसाळी अधिवेशन २०२६ बोलवण्यास मंजुरी दिली आहे. पावसाळी अधिवेशन २० जुलैपासून सुरू होणार असून ते १३ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. सुमारे चार आठवडे चालणाऱ्या या अधिवेशनात लोकसभा आणि राज्यसभा दोन्ही सभागृहांचे कामकाज चालेल.

### वेधक

## मिठी नदीत बुडणाऱ्याला वाचवले

**दहिसर :** दहिसर पश्चिममध्ये मिठी नदीत युवक पडल्याची घटना घडली. या घटनेनंतर अग्निशामक दलाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. ट्यूब आणि दोरीच्या साहाय्याने युवकाचे थरारक रेस्क्यू करण्यात आले. सुमारे १५ फूट उंचीवरुन दोरीच्या मदतीने युवकाला बाहेर काढण्यात आले. रेस्क्यू ऑपरेशनचा थरार कॅमेऱ्यात कैद झाला आहे. अग्निशामक दलाच्या तत्परतेमुळे युवकाचा जीव वाचला. पावसाळ्यात नद्या व नाल्यांच्या परिसरात नागरिकांनी सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## खेड-धामणंद मार्गावर भूस्खलन

**दापोली :** रत्नागिरी जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे खेड तालुक्यातील खेड-खोपी-धामणंद या महत्त्वाच्या मार्गावर शनिवारी पहाटे भीषण भूस्खलन झाले. कासई शिंदेवाडी येथे डोंगराचा मोठा भाग रस्त्यावर कोसळल्याने रस्त्याचा काही भाग खचून वाहून गेला असून, या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली आहे. पहाटेच्या सुमारास सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे डोंगराचा कडा अचानक कोसळला. माती, दगड आणि झाडांचा मोठा ढिगारा रस्त्यावर आल्याने काही क्षणांतच संपूर्ण मार्ग बंद झाला. त्याचवेळी रस्त्याच्या कडेलाही तडे जाऊन काही भाग वाहून गेल्याने या मार्गावरील प्रवास •> पान २ वर

## गुजरातमध्ये जैशचा कट उधळला

**अहमदाबाद :** जैशे महंमद या दहशतवादी संघटनेच्या संपर्कात राहून, गुजरातमध्ये कारवाया वाढविण्याच्या प्रयत्नात असणाऱ्या आठ जणांना गुजरातच्या दहशतवादविरोधी पथकाने अटक केली. गुजरातसह आसपासच्या राज्यांमध्ये या दहशतवादी संघटनेच्या कारवाया वाढविण्यासाठी या सर्वांकडून हालचाली करण्यात येत होत्या, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. अहमद अब्दुल्ला गाझीवाला, मुदस्सिर अब्दुल्ला गाझीवाला, इब्राहिम महंमद हुसे गाघा, झाकरिया दुरानी महंमद अमर गाघा, मुफ्ती फौजान इस्माईल दौवा, महंमद अमीन शेरा, महंमद अब्दुल रेहमान सावडी, बिलाल दुरानी महंमद अमर गाघा अशी या आरोपींची नावे आहेत. अटक करण्यात आलेले सर्व आरोपी गुजरातच्या बनासकांठा, पाटण आणि नवसारी जिल्ह्यातील असून, मध्य प्रदेशच्या देवास जिल्ह्यातून एकाला अटक करण्यात आली आहे.

## पहिल्या पावसाच्या सरींमध्ये बनला

# मुंबई-गोवा महा 'जल' मार्ग



**। रायगड । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्ग कोणत्या ना कोणत्या कारणाने प्रसिद्धीच्या झोतातत राहिला आहे. एक तपाहून अधिक काळ उलटला तरी हा महामार्ग पूर्णत्वाला गेलेला नाही. केंद्र आणि राज्य सरकारच्या तारीख पे तारीख या धोरणामुळे सर्वाधिक काळ रखडलेला महामार्ग म्हणून मुंबई-गोवा महामार्गाची नकोशी ओळख तयार झाली आहे. निकृष्ट दर्जाचे काम आणि दिरंगाई यामुळे यंदाच्या पावसाळ्यात पुन्हा महामार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य तयार झाले आहे. शनिवारी झालेल्या मुसळधार पर्जन्यवृष्टीमुळे नद्या आणि ओढ्यांचे ओसंडणारे पाणी रस्त्यावर येऊन वाहनांचा महामार्ग जलमार्ग बनल्याचे भयावह चित्र पाहावयास मिळाले.

रायगड जिल्ह्यात दाखल झालेल्या मान्सूनने दमदार सुरुवात केली आहे. गुरुवार, शुक्रवार आणि शनिवार सलग तीन दिवस पावसाने सरासरीची शंभरी गाठली आहे. तीन दिवस रायगड जिल्ह्याला पावसाचा रेड अलर्ट देण्यात आला होता. या कालावधीत नागरिकांना सावधगिरीचा इशारा प्रशासनाने दिला आहे. रायगड जिल्ह्यात असणाऱ्या प्रमुख नद्यांनी इशारा पातळी, धोका पातळी ओलांडल्याचे चित्र आहे. जुलै महिन्याच्या सुरुवातीला होणाऱ्या पावसाने रायगडकरांना झोडपून काढले आहे. या मुसळधार पावसात अनेक मुख्य रस्त्यांवर झाडे उन्मळून पडून वाहतूक खोळंबली होती. विशेष म्हणजे •> पान २ वर

गेल्या पंधरा वर्षांपासून पळस्पे ते इंदापूर मार्गाचे काम अपूर्णावस्थेत आहे. या वर्षी हे काम पूर्ण होईल आणि कोकणवासियांचा प्रवास सुखकर होईल, अशी अपेक्षा होती. मात्र ठेकेदारांच्या निष्क्रीयतेमुळे याही वर्षी कोकणची वाट खडतरच असल्याचे चित्र सध्या पहायला मिळत आहे. महामार्गावर नागोठणे जवळील कोलेटी येथे उड्डाण पूल उभारणीचे काम सध्या सुरू आहे. त्यामुळे महामार्गावरील प्रवाशांना सध्या सर्व्हिस मार्गांचा वापर करावा लागत आहे. या सर्व्हिस मार्गिकांची सध्या मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली आहे. महामार्गावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे चालकांना खड्ड्यांमधून आदळत आपटत पुढील मार्गक्रमण करावे लागत आहे. या ठिकाणच्या रस्त्याची सध्या दयनीय अवस्था आहे. खड्ड्यांमधील खडी बाहेर आली आहे. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी साचत आहे. त्यामुळे या परिसरातून मार्गक्रमण करतांना चालकांना कसरत करावी लागत आहे. पाणी साचलेल्या खड्ड्यांमधून वाहने चालवतांना अंदाज येत नसल्याने वाहने आपटण्याचे प्रमाण वाढले आहे.

### ६ जुलैपर्यंत मुसळधार पावसाचा इशारा

ठाणे, रायगड, पालघर असेल पुण्याचा काही भाग, नाशिक याठिकाणी मुसळधार पाऊस आहे. कालपासून आपण वेगवेगळे अलर्ट दिले आहेत. या भागात सातत्याने ६ जुलैपर्यंत मुसळधार पाऊस असेल, वादळंही येतील. आपण दर तीन तासांनी आपण या भागातील नागरिकांना एसएमएस पाठवत आहोत. शाळांना सुट्टी दिली आहे. लोकांना विनंती केली आहे की, प्रवास टाळता आला तर टाळला पाहिजे, गरज असेल तरच घराबाहेर पडा. आता ज्याप्रकारे पाऊस आणि वादळ आहे काही अपघात होऊ नयेत म्हणून प्रशासनाकडून अलर्ट पाठवले जात आहेत. एनडीआरएफ आणि एसडीआरएफ परिस्थितीवर नजर ठेवून आहेत. माझी लोकांना विनंती आहे की, आपण नीट अलर्ट देतोय, लोकांनी ते अलर्ट फॉलो करावेत, शक्यतो त्याप्रमाणे बाहेर पडावे, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## अंबा नदीच्या पुरामुळे भेरव पूल जलमय; गावांचा संपर्क तुटला



**। पाली । प्रतिनिधी ।**

हवामान विभागाने ४ ते ७ जुलैदरम्यान कोकणासह रायगड जिल्ह्यात काही ठिकाणी अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला असतानाच गेल्या दोन-तीन दिवसांपासून जिल्ह्यात पावसाची संततधार सुरू आहे. या मुसळधार पावसामुळे सुधागड तालुक्यातील अंबा नदीने इशारा पातळी ओलांडली असून, भेरव येथील अंबा नदीवरील पूल बुधवारी (दि.४) पाण्याखाली गेला. त्यामुळे परिसरातील अनेक गावांचा संपर्क काही काळासाठी तुटला.

पूल पाण्याखाली गेल्याने शाळकरी विद्यार्थी, नोकरदार, कामगार तसेच प्रवाशांना नदीच्या दोन्ही तीरांवर अडकून पडावे लागले. दुपारपासून पुलाच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. अचानक वाढलेल्या पाण्याच्या प्रवाहामुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले.

सुधागड तालुक्यात सोमवापासूनच पावसाचा जोर वाढल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. पाली-अंबा नदीवरील नव्या पुलाची उंची वाढविण्यात आल्याने या पुलावरून पाणी वाहिले नाही. मात्र, पावसाचा जोर कायम राहिल्यास पुलाच्या दोन्ही बाजूंना पाणी साचण्याची •> पान २ वर

**■ विद्यार्थी, नोकरदार नदीच्या दोन्ही तीरांवर अडकले; प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा**




## पावसाच्या ढगांमध्ये आढळला ब्लॅक कार्बन

**मुंबई :** भारतीय उष्णदेशीय हवामानशास्त्र संस्थेच्या शास्त्रज्ञांनी एक महत्वाचे संशोधन केलं आहे. नैर्ऋत्य मौसमी पावसाच्या ढगांमध्ये रिफ्रॅक्टरी ब्लॅक कार्बन म्हणजे काजळीचे बारीक कण अस्तित्वात असल्याचे समोर आलं आहे. कार्बनचे सूक्ष्म घटक यापुढेही असेच वाढल्यास त्यांच्या उष्णतेमुळे ढगांच्या निर्मितीस अडथळा होऊ शकतो, असा निष्कर्ष या अभ्यासातून समोर आला आहे. त्यामुळं पावसावर परिणाम होण्याची



शक्यता देखील नाकाराता येत नाही. शास्त्रज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, ब्लॅक कार्बन उष्णता शोषून घेतो. त्यामुळे त्याचे प्रमाण वाढल्यास स्थानिक पातळीवर तोापमान वाढते. हे उष्ण कण ढगांच्या आत किंवा जवळ पोहोचल्यानंतर •> पान २ वर

## पावसाचा तडाखा; जिल्ह्यात आठ घरे, गोठ्याचे नुकसान

**नद्या धोक्याच्या पातळीवर; सोमवारी रेड अलर्ट, नागरिकांना सतर्कतेचा इशारा**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

हवामान खात्याने दिलेल्या अतिवृष्टीच्या इशाऱ्यानुसार गेल्या चार दिवसांपासून रायगड जिल्ह्यात मुसळधार पाऊस सुरू असून संततधार कायम आहे. या पावसामुळे जिल्ह्यातील प्रमुख धरणांमधील जलसाठा झपाट्याने वाढला असून सावित्री, अंबा, कुंडलिका, उल्हास, गाढी आणि पाताळगंगा या प्रमुख नद्या दुथडी भरून वाहत आहेत. वादळी वाऱ्यासह झालेल्या



संग्रहीत

पावसामुळे अलिबागसह सहा तालुक्यांमध्ये आठ घरांचे आणि एका गोठ्याचे नुकसान झाल्याची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.

माणगाव तालुक्यात सर्वाधिक चार घरांची पडझड झाली. तळा तालुक्यातील चरई खुर्द आदिवासीवाडी येथील अंकुश हिलम यांच्या घराचे नुकसान झाले. महाड तालुक्यातील ताम्हणे येथे अशोक पवार •> पान २ वर

## महाबळेश्वरजवळील नावली गावात जमीन खचली

**घरे, शेतजमिनी आणि रस्त्यांना तडे, पाण्याच्या टाकीचाही धोका**

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

महाबळेश्वरजवळील नावली गावात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणात जमीन खचण्यास सुरुवात झाली आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे गावातील शेतजमिनी, घरे आणि अंतर्गत रस्त्यांना मोठमोठे तडे गेले असून, संपूर्ण गावात भीतीचे आणि घबराटीचे वातावरण पसरले आहे. सतत होणाऱ्या मुसळधार आणि संततधार पावसामुळे जमिनीची पकड पूर्णपणे कमकुवत झाली आहे. परिणामी, गावातील अनेक भागांतील भूभाग अचानक

### पुढील काही तास महत्त्वाचे

महाबळेश्वर परिसरात अजूनही पावसाचा जोर कायम आहे. पावसामुळे आणखी जमीन खचण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने प्रशासनाने नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. ग्रामस्थांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे. तसेच धोकादायक इमारती किंवा भागात जाणे पूर्णपणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सध्या स्थानिक यंत्रणा परिस्थितीवर २४ तास लक्ष ठेवून असून पुढील काही तास गावाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहेत.



खचला असून काही घरांच्या भिंतींना आणि पायाला गंभीर तडे गेले आहेत. याशिवाय, शेतजमिनींचेही मोठे नुकसान झाले असून रस्त्यांवर जागोजागी मोठ्या भेगा पडल्याने अंतर्गत वाहतुकीवर परिणाम झाला आहे. •> पान २ वर

## भांडूपमध्ये रस्ता खचला



**भांडूप :** मुंबई, उपगरात सध्या तुफान पाऊस सुरू आहे. पुढचे काही तास हा पाऊस कायम राहण्याची शक्यता आहे. गरज असेल तरच घराबाहेर पडावे, असे आवाहन मुंबई महापालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे. तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये, म्हणून प्रशासनाकडून खबरदारी घेतली जात आहे. दरम्यान, •> पान २ वर




**एसटी महामंडळाचा दिखावा कायमच** | **भूमीपूजन होऊन आठ वर्षे ; तरी कामाचा अभाव**

# अलिबागच्या नव्या स्थानकाचे स्वप्न अपूर्णच

**। प्रमोद जाधव ।**

**। रायगड ।**

अलिबाग बस स्थानकाच्या नुतनीकरणाचा मोठा थाट एसटी महामंडळाने केला होता. कामाचे भूमीपूजन होऊन आठ वर्षे होत आली आहेत. मात्र अद्यापपर्यंत त्या जागी साधी विटही रचण्यात आली नाही. त्यामुळे नव्या स्थानकाचे स्वप्न अपूर्णच राहिले असून एसटी महामंडळाचा दिखावा यातून समोर आला आहे.



रायगड जिल्ह्यामध्ये एसटी महामंडळरायगडविभागनियंत्रकांच्या अखत्यारित अलिबाग, पेण, कर्जत, रोहा, महाड, माणगाव, श्रीवर्धन, मुरूड हे आठ एसटी बस आगार आहेत. या आगारांमध्ये अलिबाग हे आगार जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी आहे. प्रवाशांच्या सेवेसाठी १ एप्रिल १९६१ मध्ये अलिबाग एसटी बस आगार व स्थानक उभारण्यात आले. सर्वे नंबर ७७८, १२९८ असलेल्या जागेचे एकूण क्षेत्रफळ १९ हजार ५३० चौ. मी. आहे. त्यामध्ये आगाराचे क्षेत्रफळ ११ हजार चौ. मीटर, बस स्थानकाचे क्षेत्रफळ ७ हजार ६३० चौ. फुट आणि आगार निवासस्थानाचे क्षेत्रफळ ९०० चौ. फुट इतके आहे. या आगारातून लाखो प्रवासी प्रवास करतात. ६५ वर्षे तीन महिने जून्या असलेल्या या स्थानकाची अवस्था दयनीय झाल्याने नवीन स्थानक उभारण्याची हालचाल आठ वर्षापूर्वी सुरु झाली होती. त्यावेळी २८ ऑगस्ट २०१८ मध्ये नवीन स्थानकाच्या कामाचे भूमीपूजन करण्यात आले होते. मोठ्या थाटामाटात सायंकाळच्या सुमारास भर पावसात भूमीपूजन झाले.

पुणे येथील डिरोक्ट्रीक इंजिनिअरिंग या कंपनीकडून २०१९ मध्ये माती परिक्षण करण्यात आले. १८ महिन्यात म्हणजे २१ सप्टेंबर २०२१ पर्यंत •> पान २ वर

### समस्यांमुळे प्रवासी, नागरिक त्रस्त

नोकरी व्यवसायानिमित्त अलिबागमध्ये येणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे. अलिबाग आगारातून दिवसाला २० हजार पेक्षा अधिक प्रवासी प्रवास करतात. सुमारे १९ हजार किलो मीटर अंतर एसटी बस नियमित ये-जा करते. याच अलिबाग आगाराची अवस्था दयनीय आहे. सतत स्लॅब कोसळणे, कार्यालयात पाणी शिरणे, अस्वच्छतेचा बोजवारा, स्थानकाला तळ्याचे स्वरुप, ठिकठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य, एसटीला गळती अशा अनेक समस्यांच्या गर्तेत अलिबाग स्थानक सापडले आहे.

# शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी निधी

## २ कोटींपर्यंतच्या कर्जावर मिळणार ३ टक्के व्याज सवलत!

**। रायगड । प्रतिनिधी ।**

शेतकरी बांधवांचे उत्पन्न वाढवून त्यांना आत्मनिर्भर बनवण्याच्या उद्देशाने, भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयामार्फत सुरू असलेल्या कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेची आता संपूर्ण राज्यात अत्यंत प्रभावीपणे विशेष अंमलबजावणी मोहीम राबविण्यात येत आहे. अशी माहिती कृषी संचालक सुनील बोरकर यांनी दिली आहे.

ही विशेष मोहीम १९ जून २०२६ ते २० जुलै २०२६ या कालावधीत युद्धपातळीवर राबवली जात असून, या माध्यमातून शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि कृषी उद्योजकांमध्ये व्यापक जनजागृती करून योजनेचा थेट लाभ तळागाळातील पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

ऑगस्ट २०२० मध्ये सुरू झालेल्या या महत्त्वाकांक्षी आत्मनिर्भर भारत अभियानाचा एक प्रमुख भाग म्हणून, शेती क्षेत्रातील पीक काढणीनंतरच्या व्यवस्थापनासाठी म्हणजेच पोस्ट-हार्वेस्ट मॅनेजमेंट आणि सामुदायिक शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यासाठी ही सवलतीच्या कर्जाची योजना अत्यंत वरदान ठरत आहे. या सुवर्ण योजनेच्या अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना बँकांमार्फत मंजूर होणाऱ्या २ कोटी रुपयांपर्यंतच्या कर्जावर वार्षिक ३ टक्के व्याज सवलत दिली जाते, तसेच कर्ज संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण असलेली क्रेडिट गॅरंटीची सुविधा देखील शासनामार्फतच उपलब्ध करून दिली जात असल्यामुळे कृषी क्षेत्रातील गुंतवणुकीला मोठी सुरक्षा मिळाली आहे. या योजनेमुळे शेतमालाचे मूल्यवर्धन होण्यास मदत होत असून साठवणूक, प्रक्रिया, वाहतूक व आधुनिक विपणन व्यवस्था मजबूत होत असल्याने शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नात घसघशीत वाढ होण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

या विशेष मोहिमेच्या अंतर्गत ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचा चेहरामोहरा बदलू शकणाऱ्या विविध महत्त्वाच्या प्रकल्पांचा समावेश करण्यात आला आहे, ज्यामध्ये प्रामुख्याने अत्याधुनिक गोदामे, शीतगृहे, पॅक हाऊस, ग्रेडिंग व सॉर्टिंग युनिट्स, प्राथमिक प्रक्रिया केंद्रे, कृषी लॉजिस्टिक्स, सायलो, रिपनिंग चेंबर्स, ई-मार्केट्स सुविधा, जैव-इनपुट उत्पादन युनिट्स आणि कस्टम हायरिंग सेंटर्स यांसारख्या अत्यंत आवश्यक अशा कृषी पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या उभारणीसाठी भरीव अर्थसाह्य पुरवले जात आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या व संस्था, प्राथमिक कृषी पतसंस्था, विविध सहकारी संस्था, कृषी उद्योजक, नवीन स्टार्टअप्स आणि महिला स्वयंसहायता गट यांसह कृषी क्षेत्रातील इतर सर्व पात्र संस्था पुढे येत आहेत.

एक महिन्यापेक्षा अधिक काळ चालणाऱ्या या विशेष अंमलबजावणी मोहिमेदरम्यान जिल्हा व तालुका पातळीवर व्यापक जनजागृती कार्यक्रम, शेतकरी मेळावे, अभ्यासपूर्ण कार्यशाळा आणि थेट बँक समन्वय बैठक आयोजित करण्यात येणार असून, त्यामुळे इच्छुक लाभार्थ्यांच्या अडचणींचे जागेवरच निवारण केले जाणार आहे. राज्यातील सर्व पात्र शेतकरी व संस्थांनी या अत्यंत फायदेशीर योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेऊन आपल्या भागात कृषी पायाभूत सुविधा उभारण्यासाठी तातडीने पुढाकार घेण्याचे आवाहन कृषी संचालनालय व कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या वतीने करण्यात आले असून, इच्छुक अर्जदारांनी अधिक माहितीसाठी संपर्क साधावा, असे आवाहन सुनील बोरकर यांनी केले आहे.

# खड्ड्यांमुळे अपघातांचे सत्र कायम

**। खांदा कॉलनी । वार्ताहर ।**

महानगर गॅस लिमिटेड आणि पनवेल महानगरपालिका प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे नवीन पनवेलमध्ये मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण झाली होती. सेक्टर १४ येथील वृंदावन को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी व कालीमाता मंदिराजवळ गॅस वाहिनीच्या कामासाठी खोदून अर्धवट बुजवलेल्या खड्ड्यात एक प्रवासी बस रुतल्याची घटना घडली.

महानगर गॅस कंपनीने गॅस पाईपलाईन टाकण्यासाठी रस्ता खोदला होता. मात्र, काम पूर्ण झाल्यानंतर खड्डा योग्य प्रकारे न भरता केवळ वरवर माती टाकून सोडल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. मुसळधार पावसामुळे माती खचून रस्त्याचा काही भाग बसला आणि त्यातून जात असलेल्या प्रवासी बसचे मागील चाक खोल खड्ड्यात अडकले.या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी बस अडकल्यामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली. स्थानिक नागरिक आणि इतर वाहनचालकांच्या मदतीने परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली. कंपनीकडून रस्ते खोदून अर्धवट अवस्थेत सोडले जातात, तर महानगरपालिका ते वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने दुरुस्त करत नसल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पावसाळ्यात अशा खचलेल्या रस्त्यांमुळे रोज छोटे-मोठे अपघात घडत असून वाहनचालकांचा जीव धोक्यात येत आहे.



# आंबेवाडी उड्डाण पुलाखालील रस्त्याला तलावाचे स्वरूप

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गावरील केंद्रस्थानी असलेल्या महत्वाच्या असणाऱ्या आंबेवाडी नाक्यावरील नव्याने सुरु असलेल्या उड्डाण पुलाखाली रस्त्याला सुरवातीच्या पावसातच तलावाचे स्वरूप प्राप्त झाले असुन यातून मार्ग काढतांना वाहन चालकांसहित प्रवाशी वर्गाची तारांबळ उडत असुन यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असल्यामुळे संबंधितांनी लक्ष देऊन काम करण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे.

गेली तीन चार दिवस पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे आंबेवाडी बाजारपेठेतील रस्त्यावरील बाय पास रस्त्यावर ठिकठिकाणी रस्ता उखडले आहेत शिवाय नव्याने बांधण्यात आलेल्या पुलाखाली रस्ता उखडून या रस्त्याला तलावाचे स्वरूप प्राप्त झाले आहे यामुळे आंबेवाडी बाजारपेठेतुन रोहा बाजुकडे जाणाऱ्या येणाऱ्या वाहन चालकांना वाहन चालवितांना प्रचंड खबरदारी घ्यावी लागत असुन या भागात वाहने हळू चालवावी लागत आहे. यामुळे वाहतूक कोंडी होतांना दिसत आहे.

कोलाड आंबेवाडी येथील आजूबाजूच्या ठिकाणी असणाऱ्या ७० ते ७२ खेडेगावातील वाड्यावस्त्यावरील नागरिक बाजारासाठी येत असल्याने येथे मोठी वर्दळ सुरु असते. धाटाव एमआयडीसी रोहा अलिबाग आदी ठिकाणी जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांची देखील प्रचंड मोठ्या प्रमाणात वर्दळ सुरु असते.यामुळे उखडलेल्या रस्त्याला तलावाचे स्वरूप प्राप्त झाल्यामुळे याचा वाहतुकीवर परिणाम तर होत आहेच. याशिवाय वाहन चालक व नागरिकांनादेखील याचा त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे संबंधित ठेकेदार व प्रशासन यांनी त्वरित लक्ष देऊन उपाययोजना करावी, अशी मागणी केली जात आहे.

## स्पीड ब्रेकरवर पट्टे नसल्याने अपघात

**नवीन पनवेल:** रस्त्यांवर स्पीड ब्रेकर टाकण्यात आलेले आहेत. मात्र या ठिकाणी पांढरे पट्टे नसल्याने अपघात होत आहेत. त्यामुळे पांढरे पट्टे मारण्याची मागणी जनार्दन मगर यांनी केली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यांवर अनेक ठिकाणी स्पीड ब्रेकर उभारण्यात आलेले आहेत. अनेक गावा ठिकाणी देखील स्पीड ब्रेकर आहेत. या स्पीड ब्रेकरवर पांढरे पट्टे नसल्याने छोटे-मोठे अपघात होत आहेत. स्पीड ब्रेकरवर पांढरे पट्टे नसल्याने स्पीड ब्रेकरवरून वाहने उडून अपघात होत आहेत.

# डॉक्टरांनी काळजीपूर्वक रुग्णांची हाताळणी करावी

## ■ डॉ. नंदकुमार तासगावकर यांचे आवाहन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

आरोग्य सेवा ही जनसेवा आहे आणि त्यामुळे आरोग्य क्षेत्रात कार्य करणारे प्रत्येकाने रुग्णांची हाताळणी काळजीपूर्वक करावी. जेणेकरून रुग्णांच्या नातेवाईक यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे आरोप होणार नाहीत आणि आपला पेशा देखील नोबल आहे हे स्पष्ट होईल असे मार्गदर्शन डॉ. नंदकुमार तासगावकर यांनी डॉक्टर्स डे निमित्त केले.रायगड हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर मध्ये डॉक्टर्स डे निमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



डॉक्टर्स डे निमित्त रायगड हॉस्पिटल अँड सेंटर मध्ये कॉन्फरन्स हॉल मध्ये कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यावेळी सरस्वती एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार तासगावकर, संस्थेचे विकास संचालक बुदल तासगावकर कुलकर्णी तसेच कार्यकारी संचालक नागसेन कांबळे, महेश काशिद, रमाकांत तरे यांच्यासह रुग्णालयाचे डीन डॉ विनायक सबनीस, वैद्यकीय अधीक्षक डॉ. आशिष बोंगिनवार, उप वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल सातव, ॲडमिनिस्ट्रेशन विभाग प्रमुख डॉ. धनश्री कदम, कोअरटीम मेंबर झाकीर पठाण आणि सर्व विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते. यावेळी सुरुवातील डॉक्टर्स डे बद्दल केक कापून आनंद साजरा करण्यात आले. रायगड हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे डीन डॉ. विनायक सबनीस यांनी डॉक्टर्स डे हा दिवस देशात कसा सुरू झाला याबद्दल स्पष्टीकरण केले.या कार्यक्रमाला नव्याने एमबीबीएस झालेले सर्व डॉक्टर तसेच रुग्णालयाच्या सेवेत असलेले डॉक्टर आणि रायगड हॉस्पिटल मधील स्टाफ हजर होता.

डॉ. नंदकुमार मेडिकल कॉलेजचे प्रमुख आणि सरस्वती एज्युकेशन सोसायटी अध्यक्ष डॉ नंदकुमार तासगावकर यांनी संवाद साधताना डॉक्टर पेशाला मनुष्याच्या जीवनात फार महत्व आहे. त्यामुळे प्रसंगी डॉक्टरांना देव मानणारा समाज आपल्याकडून एखादी चूक झाल्यानंतर दवाखान्याची मोडतोड करायला पुढे येतो. त्यामुळे आपण रुग्णांची काळजीपूर्वक कोणत्याही चुका न करता सुश्रुषा करावी, असा सल्ला दिला.

# खोपोलीत आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

पावसाळ्यात उद्भवणाऱ्या विविध आपत्कालीन परिस्थितींना तोंड देण्यासाठी खोपोली पोलीस ठाण्याच्या वतीने महाराजा मंगल कार्यालय येथे विशेष मार्गदर्शन व प्रात्यक्षिक शिबिराचे आयोजन करण्यात आले.



उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या शिबिरात पोलीस, अग्निशमन दल, हेल्प फाउंडेशन, यशवंती हायकर्स, पोलीस पाटील, महिला दक्षता समिती, पोलीस मित्र, पत्रकार सहभागी झाले होते.

पूर, दरड कोसळणे, भूस्खलन, गॅस गळती आणि महामार्गावरील अपघात अशा आपत्तींच्या वेळी करावयाच्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी प्रतिबंध, सावधगिरी आणि पूर्वतयारी या त्रिसूत्रीवर भर देत सर्वांनी समन्वयाने कार्य करण्याचे आवाहन केले.

पीएसआय पूजा चव्हाण यांनी उपलब्ध आपत्कालीन संसाधनांची माहिती दिली, तर अग्निशमन दल व हेल्प फाउंडेशनने बचाव साहित्यांचे प्रात्यक्षिक सादर केले. सदर हा कार्यक्रम महाराजा मंगल कार्यालय खोपोली येथे संपन्न झाला या शिबिरातून आपत्ती व्यवस्थापनात वेळेवर प्रतिसाद, समन्वय आणि नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचा संदेश देण्यात आला.

# बळीराम जाधव सेवानिवृत्त

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

बाँबे डाईंग, रसायनी येथील कारखान्यात तब्बल २० वर्षे फोर्कलिफ्ट ऑपरेटर म्हणून कर्तव्यनिष्ठ, प्रामाणिक आणि जबाबदारीने सेवा बजावणारे बळीराम जाधव हे नुकतेच नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले.

त्यांच्या प्रदीर्घ सेवेला मानवंदना देण्यासाठी सहकारी कामगार, मित्रपरिवार आणि नातेवाईकांच्या उपस्थितीत त्यांच्या निवासस्थानी भावपूर्ण सत्कार व शुभेच्छा समारंभाचे आयोजन करण्यात आले. त्यांनी आपल्या सेवाकाळात वेळेचे काटेकोर पालन, कामातील शिस्त, प्रामाणिकपणा आणि कर्तव्याप्रती असलेली निष्ठा यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांसह सहकारी कर्मचाऱ्यांचा विश्वास संपादन केला. फोर्कलिफ्ट ऑपरेटर म्हणून त्यांनी कारखान्यातील जबाबदाऱ्या अत्यंत कुशलतेने पार पाडत कारखान्यातील उत्पादन प्रक्रियेत मोलाचे योगदान दिले. या निमित्ताने त्यांच्या निवासस्थानी कार्यक्रमाच्या आयोजन करण्यात आले होते.

पान १ वरून

## पांडवकड्यावरून दोन तरुण गेले वाहून

येथे येत आहेत. मात्र, मुसळधार पावसामुळे पाण्याचा वेग वाढल्याने परिसर अतिशय धोकादायक बनला आहे. पहिल्या घटनेत तळोजा फेज-१ येथील सागरविहार बिल्डिंग, जनता गॅरेजजवळ राहणारा मोहम्मद (वय २०) हा तरुण पाण्याच्या प्रवाहात बुडाला. तर दुसऱ्या घटनेत मुंबईतील सांताक्रुझ (कलिना कोळीवाडी परिसर) येथील रहिवासी शेणोन किनी (वय १९) हा तरुण धबधब्याच्या जोरदार प्रवाहात वाहून गेला.दोन्ही घटनांनंतर अग्निशामक दल आणि संबंधित यंत्रणांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत शोधकार्य सुरू केले. मात्र पाण्याचा तीव्र प्रवाह आणि प्रतिकूल हवामानामुळे बचावकार्यात अडथळे येत असून, दोन्ही तरुणांचा शोध सुरू आहे. दरम्यान, प्रशासनाने नागरिक आणि पर्यटकांना पावसाळ्यात धोकादायक धबधबे, नद्या व जलाशयांमध्ये उतरण्याचे टाळावे तसेच सुरक्षा सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन केले आहे.

## खेड-धामणंद मार्गावर भूस्खलन

धोकादायक बनला आहे.दरड कोसळली, त्यावेळी घटनास्थळी कोणतेही वाहन नसल्याने मोठी जीवितहानी टळली. मात्र, घटनेनंतर मार्गाच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. अनेक प्रवासी आणि स्थानिक नागरिकांना तासन्‌तास अडकून पडावे लागले.

## मुंबई-गोवा महा‘जल’मार्ग

रायगड जिल्ह्यातून कोकणात जाणाऱ्या महामार्गाने लक्ष वेधून घेतले आहे. मुंबई-गोवा महामार्गावर महाड, माणगाव, कोलाड, नागोठणे या ठिकाणी महामार्गावर अनेक ठिकाणी पाणी साचले असल्याने वाहतूक मंदावली होती. महामार्गावर पाणी साठण्याचा खरा कहर कर्नाळा खिंडीनजीकच्या बांधनवाडी येथे पाहावयास मिळाला. कर्नाळ्याच्या जंगलात झालेल्या मुसळधार पावसामुळे नद्यांना आलेल्या पुराचा फटका परिसरातील गावांना बसलाच त्याचबरोबर पुराच्या पाण्याने मुंबई-गोवा महामार्गावर दस्तक दिली. सुमारे एक ते दोन किलोमीटर अंतरापर्यंत महामार्गावरपाणी साचून महामार्ग पाण्याखाली गेला होता. यामुळे महामार्गावर कर्नाळा आणि पेणच्या दिशेने होणारी वाहतूक खोळंबली होती. पाणी ओसरण्यास सुरुवात झाल्यानंतर वाहतूक सुरू झाली. पाणी साचलेले असल्याचे पाहूनदेखील अनेक स्टंट करणाऱ्या वाहनचालकांनी आपल्या गाड्या या पाण्यामधून पुढे नेण्यासाठीची कसरत केल्याचे पाहावयास मिळाले.

दरम्यान, मुंबई-गोवा महामार्गावरील पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होत नसल्याने रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचत आहे. पहिल्या पावसापासून निर्माण झालेली ही समस्या अद्याप कायम असून वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. साचलेल्या पाण्यातून दुचाकी, रिक्षा, कार आणि अवजड वाहने मार्ग काढत असल्याने वाहतुकीत अडथळे निर्माण होत असून अपघाताचा धोका वाढला आहे. विशेषतः समोरून येणाऱ्या वाहनांचा अंदाज न आल्याने किरकोळ वादही होत आहेत. वारंवार ही परिस्थिती उद्भवत असतानाही महामार्ग प्रशासनाकडून कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेली नसल्याने वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पाण्याचा तातडीने निचरा करून सुरक्षित वाहतुकीसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## अलिबागच्या नव्या स्थानकाचे स्वप्न अपूर्णच

स्थानकाचे काम पूर्ण होण्याची अपेक्षा होती. मात्र सहा कोटी २८ लाख रुपये खर्च अपेक्षीत असलेल्या नव्या एसटी बस स्थानकांचे काम अडकून राहिले आहे. गेल्या आठ वर्षापासून साधी वीटही या जागेत बसविली नाही. सात हजार ६३० चौरस फुट इतक्या क्षेत्रावर नवीन स्थानकाचे बांधकाम करण्यात येणार होते. तळ मजला व पहिला मजला अशा पध्दतीने बस स्थानकामध्ये इमारत होणार होती. स्थानकातील तळ मजल्यामध्ये १४ फलाट असणार होते. प्रवाशांसाठी खास प्रतिक्षालय, उपहारगृह, प्रसाधनगृह, पार्सल खोली, महिलांसाठी हिरकणी कक्ष, आरक्षण कक्ष, स्थानक प्रमुख कार्यालय होणार होते. पहिल्या मजल्यावर चालक व वाहकांसाठी विश्रांती कक्ष बांधण्यात येणार होते. त्यामध्ये महिला व पुरुषांसाठी वेगळे कक्ष असणार होते. सुमारे एक लाख प्रवासी ये-जा करण्याची क्षमता नव्या स्थानकात होती. परंतू महामंडळाच्या उदासीनतेमुळे नव्या स्थानकाचे स्वप्न आता अपूर्णच राहिल्याचे चित्र आहे.

## अंबा नदीच्या पुरामुळे भेरव पूल जलमय; गावांचा संपर्क तुटला

शक्यता लक्षात घेऊन पाली-खोपोली-वाकण मार्गावरील वाहतूक बंद करण्याची तयारी प्रशासनाने ठेवली होती. सुदैवाने बुधवारी अशी परिस्थिती निर्माण झाली नाही आणि या मार्गावरील वाहतूक सुरळीत सुरू राहिली.दरम्यान, जांभूळपाडा, परळी, पाली, नांदगाव, महागाव आदी भागांतही मुसळधार पावसामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर तहसील कार्यालयाच्या आपत्कालीन विभागाने आणि पाली पोलिसांनी विविध ठिकाणांची पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला. खबरदारीचा उपाय म्हणून भेरव येथील आंबा नदी पुलाजवळ पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते. सायंकाळनंतर पावसाचा जोर काहीसा ओसरल्याने नदीची पातळी स्थिरावली आणि परिस्थिती नियंत्रणात आली. मात्र, पुढील काही दिवस हवामान खात्याने मुसळधार पावसाचा इशारा कायम ठेवल्याने प्रशासनाने नागरिकांना नदीपात्र, पूल आणि सखल भागांपासून दूर राहण्याचे तसेच अत्यावश्यक कामाशिवाय प्रवास टाळण्याचे आवाहन केले आहे.

## पावसाचा तडाखा; जिल्ह्यात आठ घरे, गोठ्याचे नुकसान

यांच्या घरावर झाडाची फांदी कोसळून घराचे नुकसान झाले. रोहा तालुक्यातील पिंगळसई येथे भाग्या पवार यांचे घर कोसळले, तर खालापूर तालुक्यातील कारगाव येथे फुलबाई मुसळे यांच्या गुरांच्या गोठ्यावर झाड कोसळल्याने गोठ्याचे मोठे नुकसान झाले. अलिबाग तालुक्यातही एका घराचे नुकसान झाले आहे. या सर्व घटनांमध्ये सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. जिल्ह्यात आतापर्यंत ७८४ मिमी पावसाची नोंद झाली असून, हा सरासरीच्या ९६.६ टक्के आहे. शनिवारी (४ जुलै) सकाळी ८ वाजेपर्यंतच्या २४ तासांत १०३.८ मिमी पावसाची नोंद झाली. सततच्या पावसामुळे नागोठणे येथील अंबा नदी, रोहा येथील कुंडलिका नदी आणि खालापूरमधील पाताळगंगा नदी यांनी इशारा पातळी ओलांडली आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांतील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले असून, पूरस्थिती निर्माण झाल्यास सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्याच्या सूचनाही प्रशासनाने दिल्या आहेत. दरम्यान, हेटवणे मध्यम प्रकल्पात ३२.८० टक्के जलसाठा झाला असून जिल्ह्यातील २८ लघुपाटबंधारे प्रकल्पांपैकी पाच धरणे पूर्ण क्षमतेने भरली आहेत. मुंबई-गोवा महामार्गावरील काही सखल भागांमध्ये पाणी साचल्याने वाहतुकीचा वेग मंदावला असला तरी वाहतूक सुरू असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. हवामान विभागाने रविवार (५ जुलै) आणि मंगळवार (७ जुलै) या दिवशी ऑरेंज अलर्ट, सोमवार (६ जुलै) रोजी रेड अलर्ट, तर बुधवार (८ जुलै) रोजी यलो अलर्ट जारी केला आहे. त्यामुळे नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळावा, नदी-नाले, धबधबे आणि सखल भागांपासून दूर राहावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## भांडूपमध्ये रस्ता खचला

मुंबईत पाऊस सुरू असल्याने अनेक ठिकाणी दुर्घटना घडल्या आहेत. माटुंगा, दादर यासारख्या भागात झाडे उन्मळून पडली आहेत. या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. असे असतानाच आता भांडूप परिसरात मोठी दुर्घटना घडली आहे. भांडूपमध्ये भलामोठा रस्ता खचला आहे.मुंबईत सुरू असलेल्या सध्याच्या मुसळधार पावसामुळे भांडूपमधील सोनपूर येथील एलबीएस परिसरातील रस्ता खचला आहे. या रस्त्याच्या बाजूलाच खोदकाम सुरू असल्याने ही दुर्घटना घडली आहे. रस्ता खचनाताचा प्रसंग कॅमेऱ्यात कैद झाला आहे. या दुर्घटनेत रस्त्यावरील झाडही उन्मळून पडले आहे. गेल्या काही दिवसांपासून बरसत असलेल्या मुसळधार पावसामुळे या भागातील जमीन ओली झाली होती. परिणामी आता रस्ता खचून गेला आहे.

## महाबळेश्वरजवळील नावली गावात जमीन खचली

या घटनेतील सर्वात गंभीर बाब म्हणजे, गावातील पाण्याची उंच टाकी ज्या जमिनीवर उभी आहे, तो भागही खचल्याने ही टाकी आता धोकादायक स्थितीत आहे. जमीन आणखी खचल्यास ही पाण्याची टाकी कधीही कोसळण्याची भीती व्यक्त केली जात आहे. जर ही टाकी कोसळली, तर तिच्या खालच्या बाजूला असलेल्या घरांना आणि वस्त्यांना मोठा धोका निर्माण होऊ शकतो. यामुळे प्रशासनासमोर आता मोठे आव्हान उभे राहिले आहे.

घटनेचे गांभीर्य ओळखून महसूल विभाग, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा, ग्रामपंचायत आणि स्थानिक प्रशासनाचे अधिकारी तातडीने नावली गावात दाखल झाले आहेत. सध्या परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी सुरू असून झालेल्या नुकसानाचा पंचनामा केला जात आहे. कोणतीही जीवितहानी टाळण्यासाठी प्रशासनाने तात्काळ उपाययोजना हाती घेतल्या असून, गरज भासल्यास अतिधोकादायक भागातील नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्याची पूर्ण तयारी करण्यात आली आहे.

## पावसाच्या ढगांमध्ये आढळला ब्लॅक कार्बन

तापमानवाढीमुळे ढगांमधील लहान जलबिंदूंचे पावसाच्या थेंबात रूपांतर होण्याऐवजी त्यांचे बाष्पीभवन होते. याला सेमी-डायरेक्ट इफेक्ट म्हणतात. यामुळे पावसाच्या निर्मितीला अडथळा होतो. त्यामुळं कमी पाऊस पडण्याची शक्यता निर्माण होते, असी माहिती शास्त्रज्ञांनी दिली आहे. संशोधकांनी दिलेल्या माहितीनुसार, ढगांच्या खालच्या भागात हवेत ब्लॅक कार्बनचे प्रमाण सर्वाधिक असल्याचं समोर आले आहे.

# पनवेलच्या जुन्या पोस्टाची इमारत जमीनदोस्त



**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

शहराच्या इतिहासाचा अविभाज्य भाग ठरलेली जुनी पोस्ट ऑफिसची इमारत अखेर जमीनदोस्त करण्यात आली. सुमारे शंभर वर्षांहून अधिक काळ शहरातील नागरिकांच्या सुख-दुःखाची साक्षीदार असलेल्या या वास्तूच्या पाडकामामुळे अनेक पनवेलकरांच्या आठवणींना उजाळा मिळाला असून, जुन्या पिढीने हळहळ व्यक्त केली आहे.

एकेकाळी पत्रव्यवहाराचे प्रमुख केंद्र असलेल्या या पोस्टातून हजारो पत्रे, मनीऑर्डर, पार्सल, नोंदणीकृत पत्रे आणि सरकारी कागदपत्रांची देवाणघेवाण होत असे. मोबाईल आणि इंटरनेटपूर्व काळात नागरिकांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना याच पोस्टामार्फत पोहोचत असत. वास्तू जीर्ण आणि धोकादायक झाल्याने सुरक्षेच्या कारणास्तव प्रशासनाने तिचे पाडकाम करण्याचा निर्णय घेतला. काही वर्षांपूर्वीच पोस्ट कार्यालयाचे कामकाज नवीन इमारतीत स्थलांतरित करण्यात आले होते. त्यानंतर ही इमारत रिकामी होती. जुन्या पोस्टाच्या जागी भविष्यात कोणता विकास प्रकल्प उभारला जाणार, याबाबत उत्सुकता व्यक्त होत आहे. मात्र, या वास्तूच्या पाडकामामुळे पनवेलच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशातील एक महत्त्वाचे पान कायमचे बंद झाल्याची भावना अनेक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# उरण जलमय, प्रशासन झोपेत?



■ बेकायदेशीर भरावामुळे पूरस्थिती

■ जनजीवन पूर्णपणे विस्कळीत

| उरण-चिरनेर | प्रतिनिधी |

शनिवारी सकाळपासून उरण शहरासह संपूर्ण तालुक्यात जोरदार पाऊस सुरू झाल्याने नागरिकांची चांगलीच दाणादाण उडाली. येथील अनेक सखल भाग जलमय झाले आहेत. चिरनेर गावात पुरपरिस्थिती निर्माण झाली असून, इतर गावातील रहिवाशांच्या घरात पुराचे पाणी शिरल्याने जीवनावश्यक वस्तूंचे नुकसान झाले आहे. दरवर्षी हीच परिस्थिती असताना कोट्यवधी रुपयांचा विकास नेमका कुठे झाला, असा संतप्त सवाल आता उरणकर विचारू लागले आहेत.

उरण तालुक्यात शनिवारी (दि.४) सकाळपासून जोर धरल्यामुळे चिरनेर गावाला पुन्हा एकदा पुराच्या पाण्याचा जोरदार फटका बसला आहे. येथील नागरिकांच्या घरात पुराचे पाणी घुसून संसार उपयोगी सामानाबरोबर चीज वस्तूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच, पाणी निचरा होण्याचे नैसर्गिक मार्ग बंद झाल्यामुळे येथील शेतजमीनी देखील पाण्याखाली आल्या असून, शेतकऱ्यांनी आताच टाकलेले भाताचे बियाणे पाण्यात बुडून गेले आहे. त्याचबरोबर चिरनेरसह नागाव, कळंबुसरे, मोठीजुई, विंधणे, दिघोडे, वेश्वी पाले इत्यादी गावांनाही पुराचा फटका बसला आहे. तर कातळपाडा, मधीलपाडा, रांजणपाडा चिंचपाडा, मुळपाडा, कुंभारपाडा येथे रहिवाशांच्या घरात पाणी शिरून मोठे नुकसान झाले आहे. कातळपाडा हद्दीत येणारी माथेरान ही नवीन वसाहत देखील जलमय होऊन, येथील रहिवाशांच्या घरात पाणी शिरून घरांची तळी झाली आहेत. त्याचबरोबर उरण रेल्वे स्थानक परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने प्रवाशांना चक्क पाण्यातून वाट काढत प्रवास करावा लागत आहे. शहरातील अनेक प्रमुख रस्त्यांवर देखील गुडघाभर पाणी साचल्याने वाहतुकीचा पूर्ण बोजवारा उडाला आहे.

दरम्यान, सत्र न्यायालयाच्या पायऱ्यांपर्यंत पाणी पोहोचले होते. तर शिवसेना शाखा परिसर, नयन अपार्टमेंट परिसर, इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाकडे जाणारा रस्ता तसेच अनेक निवासी व व्यावसायिक भाग पाण्याखाली गेल्याने नागरिकांना अक्षरशः घरात कैद व्हावे लागत आहे. जर, काही तासांच्या पावसाने संपूर्ण तालुक्याची दाणादाण उडत असेल, तर भविष्यात अतिवृष्टी झाल्यावर परिस्थिती किती भीषण होईल, याचीच चिंता नागरिकांधून व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर उरण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी पूरग्रस्त भागांची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांनी सत्र न्यायालय परिसरासह विविध भागांना भेट देऊन अधिकाऱ्यांना तातडीने पाण्याचा निचरा करण्याचे, अडकलेल्या नागरिकांना मदत करण्याचे आणि आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देश दिले. मात्र, या संपूर्ण पूरस्थितीदरम्यान इतर अनेक शासकीय यंत्रणा ना पूरग्रस्त भागांची प्रभावी पाहणी करताना दिसल्या, ना नागरिकांमध्ये जनजागृती करताना दिसल्या. संभाव्य धोकादायक ठिकाणी सावधानतेचे फलक, वाहतूक नियंत्रण, सुरक्षिततेबाबत सूचना किंवा नागरिकांना सतर्क करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात आल्याचेही दिसून आले नाही, अशी तीव्र नाराजी नागरिकांमधून व्यक्त होत आहे. तसेच, आपत्तीच्या काळात प्रशासनाचा समन्वय आणि जनजागृती ही तितकीच महत्त्वाची असताना संबंधित यंत्रणांची अनुपस्थिती अनेकांच्या चर्चेचा विषय ठरत आहे. मात्र, या संपूर्ण परिस्थितीला केवळ मुसळधार पाऊस जबाबदार नसून, गावोगावी झालेले कथित बेकायदेशीर भराव, खाड्या व समुद्रकिनारी नैसर्गिक जलमार्गांवर करण्यात आलेली अनधिकृत बांधकामे, डेब्रिज टाकून समुद्र आणि खाड्या बुजविण्याचे प्रकार त्याचबरोबर नैसर्गिक नाल्यांची गळचेपी यामुळेच पावसाचे पाणी वाहून जाण्याचे मार्ग बंद होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

### नियम मोडणाऱ्यांमुळे सामान्यांना शिक्षा

आज नैसर्गिक जलमार्ग बुजले, नाले अडले, खाड्या अरुंद झाल्या आणि त्याचा फटका थेट सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. ज्यांनी नियम मोडले ते सुरक्षित, पण शिक्षा मात्र सामान्य उरणकरांना भोगावी लागत आहे. आता नागरिकांनी स्पष्ट मागणी केली आहे की, उरणमधील सर्व कथित बेकायदेशीर भराव, समुद्र व खाडी परिसरातील अनधिकृत बांधकामे, डेब्रिज टाकून तयार करण्यात आलेल्या जागांची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी. नैसर्गिक जलमार्ग अडविणाऱ्यांवर कठोर कारवाई करून ते मार्ग तातडीने मोकळे करावेत. तसेच, कायमस्वरूपी पूरनियंत्रण आराखडा तयार करण्याची मागणीही जोर धरू लागली आहे.

## निवडक



### नागोठण्यातील जंगलात गुरांची कत्तल

**रसायनी** : गोवंश जातीच्या प्राण्यांची कत्तल करून त्यांच्या मांसाचे तुकडे करत असलेल्या तिघांच्या नागोठणे पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. त्यात मिरानगर येथील मुझफ्फर इकबाल पानसरे, नवाब मोहम्मद शेख व समीर अयुब शेख या तिघांचा समावेश आहे. याप्रकरणी नागोठणे पोलीस ठाण्यात शुक्रवारी (दि.३) मध्यरात्री गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नागोठण्यातील मिरानगर भागात असलेल्या जंगलात गोवंश जातीच्या प्राण्यांची कत्तल होत असल्याची माहिती गुरुवारी (दि.२) नागोठणे पोलिसांना मिळाली. त्यानुसार नागोठणे पोलिसांनी सायंकाळच्या सुमारास घटनास्थळी धाड टाकली. यावेळी तीघेजण गोवंश जातीच्या दोन प्राण्यांची कत्तल करून त्या प्राण्यांच्या मांसाचे तुकडे करीत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. दरम्यान, पोलिसांना पाहताच तेथून पळून जाणाऱ्या तिघांच्या पोलिसांनी मुसक्या आवळून त्यांना ताब्यात घेतले. यावेळी २ गोवंश प्राण्याचे कत्तल करण्यात आलेले मांस जप्त करण्यात आले असून, एका गाईला वाचवण्यात यश आले आहे. जप्त केलेल्या गोमांस मालाची एकूण किंमत ३० हजार ६६० रुपये असल्याची माहिती नागोठणे पोलिसांकडून देण्यात आली आहे.

### पोलिसांकडून बेपत्ता महिलेचा शोध

**महाड** : पोलीस ठाण्यात दि.१ जुलै रोजी एका महिलेसह तिच्या ७ महिन्यांच्या बालकाच्या बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास महाडचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे यांच्या मार्गदर्शनाखाली हाती घेण्यात आला. या तपासादरम्यान बेपत्ता महिला प्रिया प्रशांत चिकणे (२४) यांच्या मोबाईल क्रमांकाचे व तांत्रिक विश्लेषण करण्यात आले. तसेच, त्यांच्या संपर्कातील मोबाईल क्रमांकांचे विश्लेषण पोलीस अमलदार बल्लाळ यांनी केले. या तांत्रिक तपासातून संबंधित मोबाईलचे लोकेशन पुणे जिल्ह्यातील कळंब परिसरात असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे यांनी विशेष तपास पथक पुण्याकडे रवाना केले. पोलीस हवालदार पवार व पोलीस अमलदार बल्लाळ यांनी पुण्यातील शिवाजीनगर व वाकडेवाडी बसस्टॉप परिसरात शोधमोहीम राबवून बेपत्ता महिला प्रिया चिकणे व त्यांचा ७ महिन्यांचा मुलगा प्रिन्स यांचा सुखरूप शोध लावला. त्यानंतर दोघांनाही त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात सुखरूप देण्यात आले.



### खांदा वसाहतीतील रस्त्यांचा बोजवारा

**खांदा कॉलनी** : खांदा वसाहतीतील विविध सेक्टरमध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहे. दोन ते चार महिन्यांपूर्वी पनवेल महापालिकेकडून खड्डे बुजविण्यासाठी करण्यात आलेले डांबरी पॅचवर्क पहिल्याच पावसात उखडल्याने कामाच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सध्या अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून, त्यामध्ये पावसाचे पाणी साचत असल्याने वाहनचालकांना खड्ड्यांचा अंदाज येत नाही. त्यामुळे दुचाकीस्वारांसह चारचाकी चालकांनाही मोठी कसरत करावी लागत आहे. तसेच, दिवसेंदिवस या खड्ड्यांचा आकार वाढत असून, अपघाताचा धोका अधिक गंभीर होत आहे. स्थानिक रहिवाशांचे म्हणणे आहे की, दरवर्षी पावसाळ्यापूर्वी तात्पुरते पॅचवर्क केले जाते; मात्र, ते काही महिनेसुद्धा टिकत नाही. सार्वजनिक निधी खर्च करूनही दर्जेदार आणि टिकाऊ काम होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

### श्रीवर्धनमध्ये पाण्याचा प्रश्न ऐरणीवर

**श्रीवर्धन** : गेले काही महिने श्रीवर्धनमध्ये नळाद्वारे होणाऱ्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सुमारे दोन वर्षांपूर्वी रानवली धरणामधून श्रीवर्धन व नजिकच्या काही गावांना पिण्याचे पाणी पुरविणाऱ्या जुन्या पाईप लाईन बदलून त्या जागी लाखो रुपये खर्च करुन नवीन पाईप लाईन टाकण्यात आल्या होत्या. तसेच, जलशुद्धीकरण केंद्रही बांधण्यात आले होते. त्याचा मोठा गाजावाजा करून समारंभपूर्वक उद्घाटनही करण्यात आले होते. परंतु, काही महिन्यातच ठिकठिकाणी पाण्याच्या पाईप लाईन फुटायलाही लागल्या आहेत. त्यामुळे हजारो लिटर पाणी वाया जाऊ लागले असून, नागरिकांना पिण्यासाठी असलेले पाणी खूप कमी पडू लागले आहे.नळपाणी पुरवठा आल्यामुळे श्रीवर्धनमधील अनेक विहिरीही बुजविण्यात आल्या आहेत. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी नळ हे एकच साधन त्यांच्याजवळ राहिले आहे. त्यामुळे दोन-दोन दिवस पाणी पुरवठा खंडीत होत असल्याने नागरिकांची मोठीच गैरसोय होत आहे.

## खारघरमध्ये दोन झाडे कोसळली

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पाऊस आणि जोरदार वाऱ्यामुळे खारघर सेक्टर ११ परिसरात जनजीवन विस्कळीत झाले आहे. येथील मार्केटसमोरील रस्त्यावर दोन मोठी झाडे कोसळल्याची घटना घडली आहे. यापैकी एक झाड थेट मच्छी विक्रेत्याच्या स्टॉलवर आणि फुटपाथवर कोसळल्याने मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. दरम्यान, झाडे रस्त्यावर पडल्याने काही काळ वाहतुकीलाही अडथळा निर्माण झाला होता. तसेच, घटनास्थळी एक चेंबर उघडे असून, ते वीज यंत्रणेचे आहे की गटाराचे, याबाबत स्पष्टता नसली तरी ते नागरिकांसाठी अत्यंत धोकादायक ठरत आहे. पावसाचे पाणी साचल्यामुळे हा खड्डा दिसून येत नसल्याने पादचारी आणि वाहनचालकांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. स्थानिक नागरिकांनी संबंधित प्रशासनाने तातडीने कोसळलेली झाडे हटवून उघड्या चेंबरवर सुरक्षित झाकण बसवावे, तसेच परिसराची पाहणी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.





दमदार पावसामुळे निसर्गात सर्वत्र हिरवळ पसरली आहे. म्हसळा तालुक्यातील मांदाटणे परिसरातील विहिरी पाण्याने पूर्णतः भरल्याने निर्सगाचे रूप आणखी खुलून दिसत आहे. (छायाचित्रः अमेय नाझरे)

## ग्रा.पं. निवडणुकीसाठी शेकापची मोर्चेबांधणी



| चणेरा | प्रतिनीधी |

रोहा तालुका शेतकरी कामगार पक्षाची महत्त्वपूर्ण सभा रोह्यात पार पडली. यावेळी आगामी ग्रामपंचायत निवडणुका, पक्ष संघटन मजबूत करणे, तसेच स्मार्ट मीटरविरोधातील आंदोलन या प्रमुख विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.

या सभेच्या प्रारंभी तालुका चिटणीस शिवराम महाबले यांनी पक्षाची भूमिका, विचारधारा आणि संघटनात्मक धोरण याविषयी कार्यकर्त्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी दि. २ ऑगस्ट रोजी साजरा होणाऱ्या शेकापच्या वर्धापन दिनाचे महत्त्व विशद केले. तसेच, राज्यभर सुरू असलेल्या स्मार्ट मीटर योजनेविरोधात पक्षाच्या भूमिकेची माहिती देत दि. ६ जुलै रोजी रोहा तहसीलदारांना निवेदन देण्यात येणार असून, सर्व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले. आरडीसीसी बँकेचे संचालक गणेश मढवी यांनी, आगामी ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये शेकापचे उमेदवार उभे करून पक्षाची ताकद दाखविण्याची गरज व्यक्त केली. प्रत्येक शाखेने निवडणुकांच्या तयारीला आतापासून सुरुवात करून संघटन अधिक सक्षम करण्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे, असे त्यांनी सांगितले. या सभेला ज्येष्ठ कार्यकर्ते शंकरराव म्हसकर, आरडीसीसी बँकेचे चेअरमन गणेश मढवी, जिल्हा चिटणीस सदस्य विठ्ठल मोरे, रोहा तालुका चिटणीस शिवराम महाबळे, मजूर फेडरेशनचे हेमंत ठाकूर, कार्यालयीन चिटणीस संदेश विचारे, पुरोगामी युवक संघटना रोहा अध्यक्ष संतोष दिवकर, उपाध्यक्ष अमोल शिंगरे, ज्येष्ठ कार्यकर्ते खांडेकर, तुकाराम खांडेकर, गणपत डाकी, जांभेकर, धनंजय पोकळे, सरफळे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## माथेरानमध्ये ई-रिक्षा पलटी

| नेरळ | प्रतिनिधी |



माथेरानमध्ये लाल मातीच्या खराब रस्त्यामुळे ई-रिक्षा प्रवाशांची वाहतूक करीत असताना कलंडल्याची घटना घडली. यावेळी या ई-रिक्षामधून प्रवास करणारे दोन वृद्ध गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना उपचार करण्यासाठी रुग्णालयात दाखल केले आहे.

माथेरानमधील अमन लॉज परिसरात रस्त्यावरील पेवर ब्लॉक उखडल्याने ई-रिक्षा उलटून हा अपघात घडला. या ई-रिक्षामधून माथेरान मुस्लिम मोहल्ल्यातील अब्बास महापुले आणि नूरजहाँ महापुले हे वृद्ध दांपत्य दस्तुरीच्या दिशेने जात होते. त्यावेळी काळोखी भागातील उखडलेल्या रस्त्यावरील क्ले पेव्हर ब्लॉकवरून रिक्षाचा टायर घसरला आणि चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने रिक्षा उलटली. या अपघातात वृद्ध दांपत्यासह रिक्षाचालकही गंभीर जखमी झाले असून, दोघांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना नेरळ येथे उपचारासाठी पाठवून देण्यात आले आहे. या दुर्घटनेसाठी रस्त्यांची झालेली दुर्दशा जबाबदार असल्याचा थेट आरोप जखमी महापुले दांपत्याने केला आहे.

## माथेरानमध्ये झाडाच्या बियांची पेरणी

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरानमधील जंगल आणखी घनदाट व्हावे, यासाठी दरवर्षी झाडांची लागवड शासनाच्या विविध संस्था करीत असतात. त्याच प्रकारचे कार्य पर्यावरण प्रेमी तरुणांनी हाती घेतले आहे. या तरुणांनी जंगलात जाऊन विविध झाडांच्या बियांची पेरणी विविध भागात केली आहे. त्यांच्या या उपक्रमाचे कौतुक होत असून, हे सर्व तरुण नेरळ आणि माथेरान परिसरातील आहेत.



माथेरान परिसर हिरवागार व्हावा, यासाठी अनेकांचा हातभार असतो. नुकतीच माथेरानवर प्रेम करणाऱ्या निसर्गप्रेमी तरुणांनी माथेरान आणखी हिरवागार करण्यासाठी मोहीम हाती घेतली आहे. येथील निसर्ग संवर्धन, जैवविविधतेचे जतन आणि भविष्यात अधिकाधिक वृक्षनिर्मिती व्हावी, या उद्देशाने बियांची पेरणी आणि प्रसारण अभियान राबविले. पर्यावरण संरक्षण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून, प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या परिसरात वृक्षसंवर्धन आणि निसर्गरक्षणासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. या उपक्रमाला स्थानिक नागरिकांचे मोलाचे सहकार्य लाभले असून, भविष्यातही अशाच प्रकारचे पर्यावरणपूरक उपक्रम सातत्याने राबवून माथेरान परिसर अधिक हिरवागार, समृद्ध आणि पर्यावरणदृष्ट्या सक्षम करण्याचा संकल्प सहभागी सदस्यांनी व्यक्त केला. या मोहिमते मोहित तांडेल, वैभव पटवर्धन, रत्नाकर पाटील, रुपेश कळंबे, प्रमोद शेळके आणि राजाराम यांनी सहभाग घेतला होता.

## रेवदंड्यात बाप्पाच्या कारागिरांची लगबग

| रेवदंडा | प्रतिनिधी |

गणेशोत्सव अवघ्या दोन महिन्यांवर येऊन ठेपला असून, घराघरांत बाप्पाच्या आगमनाची तयारी सुरू झाली आहे. या तयारीतील श्री गणेश मूर्ती निर्मिती हा सर्वात महत्त्वाचा टप्पा आहे. दरम्यान, रेवदंडा येथील हरेश्वर मंदिर परिसरातील पूजा आर्ट श्री गणेश कला केंद्रात यंदाच्या गणेशोत्सवासाठी गणेश मूर्ती घडविण्याच्या कामास उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला आहे. या कार्यशाळेत सध्या मातीच्या सुगंधात कारागिरांची लगबग सुरू असून, अनुभवी शिल्पकार भक्तिभावाने विविध आकार व मुद्रांतील गणेशमूर्तींना आकार देत आहेत.



पूजा आर्ट श्री गणेश कला केंद्राचे संचालक नंदकुमार चुनेकर गेली तब्बल ४० वर्षे श्री गणेश मूर्ती निर्मितीच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. परंपरा, गुणवत्ता आणि आकर्षक कलाकुसरीच्या बळावर त्यांनी या कला केंद्राची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या हस्तकलेतून साकारलेल्या मूर्तींना रायगडसह परिसरातील हजारो गणेशभक्तांचा वर्षानुवर्षे विश्वास आणि पसंती लाभत आहे.

**प्रवाशांचा जीवाला गंभीर धोका** | **तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा**

## नागोठणे-पेझारी रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

नागोठणे-पेझारी मार्गावर कुहिरे परिसरामध्ये रिलायन्स इंडस्ट्रीजच्या नवीन प्रकल्पाचे बांधकाम वेगाने सुरू आहे. मात्र, या बांधकामाच्या ठिकाणाहून अवजड डंपर आणि ट्रॅक्टरद्वारे मातीची वाहतूक केली जात असताना मोठ्या प्रमाणावर माती सार्वजनिक रस्त्यावर सांडत आहे. पावसाळ्याचे दिवस असल्याने या मातीचे रूपांतर मोठ्या चिखलात झाले असून, संपूर्ण नागोठणे-पेझारी रस्ता कमालीचा निसरडा झाला आहे. त्यामुळे स्थानिक नागरिक, पादचारी आणि विशेषतः दुचाकी वाहनधारकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे.



(छायाचित्र : धम्मशील सावंत)

या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते दीपक खोत यांनी पोलीस प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांना अधिकृत ईमेलद्वारे पत्र पाठवून तातडीने कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. रस्त्यावरून प्रवास करताना दुचाकी घसरून दररोज किरकोळ व गंभीर अपघात होत असून, प्रशासनाच्या सुस्त कारभारामुळे एखाद्या नागरिकाला आपला जीव गमवावा लागण्याची भीती व्यक्त होत आहे. तक्रारीत नमूद केल्यानुसार, संबंधित बांधकाम कंपनीकडून रस्त्याची नियमित साफसफाई केली जात नाही. सुरक्षिततेचा उपाय म्हणून रस्त्यावर वॉटर स्प्रिंकलर, रोड स्वीपर किंवा रिफ्लेक्टर लावलेले नाहीत. तसेच, रस्ता निसरडा आहे असे सांगणारे कोणतेही चेतावणी फलक अथवा बॅरिकेडिंग लावण्यात आलेले नाही. हा निष्काळजीपणा सार्वजनिक सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन करणारा आहे. याठिकाणी संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करावी. संबंधित दोषी कंपनीला सार्वजनिक रस्ता तात्काळ स्वच्छ ठेवण्याचे कडक आदेश द्यावेत. सुरक्षेच्या दृष्टीने मार्गावर वॉटर स्प्रिंकलर, रोड स्वीपर आणि चेतावणी फलक लावण्याचे निर्देश द्यावेत. सार्वजनिक सुरक्षेला बाधा निर्माण केल्याबद्दल जबाबदार व्यवस्थापनावर कायदेशीर गुन्हा दाखल व्हावा, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात आली आहे. तसेच, वेळेत कारवाई न झाल्यास तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

## निवडक



### कोळ्यांची जाळी विणण्यास सुरुवात

**खांदा कॉलनी** : सध्या मुसळधार पाऊस आणि समुद्र खवळलेला असल्याने मासेमारी पूर्णपणे बंद आहे. त्यामुळे शासनाच्या मासेमारी बंदीमुळे पनवेल परिसरातील कोळी बांधवांच्या होड्या किनाऱ्यावरच उभ्या आहेत. मात्र, नारळी पौर्णिमेनंतर समुद्राची पूजा करून पुन्हा मासेमारीला सुरुवात केली जाणार असल्याने कोळीवाड्यांमध्ये आतापासूनच तयारीला वेग आला आहे. यादरम्यान, कोळी बांधव पारंपरिक पद्धतीने मासे पकडण्यासाठी लागणारी जाळी विणणे, जुनी जाळी दुरुस्त करणे तसेच होड्यांची देखभाल करण्यात व्यस्त आहेत. नारळी पौर्णिमेच्या दिवशी समुद्राला नारळ अर्पण करून सुरक्षित आणि भरघोस मासेमारीसाठी प्रार्थना केली जाते. त्यानंतर पुन्हा होड्या समुद्रात उतरतात आणि मासेमारी हंगामाला सुरुवात होते. सध्या मासेमारी बंद असल्याने कोळी बांधवांवर आर्थिक संकट ओढवले असले, तरी आगामी हंगाम चांगला जावा, अशी आशा प्रत्येकाच्या मनात आहे. त्यामुळे पनवेल परिसरातील कोळीवाड्यांमध्ये जाळी विणण्याचे आणि मासेमारीसाठी आवश्यक साहित्याची तयारी करण्याचे काम जोमात सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.



(छायाचित्र : महेश पवार)


### होमिओपॅथिक असो.च्यावतीने कार्यक्रम

**नागोठणे** : डॉ. सॅम्युअल हॅनेमन यांच्या १८२ व्या पुण्यतिथीनिमित्त रोहा तालुका होमिओपॅथिक मेडिकल असो.च्यावतीने वैद्यकीय क्षेत्रातील व्यावसायिकांना त्यांच्या क्षेत्रातील नवीन संशोधन, औषधे आणि तंत्रज्ञानाबाबत अद्ययावत ठेवण्यासाठी ''सीएमई अर्थात सतत वैद्यकीय शिक्षण'' या कार्यक्रमाचे खांब-कोलाड येथे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला वक्त्या म्हणून डॉ. प्राजक्ता शहासने यांनी ''पावसाळ्यातील तीव्र आजार, त्याचे व्यवस्थापन आणि उपचार'' या विषयावर उत्कृष्ट आणि अत्यंत माहितीपूर्ण सत्र घेतले. त्यांचे व्यावहारिक ज्ञान, क्लिनिकल अनुभव आणि प्रभावी सादरीकरण उपस्थित सर्व होमिओपॅथिक डॉक्टरांसाठी खूप कौतुकास्पद ठरले. या कार्यक्रमाला रोहा तालुका होमिओपॅथिक मेडिकल असो.चे अध्यक्ष डॉ. सचिन मेस्त्री, उपाध्यक्षा डॉ. साधना झोलगे, कोषाध्यक्ष डॉ. विनोद किणीकर, रोहिदास शेळके, डॉ. ज्ञानेश्वर पाटील, डॉ. संजय पाटील, डॉ. विनोद गांधी, डॉ नरेश सोष्टे, डॉ. पुरुषोत्तम भोईर, डॉ. प्रिया भोईर, डॉ. अर्चना मेस्त्री, डॉ. अश्विनी कुथे, डॉ. योगिनी घायले, डॉ. अनामिका लोहार, डॉ. नंदिनी तेलंगे आदी मान्यवर उपस्थित होते.



### हरित दिन, बीज अंकुरण दिन

**चिरनेर** : महाराष्ट्र कृषी दिनाच्या निमित्ताने विंधणे येथील बी.एस. पाटील इंग्लिश मीडियम स्कूल येथे हरित दिन व बीज अंकुरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धन, वृक्षांचे महत्त्व आणि शेतीविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी बीज अंकुरण प्रक्रियेचे प्रात्यक्षिक, वृक्षसंवर्धनाचे महत्त्व आणि पर्यावरण संरक्षणाशी संबंधित विविध उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना वृक्षांचे महत्त्व, निसर्गाशी असलेले आपले नाते आणि पर्यावरण संतुलन राखण्यासाठी प्रत्येकाने योगदान देण्याची गरज याविषयी मार्गदर्शन मिळाले. शाळेचे संस्थापक अध्यक्ष कैलास बी. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वृक्ष लागवड, वृक्षसंवर्धन आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अवलंब करण्याचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी विद्यार्थ्यांना निसर्गप्रेमी व जबाबदार नागरिक बनण्याचे आवाहन केले.



### डॉक्टर्स डे रक्तदानाने साजरा

**महाड** : रोटरी वर्ष २०२६-२७ ची सुरुवात समाजोपयोगी उपक्रमाने करत, डॉक्टर्स डे निमित्त रोटरी क्लब ऑफ महाड व डॉक्टर्स असोसिएशन ऑफ महाड यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन रोटेरियन चिरंजीव माथुर यांच्या हस्ते करण्यात आले. ''रक्तदान हेच श्रेष्ठ दान'' असून, गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, या सामाजिक भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सुमारे ३५ ते ४० रक्तदात्यांनी रक्तदान करून आपले सामाजिक कर्तव्य पार पाडले. यावेळी रोटरी क्लब ऑफ महाडचे अध्यक्ष राजीव वनारसे, सचिव नितीन जोशी, खजिनदार दीपक शिंदे, जगदीश भानुषाली, द्वारकानाथ गुरव, पी.पी. सुधीर मांडवकर, नेहा मेहता, पी.पी. अण्णा राय, शीलवंत, अरुणा शीलवंत, रक्तदान शिबिराचे चेअरमन डॉ. राहुल सुकाळे, डॉ.नूतन सुकाळे, पी.पी. अरुण गावडे यांच्यासह रोटरी क्लबचे अनेक सदस्य उपस्थित होते.

### अनिल पाटील यांची निवड



**रसायनी** : गुळसुंदे येथील अनिल पाटील हे सद्या लोकनेते दि.बा.पाटील विद्यालय कामोठे या शाखेत उपशिक्षक या पदावर कार्यरत आहेत. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्यातर्फे त्यांची पाठ्यपुस्तक मंडळाच्या गणित या विषयाच्या समितीवर सदस्यपदी निवड झाली आहे. इयत्ता सहावी गणिताच्या नवीन पाठ्यपुस्तकासाठी अनिल पाटील यांनी लेखक म्हणून काम केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रामशेठ ठाकूर, रायगड विभागीय चेअरमन बाळाराम पाटील, विभागीय अधिकारी कोंगेरे एम.के., सहाय्यक विभागीय अधिकारी जगताप व्ही.यू. यांनी त्यांचे कौतुक केले.

# लोना इंडस्ट्रिज कंपनीवर गुन्हा दाखल

## • नमुना संकलन प्रक्रियेत गंभीर त्रुटी? • निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी

| रसायनी-आपटा | प्रतिनिधी |

रसायनीतील लाडिवली गुळसुंदे येथील लोना इंडस्ट्रिज प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या गोडाऊनमध्ये ठेवलेल्या इंडस्ट्रियल युरिया खताचा नमूना नाशिक प्रयोगशाळेत पाठविण्यात आला होता. त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार या नमुन्यामध्ये शासकिय अनुदानित निम कोटेडयुक्त युरिया असल्याचे सिद्ध झाले. त्यामुळे याप्रकरणी लोना इंडस्ट्रिज कंपनीवर दि.२ जुलै रोजी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




एका बाजूला कृषी विभागाने प्रयोगशाळेच्या अहवालाच्या आधारे कंपनीवर शासकीय अनुदानित निम-कोटेड युरियाचा कथित गैरवापर केल्याचा आरोप केला आहे. तर, दुसऱ्या बाजूला कंपनीने संपूर्ण कारवाईलाच आव्हान देत नमुना संकलन प्रक्रियेत गंभीर त्रुटी झाल्याचा दावा केला आहे. कृषी विभागाच्या माहितीनुसार, लाडवली येथील लोना इंडस्ट्रीजच्या गोडाऊनमध्ये ठेवलेल्या ५५९ मेट्रिक टन इंडस्ट्रियल युरिया साठ्यातून अधिकाऱ्यांनी नमुने संकलित केले होते. ते नाशिक येथील नमुने खत चाचणी प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. प्रयोगशाळेकडून प्राप्त झालेल्या अधिकृत अहवालानुसार, संबंधित नमुन्यामध्ये शासकीय अनुदानित निम-कोटेड युरिया असल्याचे निष्पन्न झाल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यानुसार कंपनीने औद्योगिक वापराच्या नावाखाली शासकीय अनुदानित निम-कोटेड युरियाचा अनधिकृत वापर करून आर्थिक फायदा मिळविण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची तक्रार पनवेल येथील गुन्हा नियंत्रण कृषी अधिकारी तानाजी दोलतोडे यांनी दिली होती.

दरम्यान, लोना इंडस्ट्रीज कंपनीने प्रसिद्ध केलेल्या खुलाशात सर्व आरोप फेटाळून लावत कृषी विभागाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. कंपनीच्या म्हणण्यानुसार, दि.१५ एप्रिल रोजी कृषी अधिकारी नमुने घेण्यासाठी कंपनीत आले असता त्यांच्याकडे अधिकृत सीलबंद पिशव्या आणि आवश्यक साहित्य उपलब्ध नव्हते. त्यामुळे नमुने साध्या प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये घेण्यात आले. त्यानंतर सुमारे २४ तासांनी अधिकारी पुन्हा येऊन ते नमुने सीलबंद करण्यात आले. ही प्रक्रिया नियमानुसार झाली नसल्याचा दावा कंपनीने केला आहे. पुढे असा आरोप केला आहे की, दि.२६ जून रोजी मोहरमच्या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी अधिकारी पुन्हा कंपनीत आले आणि त्यावेळी पंचांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या. मात्र, प्रत्यक्ष नमुना संकलन दि.१५ एप्रिल रोजी झाला असताना पंचांच्या स्वाक्षऱ्या त्याच दिवशी न घेता दोन महिन्यांनंतर घेण्यात आल्याने संपूर्ण पंचनाम्याच्या वैधतेवर प्रश्न निर्माण होत असल्याचे कंपनीचे म्हणणे आहे. याशिवाय, नमुना संकलनाच्या दीर्घ कालावधीनंतर दि.२ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आल्याबाबतही कंपनीने संशय व्यक्त केला आहे.

### कंपनीवरील आरोप बिनबुडाचे?

कंपनीने आपल्या निवेदनात, शेतीसाठी वापरला जाणारा शासकीय अनुदानित निम-कोटेड युरिया आपण कधीही वापरलेला नाही आणि भविष्यातही वापरणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे आपल्यावरील आरोप बिनबुडाचे असून, संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष पारदर्शक आणि सखोल चौकशी झाल्यास सत्य समोर येईल, असा विश्वास कंपनीने व्यक्त केला आहे. दरम्यान, एका बाजूला शासकीय प्रयोगशाळेचा अहवाल आणि त्याआधारे दाखल झालेला गुन्हा, तर दुसऱ्या बाजूला नमुना संकलन प्रक्रियेतील कथित त्रुटी, पंचनाम्याची वैधता आणि कारवाईतील विलंबाबाबत कंपनीने उपस्थित केलेले प्रश्न यामुळे हे प्रकरण अधिकच चर्चेत आले आहे. आता या प्रकरणातील पोलीस तपास आणि पुढील न्यायालयीन प्रक्रियेत वस्तुस्थिती स्पष्ट होणार असल्याने संपूर्ण औद्योगिक क्षेत्राचे लक्ष या तपासाकडे लागले आहे.



### विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याचे वाटप

| रसायनी | प्रतिनिधी |

रसायनी पाताळगंगा परिसरातील सामाजिक कार्यकर्ते धनाजी पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त कासप व कालीवली येथील रायगड जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना लागणाऱ्या शाळोपयोगी साहित्यांचे वाटप करण्यात आले. त्यात वही, पेन, पेन्सिल, खोडरबर, शार्पनर, फुटपट्टी व खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी शाळेय शिक्षक रूपाली काळे, निशा पाटील, मोहन खोमणे, सुनीता खोमणे, समाजसेवक मंगेश पाटील, अशोक कचरे, नामदेव पाटील, राज फाटक, धनश्री पाटील, दर्शना पाटील, सुरेखा पाटील, अर्चना पाटील, आकांक्षा पाटील, शालेय शिक्षण व्यवस्थापन कमिटी, विद्यार्थी, महिला वर्ग व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अमोल चाळके यांची नियुक्ती

**नेरळ** : नांदगाव केंद्रप्रमुख म्हणून अमोल चोळके यांची शासनाने नियुक्ती केली आहे. त्यांनी नुकतेच आपल्या पदाचा कार्यभार पूर्वीचे केंद्रप्रमुख बाळासाहेब पालवे यांचेकडून स्वीकारला आहे. दरम्यान, झुगरे वाडी शाळेच्या भेटीप्रसंगी शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांचा सत्कार करतांना त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मुख्याध्यापक रवी काजळे यांनी याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करतांना झुगरे वाडी शाळेच्या प्रगतीचा लेखाजोखा मांडला. त्यानंतर शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून विशेष मेहनत घेणाऱ्या राजश्री पाटील, अनु पादीर आणि तृया पारधी यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

### हयातीचे दाखले उपलब्ध करण्याची सोय

| रसायनी | प्रतिनिधी |

केंद्र व राज्य पुरस्कृत योजना अंतर्गत संजय गांधी निराधार योजना, दिव्यांग लाभार्थी, श्रावणबाळ योजना व इंदिरा गांधी योजनेच्या लाभार्थ्यांना हयातीचे दाखले उपलब्ध करण्याची सोय खालापूर तहसील कार्यालयात करून देण्यात आल्याने लाभार्थ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे. शासनाच्या विविध योजनांसाठी दरवर्षी एप्रिल ते जुलै अखेर हयात प्रमाणपत्र सादर करावे लागते. यावर्षी शासनातर्फे लाभार्थ्यांना ऑनलाईन हयात प्रमाणपत्र काढण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहेत. तसेच, शासनातर्फे खालापूर तालुक्यातील सर्व ई-सेवा केंद्रावरही ऑनलाईन हयात प्रमाणपत्र काढण्याची सोय उपलब्ध करून दिली आहे. तरीही तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागातील संजय गांधी निराधार योजना आणि ईतर लाभार्थ्यांचा प्रतिसाद कमी दिसून आला आहे. त्यामुळे खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी आपले सर्व ग्राम महसूल अधिकाऱ्यांना त्यांच्या सजेत लाभार्थ्यांचे ऑनलाईन हयात दाखले काढण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच, तहसीलदार अभय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली संजय गांधी योजना शाखेचे नायब तहसीलदार मिलिंद तिऱ्हेकर व मंडळ अधिकारी खोपोली भरत सावंत यांनी खोपोलीतील लाभार्थ्यांचे ऑनलाईन हयात दाखले काढण्यासाठी शिबीर आयोजित केले होते.



| रसायनी | प्रतिनिधी |

### भूतम भयम चित्रपटाचे प्रमोशन

भयपट आणि विनोदाचे उत्कृष्ट मिश्रण असलेला आगामी बहुप्रतीक्षित चित्रपट ''भूतम भयम''चे धमाकेदार प्रमोशन रसायनीतील पिल्लई कॅम्पसमध्ये अत्यंत उत्साहात पार पडले. या खास सोहळ्यादरम्यान चित्रपटातील मुख्य कलाकारांनी हजेरी लावत कॉलेजच्या विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला आणि त्यांच्यासोबत जोरदार धमाल केली.

या सिनेमाच्या प्रमोशनदरम्यान भूतम भयम चित्रपटाचा अधिकृत टिझर प्रदर्शित करण्यात आला. त्याला कॉलेजच्या तरुण वर्गाकडून अत्यंत सकारात्मक आणि उदंड प्रतिसाद मिळाला. टिझरमधील रहस्य आणि विनोदाची अचूक झलक पाहून विद्यार्थ्यांमध्ये चित्रपटाबद्दलची उत्सुकता कमालीची वाढली आहे. हा चित्रपट दि.२४ जुलै रोजी चित्रपट गृहात पडद्यावर झळकणार आहे. दिग्दर्शक रामचंद्र गांवकर यांनी सांगितले की, हा चित्रपट सात बेरोजगार मित्रांची कथा आहे, जे एका रहस्यमय घटनेत अडकतात. या भयानक आणि गूढ प्रवासातून जाताना निर्माण होणारा निखळ विनोद आणि कलाकारांचा कसदार अभिनय प्रेक्षकांची मने नक्कीच जिंकेल. हा चित्रपट निव्वळ मनोरंजन करणारा नसून मैत्रीचा एक सुरेख संदेश देणारा आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यात करण सोनावणे, नील सालेकर, सौरभ घाडगे, सिद्धांत सर्फरे, शुभम जाधव, पुष्कराज चिरपूटकर आणि मनमीत पेम हे मुख्य भूमिकेत आहेत.



### फिजिओथेरपी कँपचे आयोजन

**आगरदंडा** : मुरूड-जंजिरा नगरपरिषद व कर्जतमधील डॉ. एन.वाय.तासगावकर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी यांच्या संयुक्त विद्यमाने मुरूड शहरातील ग्रामीण रुग्णालय, मुरूड लेडीकुलसुम बेगम व फातिमा बेगम रुग्णालयात फिजिओथेरपी कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी १५२ रुग्णांनी यांचा फायदा घेतला. यावेळी नगरपरिषदेचे आरोग्य व शिक्षण सभापती तथा उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांनी डॉक्टरांचे स्वागत करुन फिजिओथेरपी कॅम्पचे रितसर उद्घाटन केले.

### वडवलीत नेत्र तपासणीचे आयोजन

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन तालुक्यातील वडवली येथे रविवारी (दि.५) मोफत डोळे तपासणी आणि मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल (पनवेल), राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि ग्रुप ग्रामपंचायत वडवली यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे. ग्रामपंचायत कार्यालयात सकाळी १०.०० ते सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत रुग्णांची तपासणी केली जाईल. या शिबिरामध्ये अत्याधुनिक कॉम्प्युटरद्वारे डोळ्यांची तपासणी करून अत्यंत माफक दरात नंबरचे चष्मे उपलब्ध करून दिले जाणार आहेत. याशिवाय, महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेच्या अंतर्गत पात्र असणाऱ्या सर्व रुग्णांवर मोफत नेत्र शस्त्रक्रिया करण्यात येईल. तसेच, सर्व प्रमुख कंपन्यांच्या मेडिक्लेम अंतर्गत कॅशलेस सुविधेचा लाभही रुग्णांना घेता येणार आहे.

### विजयकांत पाटील सेवानिवृत्त



| वाघ्रण | प्रतिनिधी |

वाघ्रण येथील विजयकांत पाटील यांचा निरोप समारंभ नुकताच पार पडला. ते शिहू येथील शिक्षण प्रसारक मंडळ माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असताना दि.३० जून रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांनी आधीच्या कोएसो आणि आताच्या स्थानिक शिक्षण संस्थेच्या शाळेत २२ वर्ष अध्यापक आणि २ वर्ष मुख्याध्यापक पद सांभाळले. शिहू येथे शाळेचे सभापती डॉ. रोहिदास शेळके, उपसभापती के. के. कुथे, सर्व संचालक मंडळाचे पदाधिकारी, शिक्षक, ग्रामस्थ व विद्याथी आदींच्या उपस्थितीत त्यांचा निरोप समारंभ संपन्न झाला. तर, दि.३१ जून रोजी वाघ्रण गावांत देखील समारंभ पार पडला.

### वैद्यकीय अधीक्षकांची बदली

| कर्जत | प्रतिनिधी |

पोलीस मित्र संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष रमेश कदम यांनी केलेले साखळी उपोषण यशस्वी झाले आहे. त्यांच्या या उपोषणामुळे कर्जत उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षकांकडून पदभार काढून घेऊन त्यांना म्हसळा उप जिल्हा रुग्णालयाचा कार्यभार स्वीकारण्याचा आदेश दिला आहे. तसेच, आधीची चौकशी समिती रद्द करुन नव्याने चौकशी समितीची नियुक्ती करून त्यांना लवकरात लवकर चौकशी अहवाल सादर करण्याचा आदेश रायगड जिल्हा शल्य चिकित्साकांनी दिला आहे.

पोलीस मित्र संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष रमेश कदम यांनी कर्जतच्या लोकमान्य टिळक चौकात कर्जत उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षक डॉ. विजय मस्कर यांच्या मनमानी कारभारा विरुद्ध उपोषण सुरु केले होते. या उपोषणात शिबीरात किती औषधे वापरली त्याची बिले, सर्जरी करण्यात आली त्यांचे नाव पत्ते, वाहन मालकांची नावे, बिल कोटेशन, वाहनांची सर्व कागदपत्रे व सर्व पेमेंटची बँक स्टेटमेंटसह त्याची चौकशी करण्यात यावे. कमी वजन असणाऱ्या किती बालकांवर उपचार करण्यात आले व कोण कोणते उपचार करण्यात आले त्यांची नावे व पत्त्यासह चौकशी करण्यात यावी. स्तनपान घेण्यास अडचणी येणाऱ्या किती पालकांवर उपचार करण्यात आले. कोणते उपचार करण्यात आले. त्यांची नाव पत्त्या सह चौकशी करण्यात यावी. एनआरसी मधुन किती बालकांची सुधारणा झाली? त्या बालकांची फोटो नावे पत्त्यासह चौकशी करण्यात यावी. उपचार करण्यास हालगर्जिपणा केल्यामुळे एका आदिवासी महिलेचा डिलेवरी दरम्यान मृत्यू झाला त्याची चौकशी करण्यात यावी, इत्यादींसह अनेक मुख्य आणि महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या होत्या.



## पाच्छापूर फाट्यावर खड्ड्यांचे साम्राज्य | आज नऊ गावांची अनोखी सहल

# 'चंद्रावर पिकनिकला चला'

| पाली | प्रतिनिधी |

सुधागड तालुक्यातील नऊ गावांमधील ग्रामस्थांनी आता विभागातील असुविधांचा आनंद घेण्यासाठी एक अतिशय अनोखी आणि उपरोधिक शक्कल लढवली आहे. पाच्छापूर फाटा ते पाच्छापूर या तब्बल साडेचार किमीच्या रस्त्यावरील खड्ड्यांकडे पाहता, सामान्य माणसांना चंद्रावर पोहचणे शक्य नसल्याने त्यांना चंद्रावर सफर करण्याचा अनुभव देण्याची व्यवस्था केली आहे. आज दि.५ जुलै रोजी या खड्डेमय रस्त्यावर पिकनिकचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान, येथील ग्रामस्थांनी थेट ''चंद्रावर पिकनिकला चला'' असे उपरोधिक पोस्टर सोशल मीडियावर व्हायरल केले आहे.

या उपहासात्मक सहलीला गेल्या महिन्यापासूनच सुधागड तालुक्यातील असंख्य नागरिकांनी मोठा पाठिंबा दर्शवला होता. गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात याच नऊ गावांतील ग्रामस्थांनी एकत्र येत लोकवर्गणी आणि श्रमदानातून साडेचार किलोमीटरचा रस्ता तात्पुरता दुरुस्त करून प्रशासनाचा ताण कमी केला होता. मात्र, त्यानंतरही प्रशासनाने आपल्या निसर्गरम्य धोरणानुसार या रस्त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. परिणामी, सध्या या रस्त्याची अवस्था हुबेहूब चंद्रावरील विवरांसारखी झाली आहे. याच पार्श्वभूमीवर नऊ गाव संघर्ष समिती, शहरवासी आणि स्थानिक नागरिकांनी एकत्र येत डिजिटल आणि प्रिंट मीडियासह सर्व पर्यटकांना व हितचिंतकांना आज ५ जुलै रोजी पाच्छापूर फाटा येथे या चंद्रावरील पिकनिकसाठी एकत्र येण्याचे जाहीर आवाहन केले आहे.

### 'सुवर्णसंधीचा लाभ घ्या'

सध्या या रस्त्यावरून दररोज शाळकरी मुले, रुग्ण आणि स्थानिक नोकरदार वर्गाला ॲडव्हेंचर स्पोर्ट्सचा थरारक अनुभव घेत, जीव मुठीत धरून प्रवास करावा लागता आहे. दरम्यान, आपल्या मायबाप सरकारने सर्वसामान्यांना चंद्रावरील पृष्ठभागाचा अनुभव घेण्यासाठी ही सुवर्णसंधी दिली आहे. हा रस्ता चुकून सिमेंट काँक्रीटचा गुळगुळीत होण्याआधी, प्रशासनाने दिलेल्या या सुवर्णसंधीचा आणि खड्ड्यांचा लाभ घ्या, असा सणसणीत टोला या पोस्टरच्या माध्यमातून सरकारला लगावण्यात आला आहे.



# अडकलेल्या प्राण्यांची सुटका

**। दिघी । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन स्मशानभूमी जागेत असणाऱ्या 'डंपिंग ग्राउंड'च्या खड्ड्यात अडकून पडलेल्या प्राण्यांची सुटका शुक्रवारी सायंकाळी करण्यात आली. सोशल मीडियामुळे या बचाव कार्यात ग्रामस्थांनी तत्काळ मदत केली आहे.



बोर्लीपंचतन शहरातील स्मशानभूमी जागेत कचरा डेपो म्हणजे मोठी समस्या बनली आहे. कारण अंत्यसंस्कार मिळण्याच्या स्मशानभूमी परिसरात कचरा असल्याने अक्षरशः कचरा डेपोचे हिडीस स्वरूप बनले आहे. सद्या मुसळधार पावसामुळे कचरा साठवणुकीच्या खड्ड्यात पाणी साचले आहे. या परिसराला बंदिस्त भिंत देखील नाही. त्यामुळे मोकाट प्राण्यांचा खाद्यासाठी नेहमी वावर सुरू असताना तीन जनावरे व कुत्र्यांनी खड्ड्यात उडी घेतली. मात्र, पाण्यांनी भरलेल्या कचऱ्याच्या दलदलीत अडकून बसले.

या गंभीर प्रकाराकडे देवा पाटील तरुणाचे लक्ष गेले असता, त्याने तातडीने 'आम्ही बोर्लीकर' या सोशल मीडियाच्या माध्यमातून मदतीचे आव्हान केले. तत्काळ बचावासाठी वैभव कदम, अक्षय दिवेकर, संकेत पाटील, प्रदीप पांगारे, अंकेश कविलकर, श्रवण गायकर, प्रज्योत पांगारे, प्रथमेश धुमाळ यांच्यासह अनेक सहकाऱ्यांनी धाव घेतली व वेळीच तत्परता दाखवत मुक्या प्राण्यांची सुटका केली.

अशा आपत्कालीन परिस्थितीत प्राणी किंवा मानव सगळेच आपला जीव वाचवण्यासाठी संघर्ष करत असतात. त्यामुळे अशी देखील माणसे असतात; जे वेळप्रसंगी मागचा पुढचा विचार न करता संकटात सापडलेल्यांना मदत करायला धावतात.

## मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलचे भूमीपूजन

**माणगाव :** माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवार, दि. ७ जुलै रोजी पार पडणार आहे. या दिवशी सह्याद्री मेडिकल सायन्स ॲण्ड रिसर्च फाऊंडेशन, रायगड यांच्या माध्यमातून माणगाव मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलचे भूमीपूजन, तसेच बी.टी. स्पोर्ट्स अकॅडमी आणि गेल इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक जलतरण तलावाचे उद्घाटन होणार आहे. या दोन्ही प्रकल्पांमुळे माणगावच्या आरोग्य आणि क्रीडा क्षेत्राला विकासाची नवी उभारी मिळणार आहे. या विकासकामांचे भूमीपूजन व उद्घाटन खा. सुनील तटकरे यांच्या हस्ते होणार आहे.

## राजीव साबळे यांच्या षष्ट्यब्दीपूर्तीनिमित्त महावृक्षारोपण



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड.राजीव साबळे यांचा मंगळवार दि.७ जुलै रोजी षष्ठ्यब्दीपूर्ती वाढदिवस सोहळा उत्साहात साजरा करणार आहेत. वाढदिवसानिमित्त माणगावात विविध सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यापैकीच एक महावृक्षारोपण सप्ताहास बुधवारी ( दि.१) जुलै रोजी सुरुवात करण्यात आली आहे. हा उपक्रम दि.७ जुलैपर्यंत चालणार आहे. या कार्यक्रमात माणगावमधील विविध क्षेत्रातील मान्यवर, डॉक्टर्स, वकील, नागरिक, ग्रामस्थ मंडळी तसेच सर्व प्राचार्य, उपप्राचार्य, शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारीवृंद, विद्यार्थी सहभागी झाले आहेत. तसेच मंगळवार दि.७ जुलै रोजी सिबीएससी इंग्लिश स्कूल निजामपूर रोड, दत्तनगर माणगाव येथे सकाळी ९ ते दुपारी २ रक्तदान शिबिरात सहभागी होण्याचे आवाहन ॲड. साबळे यांनी केले आहे.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

५ जुलै

१) श्री. नारायण जनार्दन पाटील सारळ, कुरूळ, ५-७-१९४१
२) श्री. पांडुरंग बाळकृष्ण राणे कुरूळ, अलिबाग, ५-७-१९४७
३) श्रीम. नलिनी वामन तुपे अलिबाग, ५-७-१९५१
४) श्रीम. सुमन सीताराम दोंदे अलिबाग, ५-७-१९३८
५) श्री. जयहिंद अंबाजी म्हात्रे अलिबाग, ५-७-१९५३
६) श्रीम. पुष्पा अशोक पडते नवगाव, अलिबाग, ५-७-१९४७

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

## वासांबे ग्रामपंचायतीला टीबीमुक्त पंचायत पुरस्कार



**। रसायनी । प्रतिनिधी ।**

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन अभियानांतर्गत खालापूर तालुक्यातील वासांबे (मोहोपाडा) ग्रामपंचायतीला टीबी मुक्त पंचायत २०२५ पुरस्कार जाहीर करण्यात आला. ग्रामपंचायतीने क्षयरोग निर्मूलनासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

पुरस्कार वासांबे ग्रामपंचायतीच्या सरपंच उमा मुंढे आणि ग्रामविकास अधिकारी वैभव पाटील यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी गटविकास अधिकारी संदीप कराड, कृष्णा पारंगे, भाई शिंदे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या सन्मानामुळे वासांबे ग्रामपंचायतीच्या आरोग्यविषयक जनजागृती, क्षयरोग प्रतिबंधक मोहिमा आणि गावाला टीबीमुक्त ठेवण्यासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे कौतुक होत आहे.

नागरिकांच्या सहभागातून वासांबे (मोहोपाडा) ग्रामपंचायतीने उभारलेला आदर्श इतर ग्रामपंचायतींसाठी प्रेरणादायी ठरत आहे. टीबी हरेगा, देश जीतेगा या घोषवाक्याला साजेसा वासांबे ग्रामपंचायतीचा हा सन्मान खालापूर तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

## सोनम भोईर यांना पदोन्नती

रसायनीः रायगड पोलीस दलात फेब्रुवारी २०१२ मध्ये महिला पोलीस शिपाई म्हणून दाखल झालेल्या सोनम भोईर-शेळके यांची महिला पोलीस हवालदार पदावर पदोन्नती झाल्याने रसायनी परिसरात आनंदाचे वातावरण असून त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. कर्तव्यदक्ष, कर्मचारी म्हणून यांची ओळख आहे.

## महाविद्यालयात वृक्षारोपण

**माणगाव :** माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या द. ग. तटकरे महाविद्यालयात राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त उत्साहात पार पडला. बालरोग तज्ज्ञ डॉ. आबासाहेब पाटणकर यांच्या हस्ते वृक्षारोपण करून आरोग्यदायी समाज आणि हिरवेगार पर्यावरण या दोन्हींचा सुंदर संगम कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला. यावेळी डॉ. सचिन माळी, डॉ. परेश उभारे, डॉ. रोहित गोविलकर आणि डॉ. हेमंत गांधी डॉक्टर उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. आर. पांडेय, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. राजेंद्र आचार्य, प्रा. नेहा तुराई, डॉ. संगीता उतेकर, प्रा. अंकिता म्हस्के, नेचर क्लबच्या प्रमुख प्रा. उर्मिला खोब्रागडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोटाची खळगी भरण्यासाठी पावसातही डोंबाऱ्यांचा खेळ

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

पाऊस, ऊन किंवा थंडी... ऋतू कोणताही असो, पोटाची खळगी भरण्यासाठी डोंबारी समाजाला दररोज जीव धोक्यात घालून खेळ सादर करावे लागतात. सध्या मुसळधार पावसाचा जोर असतानाही बेलापूर परिसरात डोंबारी कुटुंबातील कलाकार कसरती करत उदरनिर्वाहासाठी संघर्ष करताना दिसत आहेत.

भर पावसात ओल्या दोरीवर तोल सांभाळत कसरती करणारे कलाकार आणि त्यांना साथ देणारी लहान मुले पाहून अनेकांचे मन हेलावते. प्रेक्षकांकडून मिळणाऱ्या अल्प आर्थिक मदतीवरच या कुटुंबांचा संसार चालत असल्याने पाऊस असो वा उन्हाळा, खेळ थांबविण्याचा पर्याय त्यांच्यासमोर नसतो.

ऋतू कोणताही असो, आम्हाला पोटासाठी खेळ करावाच लागतो. आता आयुष्य जगणे सोपे राहिलेले नाही. मेहनत केल्याशिवाय दोन वेळचे जेवण मिळत नाही, अशी भावना एका डोंबारी कलाकाराने व्यक्त केली.

आधुनिक मनोरंजनाच्या साधनांमुळे पारंपरिक डोंबारी खेळांकडे प्रेक्षकांचा ओढा कमी होत असला, तरीही आपल्या कलेच्या जोरावर उदरनिर्वाह करण्यासाठी हा समाज आजही अविरत संघर्ष करत आहे. त्यांच्या कष्टमय जीवनाकडे शासनासह समाजानेही संवेदनशीलतेने पाहण्याची गरज व्यक्त होत आहे.

## प्रा. किशोर लहारे सेवानिवृत्त

**। श्रीवर्धन शहर । प्रतिनिधी ।**

गोखले एज्युकेशन सोसायटीच्या गोखले महाविद्यालयातील, इतिहास विभाग प्रमुख, प्रा. किशोर लहारे ३० वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर (दि.३०) जुन रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांनी आपल्या कारकिर्दीत हजारो विद्यार्थ्यांना घडवले, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले.



त्यांच्या सेवानिवृत्ती सोहळ्यास प्राचार्य, डॉ. विवेक खरे, उपप्राचार्य डॉ राजु गोरुले, वरीष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व माजी विद्यार्थी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी अनेक प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी त्यांच्या आठवणी सांगुन आपल्या भावना व्यक्त करत पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## आरवचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**खरोशी :** राजिप प्राथमिक शाळा खरोशी येथील विद्यार्थी आरव पाटील हा पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्तीत जिल्हा गुणवत्ता यादीत १०७ वा. क्रमांक प्राप्त करून शिष्यवृत्तीधारक झालेला आहे. आरव आणि निशांत यांनी चांगले यश संपादन करून नवोदय विद्यालयामध्ये प्रवेश प्राप्त केला आहे. याबद्दल त्याचे विस्तार अधिकारी काकडे, शर्मिला शेंडे, मिनल पाटील, हरेश घरत व ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. ५ जुलै ते ११ जुलै २०२६

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

### नोकरदारांना दिलासा मिळेल

**मेष :** राशीधारकांना या सप्ताहाचे एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात विविध प्रकारच्या आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे. आठवड्याच्या पूर्वार्धात अनेक अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे. पण त्यानंतर मात्र, कामे मनासारखी होऊ लागतील. कौटुंबिक वातावरण चांगले ठेवण्याचा प्रयत्न करा. घरातील व्यक्तींकडे जास्त लक्ष द्या. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवा. आर्थिक बाजू ठीक राहील. नोकरदारांना दिलासा मिळेल. अनावश्यक खर्च टाळा. प्रकृतीस्वास्थ्य जपा. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपल्या खर्चावर योग्य नियंत्रण ठेवणे हितकारक ठरेल. प्रवासात सावध राहा. स्थावर-जंगम बाबतीतील प्रश्नांना चालना मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल व उद्योगधंद्याला चालना मिळेल. आप्तेष्ट मंडळींच्या संपर्कात राहाल. प्रकृतीस्वास्थ्य जपा, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. प्रत्येक बाबतीत जुळवून घेण्याचा प्रयत्न करा. **महिलांना** : तब्बेतीची काळजी घेणे गरजेचे आहे. जोडीदारा बरोबर बाहेर फिरण्याचा योग आहे. **शुभ दिनांक** : ०५,०६.

### वरिष्ठांची मर्जी सांभाळा

**वृषभ** : राशीसाठी या सप्ताहाचे एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात विविध प्रकारच्या, विशेषतः कार्यालयीन व कौटुंबिक प्रश्नांना सामोरे जावे लागणार आहे. उद्योग-व्यवसायात प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्ती विकासाचे ध्येय बाळगावे. सरकारी नियमांचे पालन करा. काही जुने येणे वसूल होण्याची शक्यता आहे. विरोधकांना संधी देऊ नका. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. प्रकृतीस्वास्थ्य जपा, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. काही भाग्यवंतांना दोनाचे चार हात होण्याची शक्यता राहील. आपणास कार्यालयातील व कौटुंबिक गोष्टींबाबतचे महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागणार आहे. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. महिलांना त्यांच्या कलागुणांना उत्तम प्रतिसाद मिळेल. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. नोकरदारांना दिलासा मिळेल. वरिष्ठांची मर्जी सांभाळता येईल. प्रकृतीस्वास्थ्य जपा. **महिलांना** : एखादी चांगली संधी चालून येईल तिचा फायदा घ्या दूर असलेल्या मित्र, मैत्रीणची भेट होईल. संतती कडे लक्ष द्या. **शुभ दिनांक** : ०७,०८.

### प्रलोभनांपासून दूर राहा

**मिथुन** : राशीसाठी या सप्ताहाचे एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात सर्व कामांचे नियोजन केल्यास आपण सर्व बाबतीत यशस्वी होण्याची शक्यता राहील. नोकरदारांना दिलासा मिळेल. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवावे. प्रलोभनांपासून दूर राहा. अचानक प्रवासाचे योग संभवतात. राजकीय व्यक्तींना हा काळ चांगला आहे. सरकारी नियमांचे कटाक्षाने पालन करा. मुलांकडून सुवार्ता समजू शकतात. गाठीभेटीचे योग संभवतात. प्रकृतीस्वास्थ्य जपा, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. बऱ्यापैकी अनुकूलता लाभल्याने पुष्कळशा बाबतीत आपण सफलता मिळवू शकाल व आनंद घ्याल. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. उद्योग-व्यवसायात प्रगती करता येईल. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्याची पथ्ये व उष्णतेच्या विकारांपासून सावध राहा. प्रवासात सावधानता बाळगा. घरगुती वातावरण चांगले ठेवा. ताण घेऊ नका **महिलांना** : आपल्या घरातून एखादी किमती वस्तू गायब होण्याची शक्यता राहील. कोणाचे ही रागाचे बोलणे मनावर घेऊ नका. लॉटरी काढण्यास हरकत नाही. **शुभ दिनांक** : ०९,१०.

### आर्थिक बाबतीत सावधानता बाळगा

**कर्क :** राशीधारकास या सप्ताहाचे एकूण ग्रहमान पाहता आपण सर्व बाबतीत जिद्द व आत्मविश्वासाने वागल्यास अपेक्षित गोष्टी साध्य करता येतील. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारावे. स्थावरसंबंधीच्या प्रश्नांची उकल करता येईल. राजकीय क्षेत्रातील मंडळींना हा काळ छान राहील. थोरामोठ्यांच्या गाठीभेटीचे योग संभवतात. आर्थिक बाबतीत सावधानता बाळगावी. अपेक्षित गोष्टी साध्य करता येतील. आर्थिक बाजू ठीक राहील. सामाजिक क्षेत्रात आपली वाहवा संभवते. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. आपल्या परिश्रमाचे चीज झाल्याचे समाधान मिळेल. हा सप्ताह सर्वसाधारण स्वरूपाचा राहण्याची शक्यता राहील. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. हितशत्रूंना संधी देऊ नका. व्यवसाय क्षेत्रात प्रगती साधता येईल. अनावश्यक खर्च मात्र टाळा. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावे. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः मोसमी आजारांपासून व उष्णतेच्या विकारांपासून सावध राहा. **महिलांना** : खाण्यापिण्याच्या बाबतीत पथ्यपाणी सांभाळा विशेषतः पाणी उकळून प्या. **शुभदिनांक** : ०५,११.

### परिश्रमांना चांगला प्रतिसाद मिळेल

**सिंह** : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण घेत असलेल्या परिश्रमांना चांगला प्रतिसाद मिळून चीज झाल्याचे समाधान मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. संगणक, तांत्रिक क्षेत्र व्यवसायातील व्यक्तींना चांगला काळ राहील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. आपल्या कामाची, प्रगतीची नोंद ठेवणे हितकारक राहील. अडचणींतून मार्ग काढण्याचे तंत्र स्वीकारा व ध्येयाचा पाठपुरावा करा. धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. आर्थिक बाजू ठीक राहील. प्रलोभनांपासून दूर राहा. कामाचा ताण आपल्या प्रकृतीवर होणार नाही याची दक्षता घ्या. आपल्या कामाला योग्य प्रकारे न्याय देण्याचे धोरण स्वीकारल्यास हा आठवडा सर्व दृष्टीने चांगला जाईल. सत्याचा मार्ग स्वीकारून आपल्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडण्याचा प्रयत्न करा. कोणताही निर्णय विचारपूर्वक घ्या, चुकीचा निर्णय घेण्याचे टाळा. कलाक्षेत्राला उत्तम प्रोत्साहन मिळेल. **महिलांना** : सामाजिक क्षेत्रात आपली वाहवा होईल. प्रवासाचे योग संभवतात. धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. **शुभ दिनांक** : ०६,१०.

### कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या

**कन्या :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होण्याचे योग आहेत. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. उद्योग-व्यवसायात नवे काही करण्यापेक्षा आहे तेच सांभाळणे महत्त्वाचे राहील. त्यामधून लाभ होईल. आर्थिक बाजू ठीक असली तरी अनावश्यक खर्च टाळावा. मित्रमंडळी व आप्तेष्टांशी सामंजस्याने वागावे. प्रलोभनांपासून दूर राहावे. सरकारी नियम व कायदा यांचे पालन करावे. प्रकृतीकडे अधिक लक्ष द्यावे. हाती घेतलेली कामे पार पाडता येतील. विशेषतः पूर्वार्धात विविध प्रकारचे प्रश्न आपल्यापुढे उभे ठाकतील, पण त्यांची आत्मविश्वासाने उकल केल्यास उत्तम राहील. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. प्रकृतीस्वास्थ्य जपा. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवा. सप्ताहाच्या मध्यात हातात पैसे येतील, एखादी राहिलेली मनीषा पूर्ण होईल. **महिलांना** : त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. तुमचा आत्मविश्वास वाढणाऱ्या घटना घडणार आहेत. **शुभदिनांक** : ७,०९.

### प्रवासात सावधानता बाळगा

**तुळ** : राशीसाठी या सप्ताहात आपण योजलेली कामे मनाप्रमाणे पार पाडता येतील, मात्र आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. सरकारी कामकाजात सफलता मिळू शकेल. आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याचा प्रयत्न करा. आर्थिक बाजू सावरता येईल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. व्यापारात मात्र, सावधानता बाळगावी. आपली मानसिकता स्थिर ठेवल्यास उत्तम. घरगुती वातावरण चांगले राहील. महत्त्वाच्या कागदपत्रांवर वाचूनच स्वाक्षऱ्या करा. आपण घेत असलेल्या परिश्रमांचे योग्य चीज झाल्याचे समाधान मिळू शकेल. आर्थिक बाबतीत मात्र खर्चावर योग्य नियंत्रण ठेवणे हितकारक ठरू शकते. आपले ध्येय साध्य करण्यासाठी चातुर्य व बळाचा वापर करून यशाची वाटचाल करू शकाल. स्थावर-जंगमविषयक कामांना गती मिळेल. प्रवासात सावधानता बाळगा. **महिलांना** : लेखन कला साहित्य यामधून नावलोकीक मिळेल, वडिलांकडून लाभ संभवतो. वारसा हक्क असल्यास आपला दावा कोर्ट प्रकरणात यशस्वी होऊ शकेल. **शुभदिनांक** : ०५,०८.

### योजलेली कामे पूर्ण होतील

**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहात आपणास बऱ्यापैकी अनुकूलता मिळू शकते व आपले ध्येय साध्य करू शकाल. महत्त्वाच्या कामात आपणास सफलता मिळू शकेल. आर्थिक बाजू सावरता येईल. काही जुने येणे वसूल होण्याची शक्यता आहे. विवाह इच्छुकांच्या अपेक्षा पुऱ्या होण्याची शक्यता राहील. आपल्या भावनांवर योग्य नियंत्रण ठेवा. विरोधकांची धास्ती बाळगू नका. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. सामाजिक क्षेत्रात अग्रेसर राहाल. सरकारी नियमांचे पालन करा. ग्रहमान ठीक असले तरी कामाचे योग्य नियोजन केल्यास आपणास सर्व गोष्टी साध्य करता येतील. प्रवासाचे योग संभवतात. कामाचा उत्साह वृद्धिंगत होईल. आपली बलस्थाने कोणती आहेत याचा आढावा घ्या व भविष्याच्या योजना आखा. नोकरदारांना दिलासा मिळेल. प्रकृतीस्वास्थ्य जपा, कला, क्रीडा क्षेत्रातील व्यक्तींना मानसन्मानाचे योग संभवतात. आर्थिक बाजू ठीक राहील. **महिलांना** : महिलांच्या कलागुणांना उत्तम प्रोत्साहन मिळेल. योजलेली कामे पूर्ण होतील. आई, सासू यांच्या तब्बेतीची काळजी घ्या. **शुभ दिनांक** : ०६,०७.

### वादविवादाचे प्रसंग टाळा

**धनु :** राशीसाठी या सप्ताहात लहान-सहान गोष्टींवरून वादविवादाचे प्रसंग उद्भवणार नाही याची दक्षता घेतल्यास हा आठवडा चांगला जाईल. वादाचे प्रसंग सामंजस्याने व शांततेने सोडविण्याचा प्रयत्न करा. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. मुलांकडे अधिक लक्ष द्या. प्रकृतीस्वास्थ्य जपा, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. नको त्या प्रलोभनात अडकू नका. जोडीदाराशी सहकार्याने वागा. नातेसंबंध जपावे लागतील. अनावश्यक खर्च आपण आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. बेकारांना नोकरीची संधी प्राप्त होईल. बोलण्यावर मात्र नियंत्रण ठेवा म्हणजे गैरसमज होणार नाही. येणाऱ्या लहान-सहान अडचणींतून मार्ग काढावे लागतील ध्येयाकडे जाण्याचा मार्ग स्वीकारा. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा, विशेषतः उष्णतेच्या विकारांपासून सावध राहा. शेतीविषयक कामांना गती मिळेल. **महिलांना** : उधारी वसूल होऊ शकेल, आपण भले आपले काम भले हे धोरण ठेवा. जवळच्या नतेवाइकांकडून लाभ होईल. **शुभ दिनांक** : ०८,०९.

### वरिष्ठांची मर्जी सांभाळा

**मकर** : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता हा आठवडा कौटुंबिक व कार्याच्या कर्तव्यांचा पाठपुरावा करणारा असणार आहे. आतापर्यंत केलेल्या कार्याचा आढावा घेऊन आपण कुठे कमी पडलो, याचा विचार करून वागणे सर्व दृष्टीने योग्य राहणार आहे. जागेसंबंधी वादाचे प्रसंग उद्भवणार नाही याची दक्षता घ्या. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा. आर्थिक बाबतीत सावधानता बाळगावी. आपण बऱ्याच गोष्टी साध्य करू शकाल व आपली घोडदौड चालू राहील. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. वरिष्ठांची मर्जी सांभाळता येईल. जीवनात योग्य व्यवस्थापनांची जरूरी असते, त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करा. कलाकारांनच्या कलागुणांना चांगला वाव मिळेल. हितशत्रूंची काळजी करू नका. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. गुंतवणूक करताना तज्ञांचा सल्ला घ्या. अनावश्यक खर्च टाळा. कुटुंबाकडे अधिक लक्ष द्या. **महिलांना** : पैशाचे योग्य नियोजन आपल्या कामात येऊ शकेल आपली बचत आता खर्च करू नका घरात एखादे शुभकार्य आयोजित कराल. **शुभ दिनांक** : १०,११.

### परिस्थितीनुसार विचार बदला

**कुंभ** : राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता आपल्या कामकाजाचा व्याप वाढल्याने व कौटुंबिक गोष्टींकडेही लक्ष द्यावे लागणार असल्याने आपण व्यस्त राहाल. नोकरदारांना दिलासा मिळेल. क्रीडा व तांत्रिक क्षेत्रातील व्यक्तींना हा काळ उत्तम राहील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या व त्यांच्या अपेक्षांना न्याय द्या. प्रलोभनांपासून दूर राहा. व्यापार-उद्योगाला चालना मिळेल. आपल्याकडील अतिरिक्त पैसा नीट सांभाळून ठेवा. सरकारी नियमांचे पालन करा. अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवा. प्रकृतीस्वास्थ्य जपा, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. आपण परिस्थितीनुसार विचार बदलल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य देऊन त्यांच्या अपेक्षांची पूर्तता करा. गैरसमज होणार नाही याची दक्षता घ्या. विरोधकांना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. घरगुती वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. **महिलांना** : आपल्याला रोजगाराची संधि उपलब्ध होणार आहे. आपल्या कला गुणांना वाव मिळू शकेल. निराशेला थारा देऊ नका त्याचा परिणाम आरोग्यावर होऊ शकतो. **शुभ दिनांक** : ६,०९.

### अपेक्षित गोष्टी साध्य होतील

**मीन :** राशीसाठी आपले ग्रहमान पाहता आपण सर्व बाबतीत सामंजस्याने वागल्यास बऱ्याच अपेक्षा पूर्ण होतील व समाधान मिळेल. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. प्रलोभने टाळा. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. आप्तेष्ट व मित्रमंडळींशी सामंजस्याने वागणे हितकारक ठरेल. सरकारी नियमांचे पालन करा. विरोधकांना संधी देऊ नका. आपण सर्व बाबतीत नियोजनाची साथ घेतल्यास अपेक्षित गोष्टी साध्य करता येतील. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. उद्योग-व्यवसायात प्रगती करता येईल. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. काही मंडळींना प्रसिद्धीचे वलय प्राप्त होण्याची शक्यता आहे. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य देऊन त्यांच्या अपेक्षांची पूर्तता करा. बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा. प्रकृतीस्वास्थ्य जपा. आर्थिक बाजू ठीक राहील. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कामांचा विस्तार करता येईल. **महिलांना** : कामात थोडा तणाव राहणार आहे, मन स्थिर ठेवण्याचा प्रयत्न करा त्यामुळे शांती मिळेल. तेलकट व मसालेदार पदार्थांचे सेवन टाळल्यास प्रकृतीच्या तक्रारी उद्भवणार नाहीत. **शुभ दिनांक** : ०७,११.

# मुसळधार पावसाने भातशेती संकटात

## ● सततधारेमुळे शेतकरी चिंताग्रस्त



। पाताळगंगा । प्रतिनिधी ।

मागिल आठवड्यापासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे भातशेती मोठ्या संकटात सापडली आहे. अनेक ठिकाणी शेतातील राब पूर्णपणे पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. पावसाच्या जोरदार प्रवाहामुळे डोंगर उतारावरील माती वाहून येत शेतात मोठ्या प्रमाणात गाळ साचत असून, नुकतेच उगवलेले भाताचे कोवळे राब या गाळाखाली गाडले जाण्याची भीती निर्माण झाली आहे.

शेतांमध्ये पाणी तुडुंब साचले असून काही भागांत पाण्याचा निचरा होत नसल्याने शेते लहान तलावांचे स्वरूप धारण करत आहेत. त्यामुळे भाताची कोवळी रोपे पाण्यात दीर्घकाळ बुडून राहिल्यास ती कुजण्याचा धोका वाढला आहे. यामुळे अनेक शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणी करण्याचे संकट उभे राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे. यंदा चांगल्या पावसाच्या आशेवर शेतकऱ्यांनी मोठा खर्च करून भात पेरणी केली होती.

मात्र, आता अतिवृष्टीमुळे केलेली मेहनत वाया जाण्याची वेळ आली आहे. मुसळधार पाऊस कायम राहिला, तर अनेक शेतकऱ्यांना पुन्हा पेरणी करावी लागू शकते. त्यामुळे आर्थिक नुकसानही मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता आहे. सध्या शेतकऱ्यांचे लक्ष आकाशाकडे लागले असून, पावसाने काही काळ विश्रांती घ्यावी आणि शेतातील पाण्याचा निचरा व्हावा, अशीच अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# मुसळधार पावसाने खालापूर तालुका जलमय

। खोपोली । प्रतिनिधी ।

जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शनिवारी खालापूर तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले. खोपोली शहरासह तालुक्यातील अनेक सखल भागांत पाणी साचल्याने वाहतुकीवर परिणाम झाला. सावरोली पुलाजवळही पाण्याची पातळी वाढल्याने वाहनचालकांना सावधगिरीने प्रवास करावा लागला.

सकाळपासून संततधार पावसामुळे खोपोली शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ आणि सखल भाग जलमय झाले. खालापूर तालुक्यातील नद्या, ओढे आणि लहान-मोठे धबधबेही प्रवाहित झाले आहेत. मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर नदीकाठच्या तसेच सखल भागातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. पावसाळी पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांनी धबधबे आणि वेगाने वाहणाऱ्या पाण्याजवळ जाणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

दरम्यान, जिल्ह्यात जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली असून, आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.


## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे थळ, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या जमिन शेतजमिन मिळकती श्री. अनिल आत्माराम घरत, वगैरे, राहणार थळ यांच्या निर्वेध मालकी हक्काच्या असून, सदर जमिन मिळकती, सदर मिळकतींच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतींचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदरील शेत जमिन मिळकती पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतींच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतींवरील श्री. अनिल आत्माराम घरत, वगैरे, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध आहेत, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतींचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| थळ ता.अलिबाग. | १४७/२ | ०-३०-२० पो.ख. ०-०१-३० एकूण ०-३१-५० | ५-७५ |
| थळ ता.अलिबाग. | १४७/१० | ०-१५-७० पो.ख. ०-००-०० एकूण ०-१५-७० | ३-२४ |

अलिबाग,
दिनांक : ०३/०७/२०२६.

सही/-
**(अॅड. संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी, अे विंग,
टिळक रोड, अलिबाग- रायगड.
खरेदीदारांचे वकील


# नांदगाव विद्यालयाला सचित्र बालमित्र अंकांची भेट



। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।

दहावीच्या १९९७-९८ च्या बॅचच्या वतीने नांदगाव विद्यालयातील विद्यार्थ्यांना सचित्र बालमित्र या शैक्षणिक अंकाच्या १५० प्रती भेट देण्यात आल्या. या उपक्रमामुळे शालेय विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया मजबूत होऊन त्यांच्या गुणवत्तेत वाढ होण्यास मदत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या स्तुत्य उपक्रमाबद्दल शाळेच्या वतीने बॅचचे विशेष कौतुक करण्यात आले व आभार व्यक्त करण्यात आले. माजी विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या सामाजिक बांधिलकीचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे. यावेळी प्राचार्य अशोक शिंदे, माजी विद्यार्थी प्रमोद जंगम, प्रमोद शिंदे, निता कोंडे, भूषण सुतार, शिक्षक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# नलिनी महाडिक यांचे निधन

। सुतारवाडी । प्रतिनिधी।



नलिनी वामन महाडिक यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी दिनांक २ जुलै २०२६ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांचा दशक्रिया व तेरावा विधी रविवार दिनांक १२ जुलै २० २६ रोजी मुक्काम पेझारी ओंकारेश्वर मंदिर म्हसोबा, येथे होणार आहे. त्यांच्या मागे एक मुलगा एक मुलगी जावई नातू असा परिवार आहे.


## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री रुस्तम कावसजी तारापोरवाला रा. कडाव ता. कर्जत, जि. रायगड यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे कवठेवाडी, कशेळे ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं १५/९ एकुण ०.२९.०० गुंठे, सर्व्हे नं १५/७/अ एकुण ०.१५.०० गुंठे, सर्व्हे नं १५/८ एकुण ०.२७.०० गुंठे, सर्व्हे नं १५/७/ब एकुण ०.१४.०० गुंठे, तसेच मौजे कशेळे येथील सर्व्हे नं ५/३ ज्याचे क्षेत्र ०.०८.९० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : ०५/०७/२०२६

**अॅड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८



## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यांत येते की, आमचे अशील श्री. बाळकृष्ण जयसिंग ब्रीद, रा. सी/६२, पनोरमा पार्क को. ऑप. हौ. सोसा., शिववल्लभ रोड, अशोकवन, दहिसर, पुर्व गोकूळ आनंद हॉटेल जवळ, मुंबई ४०० ०६८ यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. विनायक भास्कर साळुंके, रा. कडाव, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१ यांचेकडुन विकत घेतली आहे. त्या शेतजमीन मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे :

**मौजे-नालधे, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| ३५/१३/ग | ०-२१-०० यामध्ये बांधलेले ग्रामपंचायत बोरीवली हद्दितील घर अंदाजे क्षेत्र १७०० चौ.फुट | १-०९ |

सदरची शेतजमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकतीमधील लहान मोठी झाडे तदंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांस विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत बाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा करार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे.
दिनांक ०६/०७/२०२६

अशिलां तर्फे अॅडव्होकेट
**अॅड.किशोर अनंता दिघे**
मु. खाड्याचापाडा, पो. पाषाणे,
ता.कर्जत, जि.रायगड
मो. ८००७९७०१५१



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे सरेभाग, ता. पेण, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची जमिन मिळकत असुन सदर मिळकतीचे विद्यमान मालक/कब्जेदार यांचेकडून सदर मिळकत आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे - सरेभाग, ता. पेण, जि. रायगड येथील**

| मालक/कब्जेदाराचे नाव | भुमापन क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| संदीप तुळशीदास पाटील | ८४ | ३/अ | ०-३१.४० | ८.०० |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरीक्त सदर मिळकतींसदर्भात अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, अॅटॅचमेंट, अन्न वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कब्जा, एम.ओ.यु, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्झिशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ (एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील संदीप तुलशीदास पाटील यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. ०५/०७/२०२६.

**श्री. तुषार द. देवरे, अॅडव्होकेट**
पत्ता : फ्लॅट नं.ए २, जय नगर को.ऑप हौ. सोसा.लि.
कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६,
जि. रायगड. मोबाईल नं. ९३२५००४००८


# खोपोलीत साकारणार दिघेंचे भव्य स्मारक



। खोपोली । प्रतिनिधी ।

ज्येष्ठ साहित्यिक र. वा. दिघे यांनी खोपोलीच्या निसर्गरम्य वातावरणात विपुल साहित्यनिर्मिती केली. त्यांच्या साहित्यापासून प्रेरणा घेऊन तरुणांनी साहित्यनिर्मितीकडे वळावे, यासाठी खोपोलीकरांसह सर्व साहित्यप्रेमींना प्रेरणा देणारे दिघे यांचे भव्य स्मारक खोपोलीत नव्याने उभारण्यात येणार असल्याची घोषणा खोपोली नगरपरिषदेचे नगराध्यक्ष कुलदीप शेंडे यांनी केली.

पंत पाटणकर चौकातील र. वा. दिघे स्मारक येथे र. वा. दिघे यांच्या ४६व्या पुण्यतिथीनिमित्त ते बोलत होते. यावेळी र. वा. दिघे यांचे सुपुत्र वामनराव दिघे, स्नुषा व कवयित्री उज्वला दिघे, पोलीस निरीक्षक सचिन हिरे, कोकण मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्रकाश राजोपाध्ये, नगरसेविका रेश्मा गायकवाड, माजी उपनगराध्यक्ष राजू गायकवाड, बांधकाम सभापती अनिल सानप, विनायक तेलवणे, अनिता पवार, अश्विनी अत्रे, नलिनी पाटील उपस्थित होते.

नितीन भावे यांनी दिघे यांच्या साहित्याचे विविध पैलू उलगडून सांगितले. यावेळी माजी नगराध्यक्ष दत्तात्रेय मसुरकर, उल्हास देशमुख, डॉ. भाऊसाहेब नन्नवरे, रेखा कोरे यांनीही मनोगते व्यक्त केली. अनिल रानडे यांनी पड रे पाण्या ही कविता सादर केली.


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


# नामफलक नसल्याने नागरिकांची गैरसोय

**खोपोली** : मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग (NH-4) वरील पनवेल ते खोपोली या मार्गावर अनेक गावांचे नामफलक नसल्याने वाहनचालक, प्रवासी तसेच प्रथमच या मार्गाने प्रवास करणाऱ्या नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. गावांची ओळख पटत नसल्याने अनेकांना योग्य ठिकाणी पोहोचण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे.

यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते किरण हडप यांनी संबंधित प्रशासनाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. पनवेल ते खोपोलीदरम्यान येणाऱ्या प्रत्येक गावाच्या प्रवेशद्वारावर स्पष्ट, आकर्षक व परावर्तित नामफलक बसविण्यात यावेत, जेणेकरून वाहनचालकांना मार्गदर्शन होईल आणि नागरिकांची होणारी गैरसोय थांबेल, अशी मागणी त्यांनी केली आहे. राष्ट्रीय महामार्गावरील सुरक्षित व सुलभ प्रवासाच्या दृष्टीने गावांचे नामफलक अत्यंत आवश्यक असल्याने संबंधित विभागाने याची तातडीने दखल घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# शाळेत वृक्ष दिंडी

**म्हसळा** : पंचायत समिती म्हसळा, तालुका कृषी विभाग आणि खरसई ग्रामपंचायतींच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंती आणि कृषीदिनाचे औचित्य साधून राजिप शाळा खरसई येथे वृक्षारोपण, वृक्ष दिंडी कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास अनिल बसवत, सुनिल गोडगे, लहु म्हात्रे, निलेश मांदाडकर, कृषी अधिकारी दत्तात्रेय शिंदे, प्रदिप शिरसोदे, कृषी खात्यातील कर्मचारी आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी कृषी विभागातर्फे आधुनिक शेती प्रात्यक्षिके, शेतीविषयक विविध उपक्रम, पर्यावरण संवर्धनाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.


## जाहीर सूचना

**याद्वारे सर्व संबंधितांना सूचना देण्यात येते की,** डॉ. (सौ.) सई अविनाश आसगेकर (**"मालक"**) या मौजे धोकवडे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील सर्व्हे क्र. १९५/१ (भाग), एकूण क्षेत्रफळ २०.८० आर (म्हणजेच २,०८० चौरस मीटर) (सध्या गट क्र. २५/३ म्हणून पुनर्क्रमांकित) मालमत्तेची (**"मालमत्ता"**) मालक आहे. तसेच मालकांनी असे प्रतीवेदित केलेले आहे की, अलिक पदमसी यांच्या नावातील मालमत्तेच्या संबंधातील (१) सुनंदाबाई हरिश्चंद्र तोडणकर, (२) रमेश हरिश्चंद्र तोडणकर, (३) विजय हरिश्चंद्र तोडणकर, (४) शिवराम हरिश्चंद्र तोडणकर, (५) तुकाराम हरिश्चंद्र तोडणकर, (६) राजेंद्र हरिश्चंद्र तोडणकर, (७) गीताली दत्तात्रेय जाधव, (८) उज्वला मधुकर मोहिते, (९) नम्रता इंद्रकांत रिलकर आणि (१०) प्रणाली बळीराम जाधव यांनी कार्यान्वित केलेले नोंदणी क्र.१५६६ सन १९९० चे दिनांक २३ एप्रिल, १९९० रोजीचे विक्रीविलेख हरवले आहे आणि/किंवा गहाळ झाले आहे आणि शोधून देखील सापडण्याजोगे नाही **(यात यानंतर गहाळ झालेले हक्कविलेख दस्तऐवज)**.

कोणत्याही व्यक्तीने/संस्थांनी गहाळ झालेले हक्कविलेख दस्तऐवज संबंधातील विक्री, सामंजस्य ज्ञापन, हस्तांतरण, अभिहस्तांतरण, अदलाबदल, वाटप, आकार, भार, भाडेदारी, पोट-भाडेदारी, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, अनुज्ञप्ती, गहाण (समन्याय किंवा अन्य), वारसा, भोगवटा, कब्जा, विभाजन, शेअर, बक्षीस, मृत्युपत्र, धारणाधिकार, आकार, निर्गम, विकासाधिकार, परीरक्षा, सुविधाधिकार, न्यास, प्रसंविदा किंवा अट, सुविधाधिकार, अधित्याग, अधित्यजन, किंवा अन्य कोणत्याही पद्धतीने कोणताही करारनामा, करार, विलेख, दस्तऐवज, लिखिते, अभिहस्तांकन विलेख, मृत्युपत्र, मृत्युपत्रीत देणगी, उत्तराधिकार, कुटुंब व्यवस्था/ तडजोड, विवाद, कोणतेही न्यायालय किंवा न्यायाधिकरण किंवा महसूल किंवा संविधीमान्य प्राधिकरण, किंवा लवाद यांनी संमत केलेला हुकूमनामा किंवा आदेश किंवा निवाडा किंवा अभिरक्षा किंवा नियंत्रण किंवा कोणत्याही स्वरूपाचे अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणताही शेअर, अधिकार, हक्क, हितसंबंध, दावा, आक्षेप आणि/किंवा मागणी (प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष) असेल तर त्यांनी निम्नस्वाक्षरीकर्त्यांना वन वर्ल्ड सेंटर, ७ वा मजला, टॉवर २ए, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथील पत्त्यावर या जाहिरातीच्या तारखेपासून **७ (सात) दिवसांच्या** आत त्यास पाठींबा देणाऱ्या दस्तऐवजी पुराव्यांच्या पूर्ण आणि प्रमाणित सत्य प्रतींसह लेखी स्वरूपामध्ये ज्ञात होण्यासाठी कळविणे आवश्यक आहे. आणि तसेच monika.bhonsale@trilegal.com आणि maithili.vagal@trilegal.com, वर देखील कळवावे. यात कसूर झाल्यास अशा व्यक्तींचा दावा/दावे यांचा अधित्याग आणि/किंवा परित्याग करण्यात आलेला आहे, असे समजण्यात येईल आणि ते कोणत्याही पद्धतीने बंधनकारक राहणार नाहीत.

**आज दिनांक ५ जुलै, २०२६**

**मोनिका भोसले**
**भागिदार,**
**ट्रायलिगल**
वकील आणि सॉलिसिटर्स
वन वर्ल्ड सेंटर, ७वा मजला, टॉवर २ए,
सेनापती बापट मार्ग, लोअर परेल
(पश्चिम), मुंबई ४०००१३



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकती ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे-दहिगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकारणी | |
|---|---|---|---|---|---|
| श्री.सुशिल सिद्धार्थ कांबळे | १६ | ५ | ०-०४-३० | ० | ०५ |
| श्री.प्रशिक संदीप डाळींबकर | १२ | ३ | ०-०३-५० | ० | ०५ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता : ए विंग, फ्लॅट नं. ४,
पहिला मजला, गणेश अपार्टमेंट, कर्जत
नगरपालिका कार्यालय शेजारी,
ता.कर्जत, जि. रायगड ४१०२०१.

सही/-
**अॅड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- ०५/०७/२०२६
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटिशीने कळविण्यात येते की, महसूल दप्तरी वर्णन केलेली मौजे कोलेटे, ता. पेण, जि. रायगड येथील मिळकतीचे खालिल वर्णन केलेल्या प्रमाणे आहे. सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक जयंती भलगट यांच्या मालकीची आहे. सदरची मिळकत आमचे अशिल यांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदरची जाहिर नोटीस अशिलांनी दिलेल्या माहितीवरून आणि सांगण्यावरून देण्यास येत आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे कोलेटे, ता. पेण, जि. रायगड**

| अ.क्र. | गट क्रमांक / उपविभाग नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १ | ३०/२/ब | १-६८.२० पो.ख. ०-५६.०० एकुण क्षेत्र २-२४.०० | २.५२ |
| २ | ३०/२/अ/१ | १-५९.०० पो.ख. १-००.०० एकुण क्षेत्र २-५९.०० | ३.०० |
| ३ | ३०/२/अ/३ | ०-४०.०० पो.ख. ०-००.०० एकुण क्षेत्र ०-४०.०० | ०.५४ |
| ४ | ३०/२/अ/२ | १-००.०० पो.ख. ०-००.०० एकुण क्षेत्र १-००.०० | १.२५ |

सदरहू मिळकतीबद्दल कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथम दर्शनीय कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरून आम्ही सदरहू मिळकतीची वरीलप्रमाणेचे मालकी हक्काची पडताळणी पूर्ण करु व मिळकत बोजारहीत असल्याचे स्पष्ट झाल्यास आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि. ०७/०४/२०२६

**श्री. योगेश स. बाप्टे, (अॅडव्होकेट)**
पत्ता : ऑफिस क्रं. ७, तळमजला, जयनारायण
को. हौ. सो. लि., गावदेवी मंदिराजवळ पनवेल,
जि. रायगड ४१० २०६
मो. नं. ८८९८१२१९७१



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे मोठे वढाव, ता. पेण, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची जमिन मिळकत असुन सदर मिळकतीचे विद्यमान मालक/कब्जेदार यांचेकडून सदर मिळकत आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे मोठे वढाव, ता. पेण, जि. रायगड येथील**

| मालक/कब्जेदाराचे नाव | भुमापन क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.-आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| देवराम महादेव वर्तक | १६९ | - | ०-१०.९० | १.४४ |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरीक्त सदर मिळकतींसदर्भात अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, अॅटॅचमेंट, अन्न वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कब्जा, एम.ओ.यु, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्झिशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ (एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील देवराम महादेव वर्तक यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. ०५/०७/२०२६

**श्री. तुषार द. देवरे, अॅडव्होकेट**
पत्ता : फ्लॅट नं.ए २, जय नगर को.ऑप हौ. सोसा.लि.
कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६,
जि. रायगड. मोबाईल नं. ९३२५००४००८



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक चंद्रकांत हिरामण शिंदे व इतर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे : मौजे कुशिवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| १५/४/क | एकुण क्षेत्र ०-९८-०० हे आर पॉ, पोट खराब क्षेत्र ०-९७-०० हे आर पॉ असे एकुण क्षेत्र १-९५-०० हे आर पॉ | ०-५३ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक ०५/०७/२०२६

**वकील अॅड. वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०९४६८५४
पत्ता- दहिवली तर्फे नीड तालुका
कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील अॅड. निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९१९०९
पत्ता- दहिवली तर्फे नीड तालुका
कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१



## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● शुभमुहूर्त प्रथम पुर्नविवाह सर्वजातीय आंतरजातीय वेबसाईटसह, स्थळांसाठी रोहा पनवेल गणेश महाकाळ ८८८८९३५७७५

● प्रशस्त ३००० चौरस फूट खुला हॉल ऑफिशिअल कामासाठी भाडेतत्त्वावर देणे आहे. गरजूनी संपर्क करावा.
संपर्क - ९२२६३७९८४४ / ९८२३९२७२८८

● Vacancy for Furniture store Manager, location- Zirad, Qualification Graduation, MBA Experience- 2-4 years in Retail
Contact- 9823585321

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१



# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**




## राशीभविष्य

- **मेष** : यशानं भारावून जाऊ नका. आर्थिक व्यवहार विचारानं करावेत. मनस्तापाचे प्रसंग उद्‌भवू शकतात.
- **वृषभ** : योग्य संगतीबाबत खात्री करावी. कार्यक्षेत्रात अनुकूलता राहील. मित्र-नातलगांचं सहकार्य लाभेल.
- **मिथुन** : प्रापंचिक अडचणी हैराण करतील. इतरांना शब्द देताना विचार करा. डोळ्यांचे विकार उद्‌भवतील.
- **कर्क** : कार्यक्षेत्रात संभ्रमावस्था निर्माण होईल. जुनी येणी रखडतील. कर्ज प्रकरणात पाठपुरावा करावा.
- **सिंह** : हाती घेतलेल्या कार्यात प्रगती होईल. व्यवसायात नव्या संधी लाभतील. आनंदी, समाधानी रहाल.
- **कन्या** : ग्रहमानाची अनुकूलता राहील. धनप्राप्तीचे नवे मार्ग सापडतील. सामाजिक क्षेत्रात संधी लाभतील.
- **तूळ** : गैरसमज वेळीच दूर करावेत. कामानिमित्त छोटा-मोठा प्रवास घडेल. प्रलोभनापासून दूर रहायला हवं.
- **वृश्चिक** : व्यवसायात पुरेशी काळजी घ्यावी. कौटुंबिक जीवनात मतभेद होतील. अनावश्यक खर्च टाळावा.
- **धनु** : वैद्यकीय कारणांसाठी खर्च होईल. व्यवसयात अनपेक्षित दिलासा मिळेल. कलागुणांचा विकास होईल.
- **मकर** : कार्यप्रवणतेतून प्रगती साधता येईल. कामाचा व्याप वाढेल. घरगती व्यवसायात प्रगती करू शकाल.
- **कुंभ** : अपेक्षाभंगाचं दु:ख सहन करावं लागेल. अनुभवींचा सल्ला कामी येईल. ज्येष्ठानी प्रकृती सांभाळावी.
- **मीन** : व्यवसायातील नवे बदल लाभदायक ठरतील. बेरोजगारांना दिलासा मिळेल. मुलांची प्रगती होईल.

ब्युटी टॉक

## चलती रंगीबेरंगी मस्काराची

मस्कारामुळे डोळे अधिक सुंदर दिसतात. सर्वसाधारणपणे आपण काळ्या रंगाचा मस्कारा लावतो. पण मस्काराचे इतर काही रंगही उठून दिसतात. बोल्ड लूकसाठी तुम्ही रंगीबेरंगी मस्कारा ट्राय करू शकता.

* काळ्यापेक्षा काही वेगळं ट्राय करायचं असेल तर ब्राउन मस्कारा लावा. ब्राउन मस्कारा तुम्हाला नॅचरल लूक देतो. हा मस्कारा पार्टी किंवा समारंभाला जाताना लावता येईल. ब्राउन रंगाचे डोळे असतील तर हा मस्कारा ट्राय करा. * हिरवट रंगाचे डोळे असणाऱ्यांनी निळ्या रंगाचा मस्कारा लावायला हरकत नाही. निळा रंग रात्रीपेक्षा सकाळी उठून दिसतो. * हटके लूकसाठी गोल्डन मस्कारा ट्राय करा. * डार्क ब्राउन रंगाचे डोळे असतील तर मस्काराच्या हिरव्या शेड ट्राय करा. हा रंग कोणत्याही वर्णावर शोभून दिसतो. हिरव्या शेडच्या मस्कारासोबत आयशॅडो लावू नका. * डोळ्यांचा आकार थोडा मोठा भासवायचा असेल तर पर्पल मस्कारा लावा. रॉयल पर्पल, प्लम आणि व्हायोलेट शेड्सची जास्त चलती आहे. सावळ्या वर्णाच्या महिलांवर पर्पल तर गोऱ्या वर्णाच्या महिलांवर व्हायोलेट शेड उठून दिसेल.

## ५ जुलै

दिन विशेष

**१९९८** : जपानचं अंतराळयान मंगळाकडे झेपावलं.
**२०१३** : अन्नसुरक्षा अध्यादेशावर राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांची स्वाक्षरी.
**२०१७** : भारत आणि इस्त्रायलमध्ये कृषी, विज्ञान आणि तंत्रज्ञान, अंतराळ, जलव्यवस्थापन आदी क्षेत्रातील करारांवर स्वाक्षऱ्या.
**२०१८** : कर्नाटकात काँग्रेस-धर्मनिरपेक्ष जनता दल सरकारने दोन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करण्याची घोषणा करुन शेतकऱ्यांना दिला दिला.

अजब गजब

## हे माहित आहे?

* बुटांच्या लेसच्या टोकावर प्लास्टिक किंवा मेटलचं कव्हर असतं. त्या ला एग्लेट असं म्हणतात. तर बुटांवर छिद्रं असतात त्यांना आयलेट असं म्हटलं जातं.

* नाकाच्या खाली आणि आणि ओठांच्या वरच्या बाजुला खोलगट भाग असतो. त्याला इंग्रजीत 'फिल्ट्रम' असं म्हणतात.

* पत्त्यांमधल्या बदामाच्या राजाला मिशी नाही. इतर राजांना मिशी आहे. असं का बरं झालं असावं? खरं तर या राजाला मिश्या होत्या. पण छपाईतील गोंधळामुळे त्याच्या मिशा छाटल्या गेल्या आणि बदामाचा राजा मिशीविनाच राहिला.

* दुष्काळ किंवा नैसर्गिक आपत्तीमध्ये मादी कांगारू पोटात वाढणाऱ्या पिलाचा विकास रोखू शकते. परिस्थिती सुधारल्यावर पिलाची वाढ पुन्हा सुरू करता येते.

* डुक्कर मान वर करून आकाशाकडे बघू शकत नाही. वर बघण्यासाठी त्याला झोपावं लागतं किंवा पाण्यात आकाशाचं प्रतिबिंब पहावं लागतं.

* मिनी माउसचं खरं नाव मिनर्व्हा आहे. मिनीचं पहिलं चित्र १९२८ मध्ये रेखाटण्यात आलं.

### पंचांग

**रविवार, ५ जुलै २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, निज ज्येष्ठ कृ. ५, चंद्रराशी : कुंभ, नक्षत्र : शततारका, योग : आयुष्मान, सूर्योदय ६.०८ सूर्यास्त ७.१८

### फॉरवर्ड्स

**रिश्तों क़े बाज़ार में थोड़ा सोच समझकर रहना ज़नाब...**

**यहाँ लोग़ वफ़ादार क़म अदाकार ज़्यादा हो ग़ये हैं...!**

आरोग्यमंत्र

## लंचटाईम टिप्स

दुपारचं जेवण हा आरोग्यदायी जीवनशैली जपण्यातला अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. त्यातच वजन कमी करायचं असेल तर दुपारच्या जेवणाकडे विशेष लक्ष द्यायला हवं. म्हणूनच फिटनेस जपणाऱ्यांसाठी या काही लंचटाईम टिप्स...



* दुपारच्या जेवणाची वेळ निश्चित करा. ठरलेल्या वेळी जेवण घ्या. कामाच्या नादात दुपारचं जेवण टाळलं जातं किंवा उशिरा घेतलं जातं. प्रचंड भूक लागली की जेवणाची आठवण होते. मग भूक मारण्यासाठी रस्त्यावरचं काही तरी खाल्लं जातं. हे चुकीचं आहे. ही सवय सोडा आणि दुपारी संतुलित आहार घ्या. * बरेचदा दुपारच्या वेळी बाहेर खाल्लं जातं. रेस्तराँमधल्या लंचला प्राधान्य दिलं जातं. मात्र सूप किंवा सॅलड मागवलं तरी त्यात बऱ्याच कॅलरी असतात. त्यामुळे हे टाळा आणि घरातूनच डबा घेऊन जा. * एकाच वेळी भरपूर खाऊ नका. अखेरच्या क्षणापर्यंत उपाशी राहिल्याने अतिखाणं होतं. * मेंदू कार्यरत राहण्यासाठी तसंच दिवसभराच्या कामासाठी ऊर्जा मिळवण्यासाठी दुपारच्या जेवणात कर्बोदकांना स्थान द्या. कर्बोदकं टाळल्याने तुम्हाला दमल्यासारखं वाटेल. * दुपारच्या वेळचा निरूत्साह टाळण्यासाठी आहारात प्रथिनांचा समावेश केला पाहिजे. प्रथिनांमुळे पोट भरलेलं राहतं. * दुपारच्या जेवणात साधारण आठ ग्रॅम फायबर असलं पाहिजे. यामुळे दिवसभराच्या फायबरची गरज भागेल.

### वेगळ्या वाटा

बारावी तसंच पदवी परीक्षेत कमी गुण मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांचा चांगलाच हिरमोड होतो. अशावेळी आपल्या आवडीनिवडींना मुरड घालावी लागते. वेगळे अभ्यासक्रम निवडावे लागतात. काही तडजोडी कराव्या लागतात. पण मित्रांनो, कमी गुण मिळाले म्हणून निराश होण्याची आवश्यकता नाही. आज करीअरचे अनेक मार्ग तुमच्यापुढे आहेत. आपली गुणवत्ता, आवड, कौशल्यं या बाबींचा विचार करून योग्य अभ्यासक्रमाची निवड तुम्ही करू शकता.

(क्रमश:)

करिअरवाटा

## लष्कराच्या वाटेवर...

अनेक तरूण-तरूणी लष्करात भरती होण्यासाठी प्रयत्नशील असतात. म्हणूनच इथल्या प्रवेशासंबंधीची प्राथमिक माहिती असायला हवी. लष्कराच्या तिन्ही दलांचे लढाऊ सेना आणि अनुषंगिक सेना असे दोन भाग असतात. मात्र तिन्ही दलातील या दोन भागांची नावं आणि त्यात



भरती होणाऱ्या जवानांच्या जबाबदाऱ्या वेगवेगळ्या असतात. त्यानुसार आवश्यक पात्रताही वेगळ्या असतात. उदाहरणार्थ पायदळामध्ये भरती होण्यासाठी नॅशनल डिफेन्स अकॅडमी हा एक मार्ग आहे. त्याला एनडीए असं म्हणतात. बारावी उत्तीर्ण झालेल्या कोणत्याही विद्यार्थ्याला एनडीए मध्ये प्रवेश घेता येतो. भरतीसाठी आधी विशिष्ट नमुन्यातील परीक्षा द्यावी लागते. या परीक्षेला नॅशनल डिफेन्स अकॅडमी किंवा नॅव्हल अकॅडमी एक्झामिनेशन म्हणतात. इंडियन मिलिटरी अकॅडमी डेहराडून यांच्यातर्फे पायदळातील एनडीएसाठी भरती केली जाते तर गोव्यातील नॅव्हल अकॅडमीतर्फे एनडीएचा अभ्यास करून नौदलात जाऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांची परीक्षा घेतली जाते. हवाई दलात भरती होण्यासाठी एनडीएत येऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांची प्रवेश परीक्षा हैदराबाद येथील एअरफोर्स अकॅडमीतर्फे घेतली जाते.

खेचाखेची

## ऑल आऊट!

**मोलकरीण**: बाईसाहेब, तुमच्या मुलाने डास खाल्ले.
**बाईसाहेब**: माझं तोंड काय बघतेस? डॉक्टरला बोलाव.
**मोलकरीण**: आता घाबरण्याचे कारण नाही बाईसाहेब,
.
.
.
मी त्याला ऑल आऊट पाजले आहे.

### वेगळं काही

मध्यंतरी बंगळूरूतल्या विद्याशिल्प अकादमीतल्या विद्यार्थ्यांनी ज्येष्ठांच्या डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी निधी गोळा करून अनेकांपुढे आदर्श उभा केला होता. अकादमीच्या ११० विद्यार्थ्यांनी मिळून ३५८० ज्येष्ठांसाठी ३५ लाख रुपयांचा निधी उभा केला. विशेष म्हणजे या विद्यार्थ्यांनी फक्त दहा दिवसात ही कामगिरी करून दाखवली. सुरूवातीला २४०० ज्येष्ठांसाठी २२ लाख रुपये निधी जमवण्याचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं होतं. मात्र नंतर हा आकडा वाढवण्यात आला. क्राउड फंडिंगच्या माध्यमातून हा निधी उभा राहिला. सुरूवातीच्या टप्प्यात चार विद्यार्थ्यांनी एक लाख रुपयांपेक्षा अधिक रक्कम जमवली. या शाळेतले विद्यार्थी सामाजिक कार्यासाठी नेहमीच पुढाकार घेतात.

रुचिरा

## पॅन केक बनवा घरच्या घरी!

मुलांचं केकविषयीचं प्रेम लक्षात घेता घरीच्या घरी केक बनवण्याची रेसिपी जाणून घ्यायला हवी.

साहित्य- १२५ ग्रॅम मैदा, एक टी स्पून बेकिंग पावडर, दोन टी स्पून पिठीसाखर, १२५ ग्रॅम साखर, एक अंडं, एक टेबलस्पून तूप, एक केळं गोल, चवीपुरतं मीठ.



कृती- एक बाऊलमध्ये मैदा, बेकिंग पावडर, मीठ आणि पिठीसाखर एकत्र करा. दुसऱ्या बाऊलमध्ये दूध, अंडं आणि तूप एकत्र करा. आता मैद्याचं मिश्रण दुधाच्या बाऊलमध्ये मिसळा आणि ब्लेंडरने फेटून घ्यावं. त्यामुळे मिश्रण चांगल्या प्रकारे एकजीव होण्यास मदत होईल. त्यानंतर मिश्रण काही काळ तसंच राहू द्यावं. आता नॉनस्टिक तवा मध्यम आचेवर गरम करून घ्यावा. तवा तापला की त्यावर तूप पसरा. त्यावर मैद्याचं मिश्रण एकसारखं गोल पसरुन घ्या. मिश्रणाच्या पृष्ठभागावरून वाफ निघेपर्यंत बेक करा. आता त्यावर केळाचे काप ठेवा. काप ठेवलेली बाजू उलटा आणि तव्यावर शेकून घ्या. हा पॅनकेक दोन्ही बाजूंनी सोनेरी रंगावर शेकून घ्या. पॅनकेक एक सेंटिमीटर जाडीचा असायला हवा.

## सुडोकू १२४


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | | | | ३ | | ६ | | |
| १ | ५ | २ | | ४ | | | | ३ |
| | | | १ | | ५ | | | |
| ५ | ८ | | | | ६ | | | ९ |
| | | | ७ | | ४ | | | |
| ३ | | | ८ | | | | ५ | ७ |
| | | | ४ | | १ | | | |
| ४ | | | | ६ | | ३ | ७ | २ |
| | | ९ | | २ | | | | १ |

टीप -
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्व ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १२३ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ५ | १ | ७ | ६ | २ | ८ | ४ | ३ |
| ८ | ३ | २ | ९ | ५ | ४ | ६ | १ | ७ |
| ७ | ४ | ६ | ३ | १ | ८ | ५ | ९ | २ |
| ३ | ७ | ५ | १ | ४ | ६ | ९ | २ | ८ |
| ४ | २ | ९ | ५ | ८ | ७ | ३ | ६ | १ |
| १ | ६ | ८ | २ | ३ | ९ | ७ | ५ | ४ |
| २ | १ | ३ | ६ | ७ | ५ | ४ | ८ | ९ |
| ६ | ८ | ४ | ४ | ९ | १ | २ | ३ | ५ |
| ५ | ९ | ४ | ८ | २ | ३ | १ | ७ | ६ |

## शब्दकोडे क्रमांक १२४




**आडवे शब्द :-**
१) वाईटाच्या संगतीत चांगला लागल्यास वाईटाच्या नाशाबरोबर चांगल्याचाही नाश होतो या अर्थाची म्हण
९) दिवटी
११) तिबेटची राजधानी
१२) अंगातील मस्ती
१३) केव्हा (ग्रा.)
१४) खुमारी, स्वाद, चव, गोडी
१५) सरसकट
१८) तीळ साखरेचा काटेरी पदार्थ
१९) मोठी जाड सुई
२०) लाकूड कापण्याचे हत्यार
२१) दिवस
२२) सूर्य
२३) वाऱ्याने हलणाऱ्या झाडांच्या पानांचा आवाज
२५) लक्षाचा आकडा
२७) पराक्रम केल्याचा बिल्ला
२८) संगतीमुळे प्राप्त होणारा गुण
३१) मिठाई तयार करणारा
३२) गवंडी
३३) फुरसत
३४) बैलाच्या सहाय्याने विहिरीतून पाणी काढण्याचे साधन
३५) महाभारतातील एक खादाड राक्षस
३७) पाणी, आयुष्य
३९) मऊ कापसाचा वृक्ष
४०) मृदा
४१) पलंग
४२) तृप्त करणारे अन्न किंवा जेवण
४३) कमळाचे तळे
४४) शक्यता
४६) कांतार
४८) रक्ताचा रंग
४९) अतिशय कडक
५०) अकारण
५१) प्रेम (हिं)
५२) स्त्री, महिला
५३) स्वयंपाकी
५५) अंगाची होणारी आग
५६) जन्म
५८) रानरेडा
६०) खिशातील चौकोनी वस्त्र
६२) नृत्य
६३) वालवी, उणीव
६४) राजा
६५) मिळकत, उत्पन्न (हिं)
६७) सांभाळणारा, एक पालेभाजी
६८) नोकरी करणारा
७०) मसाल्यातील एक पान
७१) एक पाताळ
७२) वर्ष, सन
७३) अंतरिक्ष

**उभे शब्द :-**
१) एखादा पदार्थ, वस्तू अल्पप्रमाणात मिळाल्यास त्यात समाधान मानणे या अर्थाची एक म्हण
२) मेदिनी, वसुधा
३) भरभराट
४) रोगाने पीडलेला
५) धोबी
६) चा मुलगा
७) भारताच्या पहिल्या पंतप्रधानांचे पूर्ण नाव
८) दिव्यात तेल घालणे,वाती तयार करणे इ दिवे लावण्याच्या पूर्वीची तयारी
९) मत नोंदविण्याचा कागद
१०) लोणचे
१५) सूट
१६) शुद्ध, सर्व, नि:शेष
१७) टवाळकी करणारा
२३) उत्सव
२४) तळे
२६) खांदा, खांद्याचे हाड
२९) हत्तीचे तोंड
३०) देशी दारू मिळण्याची जागा
३३) नवऱ्याची दुसरी पत्नी
३५) केसांची लट
३६) सोपे
३८) नमस्कार
३९) आपणास समाविष्ट करण्यासंबंधी केलेला करार
४०) प्रकरण, घटना
४१) मीठाची चव
४४) एकत्र गोळा करणे
४५) तोंडातोंडी झालेला व्यवहार
४६) फणसाचा एक प्रकार
४७) एक ओबडधोबड खाजरा कंद
५०) छोटी विश्रांती
५४) हवालदार
५५) दंत
५६) पाणी
५७) एक पालेभाजी
५९) चोपडी
६०) चलनवलन
६१) विपुलता, रेलचेल
६२) मंजूळ आवाज, छंद
६४) दहावी रास, मगर
६६) सहाय्य
६९) **तळ, सप्तपाताळापैकी सर्वात शेवटचे पाताळ

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# विजयाताई : व्यक्ती नव्हे, विचार

**फार थोडी माणसे रंगभूमीची विचारधारा बदलतात. विजयाबाई मेहता या त्या दुर्मिळ व्यक्तिमत्त्वांपैकी एक होत्या. म्हणूनच त्यांचे अस्तित्व त्यांच्या नाटकांपुरते मर्यादित नव्हते, तर मराठी रंगसंस्कृतीत कायमचे रुजले. विजयाबाई मेहता यांनी मराठी रंगभूमीला केवळ नवी नाटके दिली नाहीत, तर नाटकाकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली. प्रयोगशीलता, परिपूर्णतेचा ध्यास, कलात्मकता आणि शिस्त यांचा त्यांनी अद्वितीय संगम घडवला.**

अभिराम भडकमकर

विजयाबाई आपल्यात नाहीत, हे कळले आणि मनाला प्रचंड धक्का बसला. वयाच्या ९२ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. 'कलाक्षेत्रातील ध्रुवतारा निखळला', 'कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली' अशी वाक्ये आपण अनेकदा वाचतो किंवा ऐकतो. पण त्यांचा खरा अर्थ मला त्या क्षणी तीव्रतेने जाणवला. खरोखरच, विजयाबाई मेहता मराठी रंगभूमीच्या आकाशात ध्रुवताऱ्यासारख्या अढळ होत्या. कित्येक पिढ्या आल्या. अनेक कलाकार घडले. नाटकाचे प्रवाह बदलले. नवे प्रयोग झाले. पण विजयाबाईंचे स्थान मात्र अढळ राहिले. विजयाबाई उत्तम अभिनेत्री किंवा दिग्दर्शिका तर होत्याच, पण अत्यंत अभ्यासू, प्रशिक्षित आणि डोळस रंगकर्मी होत्या. त्यांनी अल्काझी यांच्याकडे नाट्यप्रशिक्षण घेतले होते. त्यांच्याबरोबर काम करताना रंगभूमीची शिस्त, अभ्यास, बारकावे आणि नाट्यभाषेचे भान त्यांनी आत्मसात केले होते. त्यानंतर त्यांनी मराठी रंगभूमीसाठी काम करण्यास सुरुवात केली. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक कामामध्ये शिस्त, चिकित्सक दृष्टी आणि परिपूर्णतेचा आग्रह दिसून येत असे. अभिनेत्री म्हणून असो वा दिग्दर्शिका म्हणून, त्यांच्या प्रत्येक कलाकृतीमध्ये स्वयंस्फूर्तता, जिवंतपणा आणि सृजनशीलतेचा सुंदर संगम जाणवत असे. कोणतेही पात्र साकारताना कलाकाराने त्या व्यक्तीचा सखोल विचार करावा, त्याच्या भावना, प्रतिक्रिया आणि हालचाली नैसर्गिक असाव्यात, यासाठी कलाकाराने स्वतःला त्या भूमिकेशी पूर्णपणे जोडून घ्यावे, असे त्यांचे मत होते. नाटक म्हणजे केवळ संवादांचे सादरीकरण नसून सृजनाचा एक सुंदर आविष्कार आहे, असे त्या मानत.

विजयाताई तालमीदरम्यान कलाकारांशी भूमिकेवर सविस्तर चर्चा करत. 'ही व्यक्ती अशी का आहे?', 'ती असे का बोलते?', 'तिच्या वागण्यामागचे कारण काय आहे?' अशा प्रश्नांची उत्तरे त्या कलाकाराला स्वतःला शोधायला लावत. कलाकाराला आपल्या भूमिकेचे अंतरंग समजले, तरच त्याच्या अभिनयात सहजसुंदर नैसर्गिकता येते, असा त्यांचा विश्वास होता. त्यांच्या या विचारांचा प्रत्यय त्यांच्या प्रत्येक नाटकात येत असे. अभिनेत्री म्हणून त्यांनी साकारलेल्या भूमिका असोत किंवा दिग्दर्शिका म्हणून उभे केलेले नाट्यप्रयोग, दोन्ही ठिकाणी त्यांचा अभ्यास, कल्पकता आणि परिपूर्णतेचा ध्यास स्पष्ट दिसत असे. प्रयोगशील मराठी रंगभूमी समृद्ध करण्यात विजयाबाईंचे योगदान अनन्यसाधारण आहे. पण त्यांचे मोठेपण एवढ्यावरच थांबत नाही. त्यांनी 'हमीदाबाईची कोठी', 'बॅरिस्टर', 'वाडा चिरेबंदी', 'संध्याछाया', 'जास्वंदी' यासारखी नाटके व्यावसायिक रंगभूमीवर आणली आणि प्रयोगशील आणि व्यावसायिक रंगभूमी यांच्यामध्ये उभी राहिलेली कृत्रिम सीमारेषा पुसून टाकली. व्यावसायिक नाटकही तितकेच दर्जेदार, कलात्मक आणि विचारप्रवर्तक असू शकते, हे त्यांनी कृतीतून सिद्ध केले. विजयाबाईंची प्रयोगशील वृत्ती सतत नव्याचा शोध घेत होती. मात्र हा नवतेचा आग्रह केवळ वेगळेपणासाठी नव्हता. नाटक अधिक प्रभावी आणि अधिक विश्वासार्ह करण्यासाठी त्यांची धडपड असे. त्यांच्या परिपूर्णतेचा ध्यास सर्वकष होता. नाटकातील प्रत्येक तपशील त्यांच्यासाठी महत्त्वाचा असे. एका नाटकासाठी नेपथ्यामध्ये जुना ग्रामोफोन हवा होता. तो मिळवण्यासाठी त्यांनी चोरबाजारातील गल्ल्यागल्ल्या पालथ्या घातल्या.



'वाडा चिरेबंदी' मधील एका प्रसंगात वाड्याची माती ढासळते. ते दृश्य पाहताना प्रेक्षकांच्या अंगावर अक्षरशः काटा उभा राहत असे. हा परिणाम साधण्यासाठी त्यांनी जोंधळ्याच्या दाण्यांचा कल्पक वापर केला होता. अशा असंख्य तपशीलांमधून त्या रंगमंचावर वास्तव उभे करत. मी 'वाडा चिरेबंदी' हे नाटक सात वेळा पाहिले आहे.

प्रत्येक वेळी पडदा उघडताच मी एका वेगळ्याच जगात प्रवेश करत असे. खरे तर हे नाटक त्यानंतर अनेक दिग्दर्शकांनी बसवले असून मी ते प्रयोग पाहिलेही आहेत. पण बाईंनी बसवलेल्या 'वाडा चिरेबंदी'ने दिलेला अनुभव आजतागायत दुसऱ्या कोणत्याही प्रयोगाने मला दिलेला नाही. विजयाबाईंच्या मते नाटक म्हणजे केवळ अभिनय नव्हे, ते संगीत, नृत्य, चित्रकला, शिल्पकला, कविता, नेपथ्य, प्रकाशयोजना आणि कलाकारांच्या सामुहिक सृजनाचा संगम आहे. ही व्यापक रंगदृष्टी रुजवण्यासाठी त्यांनी 'रंगायन'ची स्थापना केली. श्री. पु. भागवत, पु. शि. रेगे यांसारख्या साहित्यिकांनाही त्यांनी त्यात सहभागी करून घेतले. नाटककारांबरोबर त्या अत्यंत बारकाईने काम करत. प्रत्येक शब्द, प्रत्येक वाक्य आणि प्रत्येक संवाद परिणामकारक असावा, असा त्यांचा आग्रह असे. आवश्यक वाटल्यास नाटककारांशी चर्चा करून त्या बदलही सुचवत. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांची व्याख्याने आणि मास्टरक्लास. मला त्यांच्याबरोबर प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळाली नाही. पण एफटीआयआयमध्ये त्यांचा मास्टरक्लास अनुभवण्याचे भाग्य लाभले. त्यांचे प्रत्येक व्याख्यान म्हणजे रंगकर्मींसाठी एक पर्वणी असे. विजयाताईंचा प्रत्येक विषयाचा अभ्यास विलक्षण सखोल होता. प्रत्येक कलाकृतीमागे त्यांची ठाम वैचारिक बैठक असे. त्यामुळे त्या आपल्या समकालीन दिग्दर्शकांपेक्षा आणि आजच्या अनेक तरुण दिग्दर्शकांपेक्षाही किती तरी पुढचा विचार करत असत. त्यांनी आपल्या शिष्यांना केवळ अभिनय किंवा दिग्दर्शन शिकवले नाही, तर एक स्वतंत्र रंगभाषा दिली. स्वाती चिटणीस, भारती आचरेकर, नीना कुलकर्णी, अशोक सराफ, सुकन्या कुलकर्णी, प्रदीप वेलणकर यांच्यासह अनेक कलाकार त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडले. सुदैवाने मला विजयाबाईंचे गुरु फ्रिट्झ बेनेव्हिट्झ यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली. ते विजयाबाईंचे गुरुही होते आणि मित्रही. एकदा बोलता बोलता मी फ्रिट्झ बेनेव्हिट्झ यांना सहज म्हटले, 'भारतातील दोन स्त्रियांचे हास्य मला सर्वात सुंदर वाटते. एक म्हणजे मधुबाला आणि दुसऱ्या म्हणजे विजयाबाई.' पुढच्याच क्षणी फ्रिट्झ सरांनी हसून माझ्याशी सहमती दर्शवली. मराठी नाटके जर्मनीमध्ये नेण्यामागे विजयाबाईंना फ्रिट्झ सरांची मोठी मदत झाली होती. त्या दोघांनी अनेक वर्षे एकत्र काम केले होते. विजयाबाईंनी अनेक दर्जेदार अनुवादित नाटके मराठी रंगभूमीवर आणली. 'अजब न्याय वर्तुळाचा' हा त्यापैकी एक महत्त्वाचा प्रयोग. त्याचबरोबर गिरीश कर्नाड यांची 'हयवदन' आणि 'नागमंडल' यासारखी नाटकेही त्यांनी मराठी रंगभूमीवर आणली. महेश एलकुंचवार यांच्यासारख्या नाटककारांना घडवण्यातही त्यांचा मोठा वाटा आहे असे मला वाटते.

माझे 'ज्याचा त्याचा प्रश्न' हे नाटक मी त्यांना वाचायला दिले होते. त्यांनी त्याचे दिग्दर्शन करावे, अशी माझी, लता नार्वेकर आणि आम्हा सर्वांचीच इच्छा होती. पण त्या काळात त्या एनएसडी आणि एनसीपीएच्या कामात व्यग्र असल्याने तो योग जुळून आला नाही. मात्र त्या माझे नाटक पहायला आल्या होत्या. त्यानंतर त्यांच्याबरोबर झालेली चर्चा माझ्यासाठी खूप मार्गदर्शक ठरली. हातात घेतलेल्या कामाविषयी मनापासून आदर बाळगून, त्याचा सर्वांगीण विचार करून ते परिपूर्णतेने पूर्ण करणारा तो व्यावसायिक; तर नाट्यकलेवर निस्सीम प्रेम करून प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता काम करणारा तो प्रयोगशील रंगकर्मी, असे विजयाबाईंचे मत होते. इचलकरंजी येथे भरलेल्या मराठी नाट्य संमेलनाच्या त्या अध्यक्ष होत्या. त्या वेळी संपूर्ण शहरातून त्यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. तो एका व्यक्तीचा नव्हे, तर मराठी रंगभूमीने आपल्या एका श्रेष्ठ कलावंताला वाहिलेला सन्मान होता. गणपतराव बोडस, मामा वरेरकर, चिंतामणराव कोल्हटकर, नानासाहेब फाटक, मामा पेंडसे आणि आदी मर्झबान ही त्यांची आदराची स्थाने होती. विशेषतः आदी मर्झबान यांच्याकडून त्यांनी रंगमंचाचे तंत्र, नियोजन आणि व्यवस्थापनाचे अनेक बारकावे आत्मसात केले. विजयाबाई एनएसडीच्या चेअरमन असताना मी तेथे शिक्षण घेत होतो. पण त्या काळात त्या प्रशासकीय कामात अधिक व्यग्र होत्या. त्यामुळे त्यांच्याकडून प्रत्यक्ष शिक्षण घेण्याची संधी मिळाली नाही. दिल्लीमध्ये 'वाडा चिरेबंदी'च्या प्रयोगानिमित्त त्यांच्याबरोबर काही वेळ घालवण्याची संधी मिळाली होती. त्या थोड्याशा संवादातूनही त्यांच्या अनुभवाची खोली आणि रंगभूमीविषयीची निष्ठा प्रकर्षाने जाणवत होती. विजयाबाईंनी आपल्या कामावर निस्सीम प्रेम केले आणि म्हणूनच रसिकांनीही त्यांच्यावर तितकेच प्रेम केले.

पुण्यातील एका व्याख्यानानंतर त्या उशिरा विमानतळावर पोहोचल्या. त्यांची विमानाची वेळ निघून गेली होती. पण त्यांच्याविषयी असलेल्या आदरामुळे त्यांच्यासाठी विमानाचे दरवाजे पुन्हा उघडण्यात आले. हा सन्मान त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आणि कर्तृत्वालाच मिळालेला होता. म्हणूनच मला नेहमी वाटते, विजयाबाई मेहता ही केवळ एक व्यक्ती नव्हती, तर त्या एक विचार होत्या. त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांमध्ये रुजवलेले नाट्यसंस्कार, निर्माण केलेली रंगभाषा आणि त्यांनी दिलेली कलात्मक मूल्ये पुढील अनेक पिढ्यांपर्यंत पोहोचत राहतील. त्या अर्थाने विजयाबाई आपल्यातून कधीच जाणार नाहीत. त्या आपल्या नाटकांमध्ये, आपल्या कलाकारांमध्ये आणि आपल्या रंगसंस्कृतीत सदैव जिवंत राहतील.

(शब्दांकन : मेधा इनामदार)

# देवभूमी हिमाचल

आज दिवसभराचा प्रोग्राम ठरलेला होता. सकाळीच भरपेट नाश्ता करून भटकंतीला निघायचे होते. आज दोन ट्रेक करायचे होते. आमच्या हॉटेलमधून बाहेर पडणे हाच एक छोटासा ट्रेक होताच. मग मुद्दाम ठरवून करायचा ट्रेक कसा असेल हा एक विचार कुरतडत होताच मनाला. तरीही अत्यंत पॉझिटिव्ह विचार मनात जागवत निघालो.

गुशैनी पासून थोड्या अंतरावरील जिभी येथे जायचे होते.टेम्पो ट्रॅव्हलरने तिथे पोहोचवले.''मिनी थायलंड'' म्हणजेच ''कुल्ही कूतांडी'' हे आजचे पहिले डेस्टिनेशन होते.

सौरभ सहज बोलता बोलता महत्त्वाची माहिती देतो. आपले लक्ष मात्र असायला हवे.कोणताही प्रश्न विचारला की त्याच्याजवळ उत्तर तयार असे. हिमाचल प्रदेशात पर्वतरांगांमधून प्रवास करताना जशा वेगवेगळ्या पर्वत राजी सामोऱ्या येतात तशाच खूप नद्याही भेटतात. अगदी सुरुवातीला आम्हाला जी नदी भेटली ती बियास. बराच काळ तिच्या साथीने पुढे गेलो. त्यानंतर तिचीच उपनदी असलेली सैंज, हिच्या काठाकाठाने बराच काळ जात राहिलो. तिर्थन नदीसुद्धा बियासची उपनदी. या बद्दल बोलताना सौरभ म्हणाला, ''बियास ही सप्तसिंधूंपैकी एक नदी. आहेत का माहिती या सात नद्या?'' दोनतीन नावे आठवली पण सगळी माहितीच नव्हती. त्याने पटापट नावे सांगितली, ''सिंधू, झेलम, रावी, सतलज, चिनाब, बियास आणि सरस्वती.'' खूपच छान माहिती मिळाली.

आज जिथे जाणार होतो ती होती तीर्थन नदीची उपनदी पुष्पभद्रा. आम्ही काय पाहणार होतो याबद्दल अनभिज्ञ होतो.''कुल्ही कुतांडी'' असा बोर्ड लावलेला होता. रस्त्यावर त्याजागी उभे राहून खाली निर्देश करून आपल्याला इथे जायचे आहे उतरून असे आम्हाला सांगितले.

एका जंगलात खोल खोल खाली उतरत जाणाऱ्या उंच उंच पायऱ्या दिसत होत्या. तळ अर्थातच दिसत नव्हता. सुरूची गगनचुंबी झाडे, आणि वळणा-वळणाचे रस्ते इतकेच वरून दिसले. जरा धडकी भरली. कारण पायऱ्या सुद्धा सोप्या नव्हत्या.

''किती अंतर असेल असे उतरायचे?''


''फार नाही, जमेल तितके उतरा, नाहीच जमले तर तिथून वर या.''

काय करावे, जावे की नाही , या मोठ्या चिंतेत पडले. तितक्यात जवळच असलेल्या एका छोट्याशा दुकानाबाहेर लाकडे, काठ्या पडलेल्या दिसल्या.

''आपके पास लकडी मिलेगी? मुझे उतरना हैं निचे...'' मी दुकान मालकाला विचारले.

''है क्या उधर?'' त्याचा मलाच प्रतिप्रश्न.

मी पुढे होऊन लाकडे वरखाली करून एक काठी मिळवली. त्याला दाखवल्या वर, ''अच्छा ये चलेगी आपको? ठीक हैं, ले लो. २० रुपया दे दो.'' माझे मोठेच काम झाले. या काठीने



तिथून पुढे संपूर्ण ट्रिपभर मला बहुमोलाची साथ दिली.

काठी हातात आली आणि तेवढ्यात खालून वर आलेल्या मुलांना आम्ही विचारले की , ''खाली जाणे कितपत कठीण आहे ?'' '' फार अवघड नाही. या थोड्याच पायऱ्या कठीण आहेत. पुढे सरळ रस्ताच आहे. जाल तुम्ही.''

आमची हिंमत बळावली. जाऊन तर पाहू ठरवले आणि उतरायला लागलो. मुळीच सोपा उतार नव्हता पण जमले आम्हाला. नंतर जंगलातील रस्ता होता, खाचखळग्यांचा. झुडुपे, वेली, वृक्ष यातून वाट काढत जायचे होते. एके ठिकाणी तर अत्यंत चिंचोळा रस्ता होता. तिथून एक पाइपलाइन जात होती. त्या पाइपाला ओलांडून पुढे जायचे होते, गेलो. पुढे त्याच पाइपाच्या खालून पलिकडे उतरायचे होते. मग परत एकदा ते दगड मातीचे चढ उतार. कसरती करून एकदा उतरलो खाली.

कातळाची नैसर्गिक कमान, खाली मोठाले धोंडे आणि त्यातून वाहणारी ती पुष्पभद्रा नदी. आपोआप तिथे तिला तलाव सदृश्य मिळालेले स्वरूप. निसर्गाची कमाल. बर्फासारखे थंडगार पाणी. एवढ्या केलेल्या कसरतींचे सार्थक झाले. पाण्यात पाय बुडवले. त्या धोंड्यांवर बॅलन्स करत कातळाखाली सगळा ग्रुप एकत्र बसलो आणि मस्त सेल्फी घेतले. थायलंडमध्ये याच्याशी साधर्म्य असणारे बरेच पॉइंट्स आहेत म्हणून बाहेरून आलेल्या प्रवाशांनी मिनी थायलंड नाव दिले या स्पॉटला. मात्र स्थानिक लोकांना हे मान्य नाही, पसंत नाही. त्यामुळे त्यांच्याशी बोलताना कुल्ही कुतांडी असेच म्हणावे लागते. तसेच फलक ही लावले आहेत. परतीचा प्रवास पुन्हा तसाच पाइपाखालून, वरून, दगडांवर तोल सांभाळत, पायऱ्या चढून पुरा केला. आम्ही अगदी जगच जिंकले जणू अशा आनंदी झालो.

त्या अरुंद रस्त्यांवर गाडी थांबू शकत नाही. ती कुठे लांब जाऊन उभी असते. आता लंच टाइम झाला होता. उताराच्या रस्त्यावरून जवळपास एकदिड किलोमीटर चालत निघालो. आमच कॅफे रस्त्यावरच होते मात्र अरुंद जिन्याने वर जाणे अपरिहार्य होते. इथे एकूणच पाहिले तर सगळीकडेच रस्ते चढउताराचे. यांची घरे एकतर खाली नाहीतर वर. सतत आपले जिनेच वापरावे लागतात. ही मंडळी टणाटण उड्या मारत फिरताना दिसतात.त्याविषयी सांगेनच. आम्ही मात्र आता चढायचे म्हटले की गळून जायला लागलो. तरुण पोरांनी चालवलेला हा कॅफे खरंच मस्त होता. गॅस टंचाईमुळे वर भरभर कामे करत होती. मुले हिमाचलमध्ये नेहमी ब्रेकफास्टला पुरी, आलूची रसभाजी, आलू पराठे, ऑमलेट ब्रेड, पोहे, उकडलेली अंडी असे पदार्थ असतात. लंच आणि डिनरला पनीर, फ्लॉवर, चिकन, काली किंवा मां की दाल, मिक्स दाल, रोटी, पराठे, चावल असे ठराविक पदार्थ मिळतात. तेच ते खाऊन कंटाळलो. बाजार दिसायचे वाटेत तिथे भेंडी, कोबी, दुधी, वांगी अशा बऱ्याच भाज्या दिसायच्या. मग त्या हॉटेल मालकाला विनंती केली की या भाज्या द्या की. त्यानेही अत्यंत आनंदाने , '' ठीक हैं, थोडा रूकीये , बनाते हैं. एकदम घर जैसा बनाके देंगे'' असे सांगून खरोखर उगीच मसाले न घालता भेंडी, कोबी भाज्या करून खिलवल्या. एकदा तर वांगी बटाटा रस्सा भाजी सुद्धा मिळाली करून. मजा आली.

आजचे लंच पिझ्झा, गार्लिक ब्रेड

सफर

वर्षा कुवळेकर

८७६६५६९१३६

आणि असे होते. पोटभर चवीचे खाऊन निघालो. जिभी येथील प्रसिद्ध धबधबा हा आजचा पुढचा टप्पा होता. पुन्हा एकदा गाडी आम्हाला डेस्टिनेशन वर सोडून गेली. इथेही रस्त्यावर परत एका उतारासमोर उभे होतो. पुन्हा एकदा जंगलात शिरायचे होते. पण आता आम्ही अनुभवी होतो आणि हातात काठी होती. एकमेकांना सांभाळत आम्ही उतरायला लागलो. हे आणखी गहिरे जंगल होते. खडे पहाड, त्यातून रस्ते. वेडेवाकडे वाढलेले वृक्ष, वेलींची जाळी. या सर्वातून निर्माण झालेले नैसर्गिक सेल्फी पॉइंट्स. छोटे छोटे लाकडी पूल, जंगलातून जाणवणारा एक शिरशिरी आणणारा गारवा. फोटो काढत, त्यासाठी वेगवेगळे स्पॉट्स शोधत सतत कानाला जाणवणाऱ्या पाण्याच्या गाजेचा शोध घेत आम्ही त्या धबधब्याजवळ पोहोचलो. उंचावरून पडणाऱ्या शुभ्रधारा पाहूनच थकवा ओसरला. तरुण मंडळी त्या धारांखाली उभी राहून चिंब भिजत होती. वाहत आलेल्या पाण्याला गोलाकार कुंडात अडवले होते. दगडी कठडे होते. त्यावर बसून पाण्यात पाय बुडवण्याच्या मोहाला टाळणे अशक्य होते. आरामात बूट काढून पाय पाण्यात आनंदाने घातले खरे पण दोनच मिनिटात चटका बसल्यासारखे बाहेर काढावे लागले. प्रचंड थंड पाणी. पुन्हा पुन्हा पाय घालायचे, काढायचे. खेळच जणू. पण लवकरच पाय गोठले अगदी. बोटे सुद्धा हलेनाशी झाली. तरूणाई कशी काय धारा अंगावर झेलत होती देवच जाणे. पण खूप खूप छान वाटले. त्याजागी खूप रमलो सगळे. फोटो सेशन्स झाली. पाय निघत नव्हते इतका आनंद मिळाला. जायला तर हवेच होते परत. हॉटेलवर परतल्यावर जेवणासाठी वरच्या डायनिंग रूम मधे जायचीही ताकद कशीबशी गोळा केली. उद्याचा मोठा प्रवास आणि प्रेक्षणीय स्थळे वाट पाहत होती त्यामुळे आपापले बिछाने गाठले.

**

# संवाद कौशल्ये : विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची आणि उज्ज्वल करिअरची गुरुकिल्ली

सुनील गवळी

''शब्द हे केवळ संवादाचे साधन नसतात; ते व्यक्तिमत्त्व घडवतात, नाती जोडतात आणि भविष्य घडवतात.''

विद्यार्थ्यांच्या आयुष्यात अनेक विषय, अनेक परीक्षा आणि अनेक स्पर्धा येतात. तो गणित शिकतो, विज्ञान समजून घेतो, इतिहास जाणून घेतो, तंत्रज्ञान आत्मसात करतो; पण या सर्व ज्ञानाला समाजापर्यंत पोहोचविण्याचे सामर्थ्य जर एखाद्या कौशल्यात असेल, तर ते म्हणजे संवाद कौशल्य ज्ञानाला दिशा देणारे, विचारांना अभिव्यक्ती देणारे, आत्मविश्वासाला बळ देणारे आणि व्यक्तिमत्त्वाला तेज देणारे हे सर्वात प्रभावी जीवनकौशल्य आहे.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा पाया चार मूलभूत कौशल्यांवर उभा असतो.ऐकणे, बोलणे, वाचन आणि लेखन. ही चारही कौशल्ये केवळ भाषेपुरती मर्यादित नसून प्रत्येक विषयाच्या अध्ययनासाठी आवश्यक असतात. जो विद्यार्थी लक्षपूर्वक ऐकतो, स्पष्टपणे बोलतो, समजून वाचतो आणि नेमकेपणाने लिहितो, तो कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्याची क्षमता निर्माण करतो. म्हणूनच संवाद कौशल्ये ही केवळ भाषेची नव्हे, तर संपूर्ण व्यक्तिमत्त्व विकासाची आधारशिला आहेत.

मुलाच्या संवादाचा प्रवास जन्मापासूनच सुरू होतो. तो प्रथम ऐकायला शिकतो, नंतर बोलायला, त्यानंतर वाचायला आणि शेवटी लिहायला शिकतो. घरातील वातावरण, पालकांचा संवाद, गोष्टी, पुस्तके, चित्रे आणि प्रेमळ संभाषण यांमधून त्याच्या विचारविश्वाची उभारणी होत असते. शाळेत आल्यानंतर मात्र त्याला स्वतःच्या मर्यादित विश्वातून बाहेर पडून इतरांच्या भावना समजून घेणे, समूहात काम करणे, मतभेद स्वीकारणे आणि आदरपूर्वक विचार मांडणे शिकावे लागते. याच प्रक्रियेत त्याचे व्यक्तिमत्त्व अधिक परिपक्व होत जाते.

आजच्या माहितीच्या महासागरात केवळ माहिती असणे पुरेसे नाही; ती प्रभावीपणे मांडण्याची कला आत्मसात करणे अधिक महत्त्वाचे आहे. एक उत्कृष्ट विद्यार्थी, कुशल अधिकारी, यशस्वी उद्योजक, प्रभावी शिक्षक, संवेदनशील डॉक्टर किंवा सक्षम प्रशासक यांच्यामध्ये एक समान गुण आढळतो तो म्हणजे प्रभावी संवाद. कारण प्रत्येक क्षेत्रात कल्पना मांडाव्या लागतात, संघासोबत काम करावे लागते, निर्णय घ्यावे लागतात आणि विश्वास निर्माण करावा लागतो. त्यामुळे संवाद कौशल्ये ही करिअर घडविणारी सर्वात मोठी गुंतवणूक ठरतात.

संशोधन सांगते की आपण आपल्या संवादाच्या वेळेपैकी जवळपास ४५ टक्के वेळ ऐकण्यात, ३० टक्के वेळ बोलण्यात आणि फक्त २५ टक्के वेळ वाचन-लेखनात घालवतो. यावरून स्पष्ट होते की प्रभावी संवादाची सुरुवात चांगल्या बोलण्यापेक्षा चांगल्या ऐकण्यापासून होते. जो विद्यार्थी लक्षपूर्वक ऐकतो, तो अधिक चांगल्या प्रकारे समजून घेतो; जो समजून घेतो, तो अधिक योग्य निर्णय घेतो; आणि जो योग्य निर्णय घेतो, तोच आयुष्यात यशस्वी ठरतो.

संवाद कौशल्ये केवळ शब्दांची देवाणघेवाण नसतात; ती विचार, भावना, संवेदनशीलता आणि जबाबदारी व्यक्त करण्याची प्रक्रिया असते. म्हणूनच आधुनिक व्यवस्थापनशास्त्रात प्रभावी संवादासाठी ७ तत्त्वांना विशेष महत्त्व दिले जाते. स्पष्टता विचारांमध्ये पारदर्शकता आणते. संक्षिप्तता वेळेचा आदर शिकवते.



अचूकता विश्वास निर्माण करते. पूर्णता गैरसमज टाळते. सौजन्य नात्यांमध्ये जिव्हाळा निर्माण करते. ठोसपणा विचारांना वास्तवाशी जोडतो आणि विचारशीलता समोरच्या व्यक्तीच्या भावना समजून घेण्याची संवेदनशीलता विकसित करते. ही सात तत्त्वे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात आत्मसात झाली, तर तो केवळ चांगला वक्ताच नव्हे, तर एक आदर्श नागरिक आणि प्रभावी नेता बनू शकतो.

आज अनेक विद्यार्थ्यांकडे ज्ञानाची कमतरता नसते; परंतु मुलाखतीत स्वतःची ओळख करून देताना, व्यासपीठावर बोलताना, समूहचर्चेत सहभागी होताना किंवा स्वतःचे विचार मांडताना ते संकोचतात. याचे कारण आत्मविश्वासाचा अभाव नसून संवाद कौशल्यांचा अपुरा सराव हे असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी दररोज चांगली पुस्तके वाचणे, नवीन शब्द शिकणे, गोष्टी सांगणे, भाषण करणे, वादविवाद आणि समूहचर्चेत सहभागी होणे, प्रश्न विचारणे, इतरांचे विचार शांतपणे ऐकणे आणि नम्रपणे स्वतःचे मत मांडणे याचा सातत्याने सराव केला पाहिजे. अशी छोटी-छोटी पावले भविष्यात मोठे व्यक्तिमत्त्व घडवतात.

या संपूर्ण प्रक्रियेत पालक आणि शिक्षकांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची असते. मुलांच्या प्रत्येक प्रश्नाला संयमाने उत्तर देणे, त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधणे, वाचनाची सवय लावणे, चुकांवर टीका न करता मार्गदर्शन करणे आणि प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतःचे विचार व्यक्त करण्याची संधी देणे, ही त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत आवश्यक गोष्ट आहे. कारण आत्मविश्वास हा कौतुकातून वाढतो, तर संवाद कौशल्ये संधीमधून विकसित होतात.

आजच्या स्पर्धात्मक जगात केवळ उच्च गुण मिळवणारा विद्यार्थी यशस्वी होईलच असे नाही; परंतु ज्ञान, सकारात्मक दृष्टिकोन, प्रभावी संवाद, सहकार्याची वृत्ती आणि उत्तम व्यक्तिमत्त्व असलेला विद्यार्थी नक्कीच जीवनात पुढे जातो. संवाद कौशल्ये ही केवळ नोकरी मिळविण्यासाठी नाहीत, तर समाजात आदर मिळविण्यासाठी, नाती जपण्यासाठी, नेतृत्व घडविण्यासाठी आणि अर्थपूर्ण जीवन जगण्यासाठी आवश्यक आहेत.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, संवाद ही एक कला नसून जीवन जगण्याची पद्धत आहे. जो विद्यार्थी ऐकण्याची सवय, बोलण्याची शालीनता, विचारांची स्पष्टता आणि मनाची संवेदनशीलता विकसित करतो, तो प्रत्येक क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवतो. कारण ज्ञान यशाचे दार उघडते; पण प्रभावी संवाद त्या दारातून यशस्वीपणे पुढे जाण्याची ताकद देतो. म्हणूनच प्रत्येक विद्यार्थ्याने आजपासून संवाद कौशल्ये विकसित करण्याचा संकल्प करावा. हाच संकल्प त्याच्या व्यक्तिमत्त्वाला उंची देईल, करिअरला दिशा देईल आणि जीवनाला यशस्वी, समृद्ध व अर्थपूर्ण बनवेल.

**

# तराने पुराने

**दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर आठवड्यातील पाच दिवस, ‘‘तराने पुराने’’ हा हिंदी चित्रपट गीतांचा कार्यक्रम, दिवसभरात दोन वेळा प्रसारित होतो. त्यामधील विविध जुनी, हिंदी चित्रपट गीते, विशिष्ट काळातील आणि विशिष्ट हेतूने निवडली जातात. एखाद्या चित्रपट कलावंताचा वाढदिवस असेल तर त्या दिवशी त्यांची विविध चित्रपटातील गाणी दर्शविली जातात. काहींचे स्मृतीदिनही याच पद्धतीने जागविले जातात. त्यानिमित्ताने चित्रपट कलावंतांचे किंवा अन्य संबंधित व्यक्तींचे स्मरण होते.**







मुक्तांगण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

या कार्यक्रमातील फार जुनी गाणी, आताच्या आबालवद्धांना कंटाळवाणी वाटतात. मात्र १९६०-७० आणि त्यानंतरच्या काळातील गाणी, त्या काळातील चित्रपट कलावंत, गाणी आणि संगीतकार यामुळे अजूनही नव्याजुन्या प्रेक्षकांना आवडतात. त्यावेळी साठी ओलांडलेल्या, ज्येष्ठांच्या जुन्या आठवणींना उजाळा मिळतो. चित्रपट पाहिला असेल तर, कधी, कोणत्या गावी, कोणाबरोबर... अशा विविध आठवणी येतात आणि त्या आठवणी सुखावतातही! ही चित्रपट गीते आताच्या, युवा पिढीला आवडतात की नाही, याबाबत नेमके काहीच कळत नाही. कारण आताची ‘जेन झी’ पिढी टीव्ही पाहतच नाही. त्यांच्या हातात कायम त्यांचा प्राणप्रिय मोबाईल सामावलेला असतो. नम्रपणे, मानखाली घालून ते रस्त्यात चालताना, दुचाकी किंवा चार चाकी चालवताना, बसमधून प्रवास करताना, आपल्या मोबाईलमध्येच मग्न असतात. आजूबाजूला पाहायलाही त्याना वेळ नसतो. प्रत्येकजण आपापली ‘स्पेस’ राखून असतो आणि जाणूनही! आभासी जगामध्ये ते रमलेले आणि पूर्णपणे रंगलेले असतात!

बालदिनाच्या दिवशी सादर झालेले गीत, १९७५ मधील होते. ‘‘मैने कहा फुलों से..’’ म्हणजे गेल्या पन्नास वर्षांच्या काळात आपल्या आणि त्या काळातील चित्रपट तारकांच्या जीवनात किती बदल झाले, नाही का? त्यापैकी काही कलाकार सार्वजनिक जीवनात असल्याने, त्यांचे सध्याचे दर्शनही होते आहे. पन्नास वर्षांपूर्वीचे हे कलाकार, तेव्हा कसे दिसत होते, त्यांच्या त्या वेळच्या तारुण्यातील प्रवेशाचे वेळी झालेले दर्शन आणि आताचे पन्नास वर्षांनंतरचे दर्शन, यातील बदल प्रेक्षकांना चांगलाच जाणवतो. शेवटी काळाच्या तडाख्यातून कोणीच सुटत नाही. त्यावेळच्या आणि आताच्या आठवणींमध्ये प्रेक्षक काही काळ रमतात. ‘‘ओ सजना बरखा बहार...’’ हे चित्रपट गीत अतिशय सुंदर पद्धतीने पडद्यावर साकारले गेले आहे. त्या वेळचे ते सुंदर दृश्य, संगीत, गायिका आणि कलावती.. हे सारेच अप्रतिम!

‘‘तराने पुराने’’हा कार्यक्रम दिवसातून एकदा पाहताना (माझे काही ज्येष्ठ मित्र आठवणीने हा कार्यक्रम दोन वेळाही पाहतात. ‘‘वन्स मोअर’’ न म्हणताही..!) त्या काळातील चित्रपटांतील गाण्याची पार्श्वभूमीही जाणवते. चित्रपटातील सहभागी नटनट्यांचा अभिनय, त्यावेळचे पोशाख, तेव्हाची फॅशन हे सारे पुन्हा डोळ्यासमोर उलगडते. अनेक जुन्या चित्रपटांमध्ये बाह्य चित्रीकरणाच्यावेळी समुद्रकिनारी, जंगलामध्ये किंवा काश्मीरसारख्या ठिकाणी फिरताना, झाडामागे, एकमेकांच्या मागे धावताना, नटांच्या पायात भक्कम बूट दिसतात. परंतु चित्रपटतारका मात्र अनवाणीच पळत असतात! परंतु आजच्या चित्रपटतारका, विविध गाण्यांच्या वेळी आणि अगदी नृत्य करतानाही ‘हाय हिल्स’ वापरतात. काळ किती बदलला...! त्या वेळचे मुख्य कलाकारांचे पोशाख त्यावेळच्या फॅशननुसार असत. नटांच्या पॅन्टचे बॉटम, सैल किंवा घट्ट बुशशर्ट, त्यांच्या बाह्या, वेळोवेळी, काळानुसार बदलले, नट्यांचे पोशाखही तत्कालीन फॅशननुसार बदलत गेले. स्त्री कलाकारांच्या चेहऱ्यावरील मेकअप तेव्हाही जास्त प्रमाणात होता. आताही त्यात फारसा फरक नाही. मात्र पुरुष कलाकारांबाबत त्यात फारसा फरक पडलेला दिसत नाही. पूर्वीचे चित्रपटांचे नायक स्वच्छ दाढी करत.आता बहुतेक तरुण नट दाढी वाढवलेले असल्यामुळे, त्यांच्या मेकअपसाठीची, चेहऱ्यावरील जागा, काहीशी कमी झाल्यासारखे जाणवते!

जुन्या चित्रपटांमध्ये काश्मीरमधील आणि अन्य सुप्रसिद्ध हिल स्टेशनवरील शूटिंगमुळे, अनेक मराठी बांधव काश्मीर, सिमला, नैनिताल येथे जाऊन आले. तेथे जाऊन त्या काळातील प्रसिद्ध चित्रपटांची आठवण काढू लागले. श्रीनगरमधील दल लेक किंवा नैनीतालमधील शांत सरोवरात, पत्नीसह जलविहार करताना, स्वतःला नायकनायिकांच्या जागी कल्पू लागले आणि मग त्या अविस्मरणीय प्रवासाची रंगीत छायाचित्रे परस्परांना पाठवू लागले.... हेच ते तादात्म्यीकरण!

चौपन्न वर्षांपूर्वी महाराष्ट्रात, मुंबई दूरदर्शनच्या कार्यक्रमांना सुरुवात झाली. सुरुवातीला फक्त संध्याकाळी थोडा वेळ कार्यक्रम असत. त्यानंतर दोन वाहिन्या सुरू झाल्या. कालांतराने रंगीत प्रक्षेपण सुरू झाले आणि आता तर अनेक वाहिन्यांचे कार्यक्रम अहोरात्र सुरू असतात. या विविध वाहिन्यांवर, अहोरात्र कोणते कार्यक्रम दाखवायचे हा एक प्रश्न वाहिन्यांसमोर असणार. परंतु भारतातील बहरलेल्या हिंदी आणि अन्य प्रादेशिक भाषांतील चित्रपट व्यवसायामुळे, हा प्रश्न निश्चितच सुकर झाला आहे. एखादा चित्रपट, जाहिरातींच्या आधारे दाखवला गेला की, प्रदीर्घ काळ वाहिन्यांचे संचालक निश्चिंत राहतात. अन्य वेळी हिंदी चित्रपटगीते मदतीला येतात. ‘तराने पुराने’, ‘रंगोली’, ‘छायागीत’ अशी शीर्षके भिन्न असली, तरी त्यामधून हिंदी चित्रपटगीतेच प्रसारित होतात. अन्य भाषांतील प्रादेशिक वाहिन्याही आपापल्या भाषांतील चित्रपट गीते सादर करतात...मात्र शीर्षके भिन्न!

सुमारे साठ वर्षांपूर्वी हिंदी चित्रपट सृष्टीमध्ये दिलीप कुमार, राज कपूर, देव आनंद या त्रिदेवांचे राज्य होते. दरवर्षी त्यांचा चाहता युवा वर्ग, त्यांच्या चित्रपटांची वाट पाहत. प्रत्येकाचे कौशल्य वेगळे होते. तिघांचे संगीतकार भिन्न असत, अप्रतिम गाण्यांमुळे ते चित्रपट गाजतही. त्यांच्यात प्रचंड स्पर्धा असल्याचे वातावरण निर्माण केले जात असे. नंतर सुपरस्टार राजेश खन्ना, अमिताभ बच्चन यांचा जमाना गाजला. त्यानंतर दीर्घकाळ तीन ‘‘खान’’ मंडळींचे प्राबल्य होते. आता हिंदी चित्रपटसृष्टीत प्रचंड स्पर्धा आहे.

वर्ष-दोन वर्षात त्यामध्ये मोठे बदल होत आहेत. पन्नास वर्षांपूर्वी, सिल्वर जुबिली, गोल्डन जुबिली साजरे करणारे चित्रपट महान समजले जात होते. त्यामधील नायक-नायिकांच्या पोशाखांचे सर्वत्र अनुकरण होत असे. फॅशन ठरवणारे, घडवणारे असे अनेक चित्रपट तारे-तारका होत्या. १९७० नंतर, चित्रपटात नायक वापरत असलेल्या वेगवान, प्रचंड आवाज करणाऱ्या दुचाकी, स्वयंचलित गाड्या नंतर आणि अजूनही रस्त्यावर फिरतच आहेत. तेव्हाचे हिरो आणि त्यांचे अनुकरण करणारे चाहते, युवक आता वयस्कर झाले. परंतु अजूनही हे सारे सुरूच आहे...रस्ते तेच, वाढणारी गर्दी, त्यात गाड्यांचे प्रचंड आवाज आणि वेगवान गाड्या, मात्र युवा चालक आणि त्यातले काही धडपडणारे... मात्र भिन्न!

१५ ऑगस्ट २०२५ रोजी ‘‘शोले’’ चित्रपट प्रदर्शित होऊन पन्नास वर्षे झाली. त्यासाठी पोस्टखात्याने विशेष फोल्डर काढले होते. किंमत होती फक्त पाचशे रुपये! भारतामध्ये चित्रपटसृष्टी गेल्या शंभर वर्षांमध्ये खूपच बहरली. अनेकांच्या अनेक आठवणी चित्रपटांशी निगडित आहेत. माझ्या एका ज्येष्ठ मित्राने, ‘‘मधुमती’’ चित्रपट, सोळा वेळा पाहिल्याचे सांगितले होते. त्यांच्या मुलीचे नाव, त्यांनी मधुमतीच ठेवले होते! ‘‘तराने पुराने’’ पाहून चित्रपटसृष्टीतील गेल्या अनेक वर्षातील चित्रपट तारे-तारकांचे पुढे काय झाले, हेही सर्वांसमोर आहे. त्यामुळे हे चित्रपट तारे आणि तारका आपल्यातीलच आहेत, त्यांनाही आपल्यासारख्या ‘‘सामान्यांचे’’ सारे नियम लागू पडतात, याचीही जाणीव होते. तुम्हाला काय वाटते? ते जरूर कळवा. ●●●

# ‘इरला’ आणि ‘कांबळा’

**नभाच्या अथांग पटलावर काळेभोर ढग दाटून आले होते. समुद्राकडून येणारा ओलसर वारा अंगावर अलगद फिरत होता. मातीचा दरवळ सर्व आसमंतात भरून राहिला होता. झाडांच्या पानांवरून पावसाचे थेंब हळुवारपणे झरत होते. कोकणात मिरगाची चाहूल लागली होती. निसर्ग जणू नव्या जीवनाच्या स्वागतासाठी सज्ज झाला होता. अशा त्या रम्य वातावरणात घराच्या एका अंधाऱ्या, उपेक्षित कोपऱ्यात पडलेले एक जुने कांबळे आणि त्याच्या शेजारी विसावलेले इरले आपल्या भूतकाळाच्या आठवणींत हरवून गेले होते.**



श्री. धनंजय शेटये

काळाच्या ओघात विस्मृतीच्या गर्तेत ढकलले गेलेले हे दोघे आजही जिवंत आठवणींनी धडधडत होते. अनेक वर्षांपासून कुणाच्याही स्पर्शाची वाट पाहत असलेले कांबळे खोल दुःखाने इरल्याला म्हणाले,

‘‘गो इरल्या, आयकतस काय? हल्ली माका कोण इचारनाच नाय. एकेकाळी माझ्या उबेवर संसार जगायचे, आज माझ्याकडे वळून पाहणारेही कुणी उरले नाही.’’ इरल्यानेही कष्टाने डोळे उघडल्यासारखे करत दीर्घ उसासा टाकला.

‘‘माका तरी कोण इचारता रे बाबा? माझ्या पाठीवर विसावून कितीतरी शेतकरी बायांनी संसार उभा केला. आज मीसुद्धा या कोनाड्यात धूळ खात पडून आहे.’’ त्या दोघांच्या संवादात केवळ दोन वस्तूंचे दुःख नव्हते, तर एका संपूर्ण संस्कृतीचे हरवलेले अस्तित्व बोलत होते.

कोकणातील माणसासाठी मिरग म्हणजे केवळ नक्षत्र नव्हे, तर जीवनाचा नवा अध्याय. मिरग येण्यापूर्वी प्रत्येक घरात लगबग सुरू व्हायची. धान्याची कोठारे भरायची, मसाल्यांचा सुवास घराघरांत दरवळायचा, वाळवणीची कामे पूर्ण व्हायची. पावसाच्या आगमनाची तयारी जणू एखाद्या सणासारखी केली जायची.

पहिला पाऊस पडला की कोरडी धरती तृप्त व्हायची. शेतकरी आनंदाने आभाळाकडे पाहायचा. बैलांच्या गळ्यातील घंटांचा नाद आणि शेतकऱ्याच्या चेहऱ्यावरचे समाधान यांचा सुरेख संगम घडायचा. अशा वेळी त्याचा खरा साथीदार असायचा तो म्हणजे कांबळा.

**कांबळा शेतकऱ्याचा जीवाभावाचा मित्र**

कांबळा म्हणजे केवळ एक घोंगडी नव्हती. ती शेतकऱ्याच्या आयुष्याची सावली होती. उन्हाळा, पावसाळा, थंडी प्रत्येक ऋतूत ती त्याच्यासोबत असायची. पहाटेच्या थंडगार वाऱ्यात गुरे चारायला जाणारा गुराखी कांबळा खांद्यावर टाकून निघायचा. मुसळधार पावसात शेतात काम करणारा शेतकरी त्याचीच ख्वॉळ डोक्यावर घेत उभा राहायचा. बैलगाडीच्या प्रवासात त्याच कांबळ्यावर विसावा घ्यायचा. एखादा पाहुणा घरात आला की त्याच्या आदरातिथ्यासाठी सर्वप्रथम अंथरली जायची ती घोंगडी.

काळ्या, करड्या आणि पांढुरक्या रंगाचे हे साधे कांबळे म्हणजे कोकणी माणसाच्या श्रमांचे प्रतीक होते. त्यात कृत्रिम चमक नव्हती, पण त्यात मायेची ऊब होती. त्याच्या प्रत्येक धाग्यात कष्टकरी हातांचा घाम गुंफलेला होता. पूर्वी आठवडी बाजारात कांबळे विकणाऱ्यांची लगबग असायची. फाटलेल्या कडा विणून नवजीवन देणारे कारागीर गावोगावी फिरायचे. लोक अभिमानाने नवीन कांबळे विकत घ्यायचे. आज मात्र त्या कारागिरांचा पत्ताच नाही. त्यांच्या हातातील कला आणि त्यांच्यासोबत अनेक आठवणीही काळाच्या पडद्याआड गेल्या.

**इरले कोकणच्या स्त्रीशक्तीचे सुंदर रूप**

जर कांबळा हा शेतकऱ्याचा रक्षक होता, तर इरले हे कोकणातील कष्टकरी स्त्रीचे कवच होते. मुसळधार पावसात शेतात वाकून लावणी करणाऱ्या बाईच्या पाठीवर इरले असायचे. त्याची रचना इतकी कल्पक आणि उपयुक्त होती की, पावसाचे पाणी सहज घसरून खाली जायचे. आत मात्र उबदार आणि सुरक्षित वातावरण निर्माण व्हायचे.

इरले तयार करणे ही एक अद्भुत कला होती. वेताच्या बारीक पट्ट्या, झाडांची पाने आणि कौशल्यपूर्ण विणकाम यांच्या साहाय्याने ते तयार केले जायचे. त्याच्या प्रत्येक वळणात सौंदर्य होते. त्याच्या प्रत्येक तुकड्यात निसर्गाशी असलेले नाते दिसून यायचे. पावसात डोलणाऱ्या हिरव्या भातशेतीत इरले घातलेल्या महिला काम करताना दिसायच्या, ते दृश्य म्हणजे कोकणच्या सौंदर्याचा अविभाज्य भाग होता. आजही अनेक वृद्धांच्या डोळ्यांत त्या दृश्यांची आठवण दाटून येते.

**ख्वॉळ एक विस्मृतीत गेलेली सोबती**

कांबळा आणि इरल्याइतकीच महत्त्वाची होती ती मेनकापडाची ख्वॉळ. गरीबांच्या आयुष्यातील ही साधी वस्तू अनेक संकटांपासून त्यांचे रक्षण करायची. तिच्यात श्रीमंती नव्हती, पण गरिबीची प्रतिष्ठा होती. आजच्या पिढीला तिचे नावसुद्धा माहीत नाही, हीच खरी शोकांतिका आहे.

**आधुनिकतेच्या झगमगाटात हरवलेले दिवस**

आजच्या काळात शेती यांत्रिक झाली आहे. ट्रॅक्टर, पॉवर टिलर, आधुनिक साधने आणि रेनकोट यांनी पारंपरिक वस्तूंची जागा घेतली आहे. बदल आवश्यक असतो, प्रगतीही महत्त्वाची असते; पण या प्रगतीच्या धावपळीत आपण आपल्या मुळांपासून दूर जात आहोत का, हा प्रश्न सतत मनाला टोचत राहतो. आजच्या मुलांना इरले म्हणजे काय हे माहीत नाही. कांबळ्याची ख्वॉळ म्हणजे काय हे समजावून सांगावे लागते. एकेकाळी ज्यांच्या आधारावर शेती उभी होती, ती साधने आज संग्रहालयात ठेवण्याची वेळ आली आहे.

**आठवणींच्या पावसात भिजणारे मन**

आजही जेव्हा पहिला पाऊस पडतो, तेव्हा डोळ्यांसमोर अनेक दृश्ये तरळू लागतात. चिखलात काम करणारे शेतकरी, बैलांच्या मागे खोरा चालवणारे पुरुष, तरवा लावणाऱ्या महिला, शेतातील गडबड, आणि त्यांच्या अंगावर विसावलेले इरले-कांबळे. त्या दिवसांत पैसा कमी होता; पण माणुसकी भरपूर होती. साधने साधी होती; पण समाधान मोठे होते. जीवन कष्टाचे होते; पण निसर्गाशी नाते जिवंत होते.

आजही मिरगाची पहिली सर अंगावर पडली की, मन नकळत त्या काळात जाऊन पोहोचते. धूसर आठवणींच्या पडद्याआडून कांबळा, इरला आणि ख्वॉळ पुन्हा जिवंत होतात. ते बोलत नाहीत, पण त्यांचे मौनही खूप काही सांगून जाते. कांबळा आणि इरला ही केवळ पावसाळी साधने नव्हती. ती कोकणच्या श्रमसंस्कृतीची प्रतीके होती. ती शेतकऱ्याच्या कष्टांची साक्षीदार होती. त्यांच्यात मातीचा सुगंध होता, घामाची किंमत होती आणि जगण्याचे तत्त्वज्ञान होते.

आज त्यांचे अस्तित्व कमी झाले असले, तरी त्यांच्या आठवणी कोकणच्या मातीसारख्याच चिरंतन आहेत. आधुनिकतेच्या या वेगवान प्रवाहात आपण पुढे जात असताना, आपल्या संस्कृतीचे हे मूक वारसदार विसरता कामा नयेत. कारण माणूस कितीही आधुनिक झाला, तरी त्याच्या मुळांची ओळख जपणाऱ्या अशा आठवणीच त्याला खऱ्या अर्थाने समृद्ध बनवत असतात.

मिरगाच्या पहिल्या सरी पडल्या की आजही कुठेतरी एखाद्या जुन्या कोनाड्यात पडलेला कांबळा आणि इरला आपल्या सुवर्णकाळाच्या आठवणींनी हळूच ओले होत असतील...! ●●●

# बालभारतीच्या पुस्तकात लोककला हरवली..?

**महाराष्ट्राला अत्यंत समृद्ध आणि जगप्रसिद्ध अशी लोकपरंपरा लाभली आहे. वैविध्यपुर्ण लोककलेची ओळख आज जगाच्या कानाकोपऱ्यात पसरली आहे. महाराष्ट्रातील लोककला आजच्या पिढीपर्यंत पोहचणे ही काळाची गरज आहे. मात्र पुस्तकांमधून परराज्यातील लोक नृत्याला झुकते माप दिले जात आहे. या लोककलेतून समाज सुधारण्याबरोबरच समाज प्रबोधनाचे काम केले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील लोककला पुस्तकांमधून हरविल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.**



शिवाजी चौगुले

शालेय पाठ्यपुस्तके ही केवळ अक्षरांची ओळख करून देणारी माध्यमं नसतात, तर ती विद्यार्थ्यांच्या मनात आपल्या संस्कृतीची, इतिहासाची आणि परंपरांची पाळेमुळे रुजवणारी महत्त्वाची साधनं असतात. नुकताच महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या (बालभारती) इयत्ता ६ वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकातील एका धड्यावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. लोकनृत्य या शीर्षकाच्या असलेल्या धड्यात महाराष्ट्रातील अत्यंत समृद्ध आणि जगप्रसिद्ध लोकपरंपरांना डावलून इतर राज्यांतील लोकनृत्यांना झुकते माप दिल्याचा आरोप होत आहे. ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील अनेक नामवंत अभ्यासक, साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील जाणकारांनी बालभारतीच्या भूमिकेवर तीव्र आक्षेप नोंदवला असून हा वाद आता चांगलाच पेटला आहे.

राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना संस्कृती, परंपरा शिकवण्यासाठी पाठ्यपुस्तकात जो धडा समाविष्ट केला जाईल, तेव्हा त्यात महाराष्ट्राच्या मातीतील कलाप्रकारांना प्राधान्य मिळेल अशी साहजिकच अपेक्षा असते. मात्र, बालभारतीच्या पुस्तकात अगदी या विपरीत घडले आहे. लोकनृत्य शीर्षकाच्या या धड्यात एकूण ५ लोकनृत्यांचा उल्लेख करण्यात आला आहे. ज्यामध्ये महाराष्ट्रातील केवळ वारकरी दिंडी हे एकमेव लोकनृत्य घेण्यात आले आहे. तर उर्वरित ४ लोकनृत्ये ही भारताच्या इतर वेगवेगळ्या राज्यांतील आहेत. यामध्ये पंजाबचा भांगडा, गुजरातचा गरबा, बिहारमधील आदिवासी नृत्य आणि छत्तीसगडच्या बस्तर भागातील लोकनृत्याचा समावेश करण्यात आला आहे. खरे तर या धड्यातून महाराष्ट्रातील मराठी मनाला आणि संस्कृतीला साद घालणारी लावणी, लेझीम, कोळी नृत्य, जागरण-गोंधळ, पोवाडा, धनगर समाजाचे ढोलाच्या तालावरील पारंपरिक नृत्य यांसारख्या कलाप्रकारांची ओळख करून द्यायला हवी होती. परंतु त्याऐवजी परराज्यातील नृत्यांना सहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बालमनावर बिंबवण्याचा प्रयत्न होत आहे. यावर अभ्यासकांनी तीव्र आक्षेप घेतला आहे.

महाराष्ट्र ही संतांची, वीरांची आणि अत्यंत वैभवशाली सांस्कृतिक वारसा लाभलेली भूमी आहे. प्रत्येक मैलानुसार बदलणाऱ्या भौगोलिक स्थानाला स्वतःची अशी एक वेगळी परंपरा आहे. या परंपरेत लोककला आणि लोकनृत्यांना महत्त्वाचे स्थान आहे. असे असूनही या धड्यात महाराष्ट्राच्या समृद्ध परंपरेला डावलण्यात आले आहे. जर सहावीच्या विद्यार्थ्यांना लोकनृत्यांची ओळख करून द्यायचीच होती, तर आधी आपल्या राज्यातील वैविध्यपूर्ण लोककलांची ओळख सविस्तरपणे करून देणे गरजेचे होते. तसे न करता आपल्या घरची श्रीमंती बाजूला ठेवून शेजाऱ्यांच्या वैभवाचे गुणगान गाण्याचा हा प्रकार आहे. महाराष्ट्रातील मुलांना आधी स्वतःच्या राज्याची संस्कृती, मातीचा गंध आणि या मातीतून जन्माला आलेल्या लोककला समजायला हव्यात.

परराज्यातील संस्कृतीचा आदर नक्कीच असावा, पण तो स्वतःच्या संस्कृतीला डावलून किंवा तिची उपेक्षा करून नसावा. सर्वात खेदाची बाब म्हणजे, या धड्यावरून एवढा मोठा वाद निर्माण झालेला असतानाही राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद आणि बालभारती यांनी अद्याप यावर कोणताही अधिकृत खुलासा केलेला नाही. या मौनामुळे शिक्षण वर्तुळात संताप आणखी वाढला असून, निर्णय प्रक्रियेतील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. बालभारतीचा अभ्यासक्रम तयार करताना देशातील विविधतेची ओळख करून देणे आणि राष्ट्रीय एकात्मता जोपासणे हा हेतू असू शकतो. पंजाब, गुजरात, बिहार आणि छत्तीसगडच्या लोकनृत्यांचा समावेश करण्यामागे भारतीय संस्कृतीची बहुविविधता विद्यार्थ्यांना कळावी हा यामागे विचार असू शकतो. परंतु, राष्ट्रीय एकात्मतेचा पाठ देताना प्रादेशिक अस्मिता आणि स्थानिक वारसा दुय्यम ठरवला जाऊ शकत नाही. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या टप्प्यावर मुलांना आधी स्वतःच्या परिघातील संस्कृतीशी जोडणे हे मानसशास्त्रीयदृष्ट्या अधिक योग्य असते. महाराष्ट्रात राहणाऱ्या विद्यार्थ्याला लेझीम, पोवाडे किंवा गोंधळ यामागचा इतिहास, या लोककलांच्या सादरीकरणाची पद्धत माहीत नसताना, त्याने थेट छत्तीसगडच्या बस्तर नृत्याचा अभ्यास करावा, हा अभ्यासक्रम तयार करणाऱ्या तज्ज्ञांचा वैचारिक गोंधळ नाही तर दुसरे काय? हा वाद आता केवळ साहित्यिक वर्तुळापुरता मर्यादित राहिलेला नसून, सामाजिक माध्यमे आणि राजकीय स्तरावरही या धड्यावर चर्चा सुरू झाली आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक धोरणावर आणि शिक्षण पद्धतीवर नेहमीच जागरूक असणाऱ्या या राज्यात, थेट बालभारतीच्या पुस्तकावर आक्षेप घेतल्याने शासनाची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

बालभारतीची पुस्तके अत्यंत जबाबदारीने आणि तज्ज्ञांच्या समितीकडून तयार केली जातात. अशा वेळी महाराष्ट्रातील एवढ्या मोठ्या लोकपरंपरेची उपेक्षा होणे ही नक्कीच या तज्ज्ञांना विचार करायला लावणारी गोष्ट आहे. विविधतेत एकता साजरी करताना आपल्या स्वतःच्या समृद्ध मुळांना विसरून चालणार नाही. या वादाच्या निमित्ताने पाठ्यपुस्तक निर्मिती प्रक्रियेतील त्रुटींवर पुन्हा एकदा प्रकाश पडला आहे. आता शासन यावर काय पाऊल उचलते आणि बालभारती आपली चूक सुधारून महाराष्ट्राच्या लावणी, लेझीम, पोवाड्याला पुस्तकात त्यांचे हक्काचे मानाचे स्थान परत देते का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. आधीच इंग्रजी माध्यमात शिकणारी पिढी प्रचंड सांस्कृतिक, भाषिक घुसळणीतून जात आहे. अशा स्थितीत महाराष्ट्रातील शालेय विद्यार्थ्यांना इथल्या मातीतल्या लोककला, परंपरांचे धडे कसे काय मिळतील याला प्राधान्य देणे खूपच गरजेचे आहे. त्यासाठी आधी बालभारतीच्या तज्ज्ञांनी स्वतःच्या मनातला सांस्कृतिक गोंधळ दूर करायला हवा. ●●●

# ‘सुदर्शन’ चक्राने श्रीलंका उद्ध्वस्त

■ देवदत्त पडीकलची आक्रमक फलंदाजी
■ सामना जिंकून आघाडी घेण्याचा प्रयत्न

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

श्रीलंका ‘अ’ आणि भारत ‘अ’ या दोन संघांमध्ये दुसरा कसोटी सामना सुरू झाला आहे. या सामन्यात भारताकडून साई सुदर्शन आणि देवदत्त पडीकलने शानदार खेळी केली आहे. भारताने २४७ रन्स केल्या आहेत. या सामन्यात श्रीलंका ‘अ’ संघाविरुद्ध साई सुदर्शनने शानदार शतक ठोकले आहे. ही एक अनौपचारिक कसोटी सामना असला तरी साई सुदर्शनने आपला क्लास दाखवला आहे. भारत अ संघाचे नेतृत्व ध्रुव जुरेल करत आहे.



श्रीलंका ‘अ’ आणि भारत अ यांच्यात सध्या दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जात आहे. ध्रुव जुरेल भारत ‘अ’ संघाचे नेतृत्व करत आहे. पहिला सामना अनिर्णित राहिला होता. त्यामुळे दुसरा सामना जिंकून आघाडी घेण्याचा प्रयत्न दोन्ही संघांचा असणार आहे. भारताने प्रथम गोलंदाजी केली. श्रीलंका संघाला ३६६ रन्सवर बहरताने रोखले होते.

त्यानंतर खेळण्यासाठी आलेल्या भारताने आता मजबूत स्थिती प्राप्त केली आहे. साई सुदर्शनने शानदार खणखणीत शतक ठोकले आहे. त्याच्या शतकी खेळीमुळे भारताने चांगली मजल मारली. त्यानंतर खेळण्यासाठी आलेल्या देवदत्त पडीकलने देखील मोठी खेळी केली. साई सुदर्शन आणि देवदत्त पडीकल अद्याप नॉट आउट खेळत आहेत.


भारत अ संघाने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये गूरनूर ब्रारने शानदार कामगिरी केली आहे. श्रीलंका अ संघाने प्रथम फलंदाजी करताना ३६६ रन्स केल्या. ज्यामध्ये टीम इंडियाने भेदक आणि अचूक गोलंदाजी केली आहे. गूरनूर ब्रारने अफलातून गोलंदाजी केली आहे. याने एकूण ४ विकेट्स घेतल्या.

भारत ‘अ’ संघाचे नेतृत्व धुरव जुरेल करत आहे. त्याने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. पहिल्या दिवहसी श्रीलंका अ संघाने ५ विकेट्समध्ये २८८ रन्स केल्या. दुसऱ्या दिवशी भारतीय गोलंदाजांसामोर श्रीलंका अ ला रोखण्याचे आव्हान होते. यामध्ये गूरनूर ब्रारने शानदार कामगिरी केली आहे. त्याने एकूण ७७ रन्स देत महत्वाच्या ४ विकेट्स पटकावल्या. गूरनूर ब्रारने शानदार गोलंदाजी केली आहे. त्याने ७७ रन्समध्ये ४ विकेट्स पटकावल्या. त्यासोबत सारांश जैनने देखील शानदार गोलंदाजी केली आहे. ऑफ स्पिनरने ४ विकेट्स पटकावल्या. वेगवान गोलंदाज यश ठाकूरने २ महत्वाच्या विकेट्स घेतल्या.

## निवडक

### श्रीसंतवरील तीन वर्षांची बंदी उठवली

**तिरूवनंतपुरम :** केरळ क्रिकेट असोसिएशनने भारताचा माजी क्रिकेटपटू एस. श्रीसंत याच्यावर घातलेली तीन वर्षांची बंदी उठवण्याचा निर्णय घेतला आहे. दृश्य आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून केलेल्या काही विधानांमुळे असोसिएशनची बदनामी झाली, असे कारण देत श्रीसंतला यापूर्वी तीन वर्षांसाठी निलंबित करण्यात आले होते. त्याने या शिस्तभंगाच्या कारवाईला तिरुवनंतपुरम मुन्सफ न्यायालयात आव्हान दिले होते, पण ती याचिका फेटाळण्यात आली होती, असे केसीएने सांगितले. त्यानंतर, श्रीसंतने केरळ क्रिकेट असोसिएशनविरुद्ध केलेल्या विधानांबद्दल खेद व्यक्त करत अधिकृत आणि बिनशर्त माफीनामा सादर केला. १ जुलै रोजी झालेल्या केसीएच्या विशेष सर्वसाधारण सभेत त्याच्या माफीनाम्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्याने बिनशर्त खेद व्यक्त केल्याचे लक्षात घेऊन, सभेने एकमताने त्याच्यावरील बंदी उठवण्याचा निर्णय घेतला. केरळ असोसिएशनने श्रीसंतला इशारा दिला की, भविष्यात अशाच प्रकारचे वर्तन केल्यास कठोर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल. बंदी उठवल्यामुळे, श्रीसंत आता केरळ क्रिकेट लीगच्या तिसऱ्या हंगामात एरीज कोल्लम सेलर्स या फ्रँचायझीचा सह-मालक म्हणून काम पाहू शकणार आहे. केसीएनेने मागील केसीएल हंगामापूर्वी ही बंदी घातली होती. भारताचा माजी वेगवान गोलंदाज श्रीसंतने आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या तिन्ही प्रकारांत देशाचे प्रतिनिधित्व केले आहे.



### नेमारची भूकंपग्रस्त व्हेनेझुएलाला मदत

**व्हेनेझुएला :** ब्राझीलचा स्टार फुटबॉलपटू नेमार ज्युनियरने मैदानाबाहेर मोठे मन दाखवत, भूकंपग्रस्त व्हेनेझुएलाला २,५०,००० अमेरिकी डॉलर्सची (अंदाजे २१ दशलक्ष रुपये) मदत केली आहे. ही रक्कम मदत आणि बचाव कार्यासाठी, तसेच बाधित नागरिकांना अन्न, पिण्याचे पाणी, औषधे आणि निवारा पुरवण्यासाठी वापरली जाईल. या कठीण काळात व्हेनेझुएलाच्या लोकांप्रति सहानुभूती व्यक्त करताना, नेमारने आशा व्यक्त केली की त्याचे हे छोटे योगदान बाधित कुटुंबांना दिलासा आणि धैर्य देईल. तो म्हणाला, माझे मन व्हेनेझुएलाच्या लोकांसोबत आहे. मला आशा आहे की हे योगदान या कठीण काळात बाधित कुटुंबांना दिलासा आणि धैर्य देईल. व्हेनेझुएलाच्या राष्ट्रीय विधानसभेचे अध्यक्ष जॉर्ज रॉड्रिग्ज यांनी सांगितले की, दोन विनाशकारी भूकंपांमध्ये आतापर्यंत किमान १,४३० लोकांचा मृत्यू झाला आहे, तर ३,२३८ जण जखमी झाले आहेत आणि घरे गमावल्यामुळे ३,१४२ कुटुंबे विस्थापित झाली आहेत. मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. पण अवजड यंत्रसामग्रीचा अभाव आणि सततचे भूकंपाचे धक्के बचाव कार्यात अडथळा आणत आहेत. रिश्टर स्केलवर ७.२ आणि ७.५ तीव्रतेच्या दोन भूकंपांनंतर, अनेक लहान धक्केही जाणवले, ज्यामुळे परिस्थिती आणखी आव्हानात्मक झाली आहे.




### जोकोविचची फेडररच्या विक्रमाशी बरोबरी

**लंडन :** विम्बल्डनमध्ये सर्बियाचा दिग्गज टेनिसपटू नोव्हाक जोकोविच आणि गतविजेता यानिक सिनर यांनी प्रभावी कामगिरी करत पुरुष एकेरीच्या १६ संघांच्या फेरीत प्रवेश केला. जोकोविचने विम्बल्डनमध्ये सलग सर्वाधिक वेळा पोहोचण्याच्या रॉजर फेडररच्या विक्रमाची बरोबरी केली, तर सिनरने सलग पाचव्यांदा विम्बल्डनच्या अंतिम १६ मध्ये पोहोचून एक नवीन विक्रम प्रस्थापित केला. सात वेळा विम्बल्डन विजेता ठरलेल्या नोव्हाक जोकोविचने फ्रान्सच्या २५ व्या मानांकित आर्थर रिंडरनेकचा ७-५, ६-४, १-६, ७-६ (७-४) असा पराभव करून चौथ्या फेरीत प्रवेश केला. या विजयासह, ३९ वर्षीय जोकोविचने ऑल इंग्लंड क्लबमध्ये आपल्या कारकिर्दीतील १०५ वा विजय नोंदवला आणि विम्बल्डनमध्ये सर्वाधिक सामने जिंकण्याच्या रॉजर फेडररच्या विक्रमाची बरोबरी केली. या विजयासह, जोकोविचने ओपन एरामध्ये १८व्यांदा विम्बल्डनच्या राऊंड ऑफ १६ मध्ये पोहोचून फेडररच्या विक्रमाची बरोबरी केली. आता रॉजर आणि मी १०६व्या विजयासाठी स्पर्धा करू. जोकोविचचा सामना आता रशियन क्वालिफायर रोमन सफिउलिनशी होईल. हा सामना जिंकल्यास तो आपल्या ६६व्या ग्रँडस्लॅम उपांत्यपूर्व फेरीत आणि १७ व्या विम्बल्डन उपांत्यपूर्व फेरीत पोहोचेल. सेंटर कोर्टवरील छत काढल्यानंतर मोकळ्या आकाशाखाली खेळल्या गेलेल्या या सामन्यात, जोकोविचने प्रभावी शैलीत पहिले दोन सेट जिंकले.

### हाँग म्युंग-बो यांचा राजीनामा

**नवी दिल्ली :** दक्षिण कोरिया संघाचे मुख्य प्रशिक्षक हाँग म्युंग-बो यांनी आपल्या राजीनाम्याची घोषणा केली आहे. गट फेरीतून दक्षिण कोरिया बाहेर पडल्यानंतर, हाँग म्युंग-बो यांनी संघाच्या प्रशिक्षण शिबिरात खेळाडू आणि कर्मचाऱ्यांसमोर आपल्या राजीनाम्याची घोषणा केली. त्यांनी सांगितले की, राष्ट्रीय संघाची जबाबदारी स्वीकारणे हा सोपा निर्णय नव्हता, पण जेव्हा त्यांनी ही जबाबदारी स्वीकारली, तेव्हा त्यांचे एकच ध्येय होते: देशासाठी आपले सर्वोत्तम योगदान देणे.या हंगामात दक्षिण कोरियाच्या संघाकडून मोठ्या अपेक्षा होत्या. संघात कर्णधार सोन ह्युंग-मिन, ली कांग-इन आणि किम मिन-जाए यांसारखे स्टार फुटबॉलपटू होते. त्यामुळे हा संघ सहजपणे बाद फेरी गाठेल अशी शक्यता होती. गट फेरीमध्ये दक्षिण कोरियाने आपल्या पहिल्याच सामन्यात चेक प्रजासत्ताकला २-१ ने हरवून आश्वासक सुरुवात केली. हाँग म्युंग-बो यांनी कोणतीही सबब न देता पराभवाची जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला.



### एम.बी.ए. लीग ब्रीजचे आयोजन

**नाशिक :** महाराष्ट्र ब्रीज असोसिएशन, नाशिक जिल्हा ब्रीज असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक येथे एम.बी.ए. लीग ब्रीज स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा नाशिकच्या गोखले शिक्षण संस्थेच्या बी. वाय. के. कॉलेज परिसरातील गुरुदक्षिणा ऑडीटोरिअम हॉलमध्ये आयोजित करण्यात आल्या आहेत. टीम ऑफ फोर म्हणजे स्विस लीग आणि मॅच पॉइंट पेअर्स असे दोन प्रकार असणार आहेत. यामध्ये १८ संघ सहभागी होणार आहेत. या स्पर्धेमध्ये जागतिक स्तरावर, राष्ट्रीय स्तरावर पदके प्राप्त केलेले खेळाडू अनिल पाध्ये, राजू तोलानी, कौस्तुभ बेंद्रे आणि इतर दर्जेदार खेळाडूंचा समावेश असणार आहे. राजू तोलानी आणि अनिल पाध्ये यांचा समावेश असलेल्या भारताच्या संघाने नुकत्याच गोवा येथे झालेल्या एशियन चॅम्पियनशीपमध्ये भारताला रजतपदक मिळवून दिले होते अशी माहिती या स्पर्धेचे आयोजन प्रामुख हेमंत पांडे आणि दिली.

## भारताचा श्रीलंका दौरा जाहीर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघ पुढील महिन्यात श्रीलंकेविरुद्ध दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळणार आहे. या मालिकेच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. पहिला सामना १५ ते १९ ऑगस्ट दरम्यान गॉल येथे खेळला जाईल. दुसरा कसोटी सामना २३ ते २७ ऑगस्ट दरम्यान सिंहलीज स्पोर्ट्स क्लबमध्ये खेळला जाईल. २०२५-२७ च्या जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या दृष्टीने भारतीय संघासाठी ही एक महत्त्वपूर्ण मालिका आहे. भारतीय संघाने अफगाणिस्तानविरुद्ध एक कसोटी सामना खेळून जिंकला आहे. भारताची अलीकडील कसोटी कामगिरी खराब राहिली आहे. यामुळेच संघ जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत



पाचव्या क्रमांकावर आहे. दुसरीकडे, श्रीलंका भारतापेक्षा एक स्थान खाली सहाव्या क्रमांकावर आहे. २०२७ मध्ये डब्ल्यूटीसीच्या अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी भारताला आपले उर्वरित बहुतेक कसोटी सामने जिंकावे लागतील. भारत २०१७ नंतर प्रथमच कसोटी मालिकेसाठी श्रीलंकेचा दौरा करणार आहे. यापूर्वी, दोन्ही क्रिकेट मंडळांनी या दौऱ्यात तीन टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांचा समावेश करण्याच्या शक्यतेवर चर्चा केली होती. पण टी२० आंतरराष्ट्रीय मालिकेचा कोणताही उल्लेख नाही. त्यामुळे, सध्या केवळ दोन कसोटी सामन्यांची मालिकाच निश्‍चित मानली जात आहे. आतापर्यंत दोन्ही संघ ४६ कसोटी सामन्यांमध्ये एकमेकांसमोर आले आहेत. यापैकी भारताने २२ कसोटी सामने जिंकले आहेत, तर सात सामने अनिर्णित राहिले आहेत. यापूर्वी, दोन्ही क्रिकेट मंडळांनी या दौऱ्यात तीन टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांचा समावेश करण्याच्या शक्यतेवर चर्चा केली होती. या फॉरमॅटमध्ये दोन्ही संघ शेवटचे २०२१/२२ मध्ये एकमेकांसमोर आले होते.

## व्लादिमीर क्रॅम्निकवर दोन वर्षांची बंदी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

जागतिक बुद्धिबळ महासंघाच्या (फिडे) नीती आणि शिस्तपालन आयोगाने (ईडीसी) माजी विश्वविजेता व्लादिमीर क्रॅम्निकवर दोन वर्षांची शिस्तभंगाची बंदी घातली आहे. पण या बंदीचे शेवटचे एक वर्ष तीन वर्षांच्या परिवीक्षा कालावधीसाठी स्थगित केले जाईल. परिवीक्षा कालावधीत क्रॅम्निक कोणत्याही नवीन उल्लंघनासाठी दोषी न आढळल्यास, त्याच्यावर केवळ एक वर्षाची सक्रिय बंदी असेल. फिडे व्यवस्थापन मंडळ आणि फिडे फेअर प्ले आयोगाने दाखल केलेल्या तक्रारींनंतर हे प्रकरण सुरू करण्यात आले. या तक्रारींमध्ये असा आरोप करण्यात आला होता. ग्रँडमास्टर डेव्हिड नवारा आणि डॅनियल नरोडित्स्की यांच्यासह अनेक बुद्धिबळपटूंवर सोशल मीडिया आणि सार्वजनिक मंचांवर फसवणूक केल्याचा जाहीरपणे आरोप केला होता. सर्व पक्षांचे युक्तिवाद आणि पुरावे तपासल्यानंतर, फिडेच्या नीतीसंहिता आणि शिस्तपालन संहितेच्या अनेक तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल दोषी ठरवले आहे.

## कोकण विभागीय नारळफोडी स्पर्धेचे आयोजन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

कित्ते भंडारी हितवर्धक मंडळ, अलिबाग यांच्या ६८ व्या वर्धापन दिनानिमित्त सोमवारी (दि.६) जुलै रोजी कोकण विभागीय स्तरावरील भव्य हातावरील नारळफोडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा भंडारी भवन, स्व. गोविंद बाबू नार्वेकर सभागृह, श्रीबागजवळ, चेंढरे, ता. अलिबाग येथे दुपारी २ वाजता सुरू होणार असून स्पर्धेसाठी प्रवेश विनामूल्य आहे. स्पर्धेत कोकण विभागातील मुंबई, रायगड, ठाणे, पालघर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील भंडारी समाजातील स्पर्धक सहभागी होणार आहेत.

स्पर्धकांना आकर्षक बक्षिसांचीही घोषणा करण्यात आली असून प्रथम क्रमांकासाठी फ्रिज (डबल डोअर), द्वितीय क्रमांकासाठी वॉशिंग मशीन, तृतीय क्रमांकासाठी स्मार्ट टीव्ही आणि चतुर्थ क्रमांकासाठी सायकल अशी बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रत्येक संघात ६४ सदस्यांचा समावेश असणे आवश्यक आहे. स्पर्धकांना जात प्रमाणपत्राच्या आधारे प्रवेश दिला जाणार असून प्रत्येक स्पर्धकाने ५ नारळ (पूर्ण सुकलेले) आणणे बंधनकारक



आहे. प्रत्येक स्पर्धकाला एकदाच संधी दिली जाईल. पंचांचा निर्णय अंतिम राहणार असून स्पर्धेचे सर्व नियम व अटी आयोजकांच्या अखत्यारीत असतील.

संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त वृक्षारोपण, दुपारी २.३० ते रात्री ८ वाजेपर्यंत हातावरील नारळफोडी स्पर्धा, रात्री ८.३० वाजता विजेत्यांना पारितोषिक देण्यात येणार आहेत. संस्थेचे प्रभारी अध्यक्ष कमळाकर पडवळ यांनी भंडारी समाजातील सर्व बांधवांनी या स्पर्धेला व वर्धापन दिन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. स्पर्धेच्या आयोजनासाठी संतोष मोरे, राजेंद्र बांदिवडेकर यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## भारताविरुद्ध इंग्लंडच्या संघाची घोषणा

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

इंग्लंडच्या पुरुष निवड समितीने या महिन्यात भारताविरुद्ध होणाऱ्या तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेसाठी १६ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. या मालिकेसाठी हॅरी ब्रुकची इंग्लंड संघाच्या कर्णधारपदी नियुक्ती करण्यात आली आहे. अष्टपैलू जेम्स कोल्सचा संघात प्रथमच समावेश करण्यात आला आहे. यापूर्वी भारताविरुद्धच्या इंग्लंडच्या टी-२० संघात त्याचा समावेश होता. जोश टंगचाही संघात समावेश आहे, जरी त्याने अद्याप एकदिवसीय पदार्पण केलेले नाही. वेगवान गोलंदाजीमध्ये गस ॲटकिन्सन आणि साकिब महमूद यांचे संघात पुनरागमन झाले आहे. ब्रायडन कार्स, झॅक क्रॉली, जेमी ओव्हरटन आणि ल्यूक वूड यांच्या जागी जोफ्रा आर्चर, गस ॲटकिन्सन, साकिब महमूद आणि जेम्स कोल्स यांचा संघात समावेश करण्यात आला आहे.



भारत आणि इंग्लंड यांच्यातील तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका १४ जुलै रोजी एडजबॅस्टन येथे सुरू होईल. पुढील दोन सामने सोफिया गार्डन्स आणि लॉर्ड्स येथे खेळले जातील. भारत आणि इंग्लंड यांच्यातील तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका १४ जुलै रोजी एडजबॅस्टन येथे पहिल्या एकदिवसीय सामन्याने सुरू होईल. मालिकेतील दुसरा सामना १६ जुलै, तिसरा सामना १९ जुलै रोजी लंडनच्या ऐतिहासिक लॉर्ड्स मैदानावर खेळला जाईल. भारताविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठी इंग्लंडचा संघ: हॅरी ब्रूक (कर्णधार), रेहान अहमद, जोफ्रा आर्चर, गस ॲटकिन्सन, टॉम बँटन, जेकब बेथेल, जोस बटलर, जेम्स कोल्स, सॅम करन, लियाम डॉसन, बेन डकेट, विल जॅक्स, साकिब महमूद, आदिल रशीद, जो रूट आणि जोश टंग यांचा समावेश करण्यात आला आहे.

## जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनच्या मान्यतेने नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळातर्फे नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा शनिवारी दि.११ ते रविवार दिनांक १२ जुलै रोजी सिडको समाज मंदिर, दुसरा मजला, सेक्टर १८, नवीन पनवेल येथे महाराष्ट्र शासनाचे शिवछत्रपती राज्य पुरस्कार विजेते संजय सुदाम कडू यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली आहे.

सदर स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस असोसिएशनचे खजिनदार व रायगड जिल्हा टेबल टेनि असोसिएशनचे अध्यक्ष संजय सुदाम कडू यांच्या हस्ते शनिवारी ११ जुलै रोजी सकाळी ९.३० वाजता करण्यात येणार आहे. सदर स्पर्धा खालील प्रमाणे विविध गटांमध्ये आयोजित करण्यात आली आहे



बिगनर मुले आणि मुली, ११वर्षा खालील मुले आणि मुली, १३ वर्षांखालील मुले आणि मुली, १५ वर्षांखालील मुले आणि मुली, १७ वर्षांखालील मुले आणि मुली, १९ वर्षांखालील मुले आणि मुली, महिला व पुरुष, वेटरन पुरुष ४० वर्षा वरील अशा विविध गटांमध्ये घेण्यात येणार आहेत. सदर स्पर्धेत नवी मुंबई व रायगड जिल्ह्यातील नामवंत खेळाडू सहभागी होणार आहेत. विजेत्या स्पर्धकांना रोख रक्कम व प्रमाणपत्र आणि आकर्षक चषक देऊन गौरविण्यात येणार आहे

स्पर्धेचे चीफ रेफरी डी.आर. साळसकर व शामल आणि योगेश पवार यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

## ऑस्ट्रेलिया-इंग्लंड आमनेसामने

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

महिला टी-२० विश्वचषक २०२६आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. या स्पर्धेला आता दोन अंतिम स्पर्धक मिळाले आहेत. पहिल्या सेमिफायनल सामन्यात, सहा वेळच्या विजेत्या ऑस्ट्रेलियाने वेस्ट इंडिजला आठ विकेट्सने दुव्वा उडवला. तर दुसऱ्या सेमिफायनल सामन्यात यजमान इंग्लंडने दक्षिण आफ्रिकेला ४० धावांनी पराभूत करून अंतिम सामन्यात आपले स्थान निश्चित केले. आता हे दोन्ही संघ ५ जुलै (रविवार) रोजी लंडनच्या ऐतिहासिक लॉर्ड्स मैदानावर एकमेकांसमोर आमनेसामने येतील. ऑस्ट्रेलिया विक्रमी सातव्या महिला टी-२० विश्वचषक विजेतेपदासाठी मैदानात उतरेल, तर इंग्लंड २००९ नंतर दुसऱ्यांदा विश्वविजेता बनण्याचे ध्येय ठेवेल. ऑस्ट्रेलियाने पुन्हा एकदा अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले असून आता त्यांचे लक्ष विक्रमी सातव्या विजेतेपदावर आहे.

### पेनल्टी शूटआउटमध्ये ऑस्ट्रेलियावर केली मात | सामना एक्स्ट्रा टाइममध्ये खेळला गेला

## इजिप्तचा राऊंड ऑफ १६ मध्ये प्रवेश

**। टेक्सास । वृत्तसंस्था ।**

फिफा विश्वचषकाच्या राउंड ऑफच्या सामन्यात इजिप्तने ऑस्ट्रेलियाचा पेनल्टी शूटआउटमध्ये ४-२ असा पराभव करून इतिहास रचला. निर्धारित वेळेत सामना १-१ असा बरोबरीत सुटल्यानंतर झालेल्या या नाट्यमय शूटआउटमध्ये विजय मिळवत इजिप्तने स्पर्धेच्या पुढील फेरीत आपले स्थान निश्चित केले.

विश्वचषकाच्या बाद फेरीत यापूर्वी कधीही पुढे न गेलेल्या इजिप्तच्या संघाने १२० मिनिटांच्या खेळानंतरही



निकाल न लागल्याने पेनल्टी शूटआउटमध्ये संयम राखला. ऑस्ट्रेलियाने सामन्याची दमदार सुरुवात केली. व्होल्पॅटोने सुरुवातीच्या पाच मिनिटांतच लांब अंतरावरून मारलेला फटका क्रॉसबारच्या वरच्या भागाला स्पर्श करून गेल्याने त्याने उत्कृष्ट खेळाची झलक दाखवली होती.

त्यानंतर जॉर्डन बॉसने इजिप्तच्या बचावफळीला भेदण्याचा प्रयत्न केला, परंतु रामी राबियाने ऐनवेळी केलेल्या महत्त्वपूर्ण बचावामुळे तो प्रयत्न फसला. ऑस्ट्रेलियाची सुरुवात आशादायक असूनही, १३ व्या मिनिटाला इजिप्तने गोलच्या दिशेने मारलेल्या पहिल्याच फटक्यातून आघाडी घेतली. करीम हाफेझने डाव्या बाजूने एक अचूक क्रॉस दिला आणि फार पोस्ट जवळ वाकून इमाम अशूरने उत्कृष्ट हेडरद्वारे गोलकीपर पॅट्रिक बीचला चकवत चेंडू जाळीत धाडला. या गोलमुळे इजिप्तचा संघ सावरला आणि पहिल्या सत्राच्या बहुतांश भागात त्यांचेच वर्चस्व राहिले.

### ऐतिहासिक विजय

ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या पेनल्टी किकवर साऊटरने चेंडू क्रॉसबारच्यावरून भिरकावला, ज्यामुळे आफ्रिकन संघाला सुरुवातीलाच आघाडी मिळाली. सलाहने आत्मविश्वासाने गोल केला आणि त्यानंतर ऑस्ट्रेलियाच्या १८-वर्षीय लुकास हेरिंग्टनला आपली चौथी पेनल्टी किक साधता आली नाही. अखेरीस, होसाम अब्देलमजीदने शांतपणे विजयी पेनल्टी गोल नोंदवत एक ऐतिहासिक विजय निश्‍चित केला आणि इजिप्तला विश्वचषकाच्या राऊंड ऑफ १६ मध्ये पोहोचवले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयऑनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)